# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक १४ अकोला, सोमवार तारीख ३ माहे म सन १८८० इसवी. अंक १७

## वऱ्हाडसमाचाराची किंमत.

| | रु. |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ५ |
| साल अखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ०४ |

डाक हाशील.

| | |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| ,, अखेर | २ |

नवीन वर्गणीदार होऊं इच्छिणारे लोकांकडून अगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र सुरू केलें जाईल.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, १० ओळींचे आंत | १ |
| १० ओळीपुढें दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०३ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |

NOTICE TO CONTRIBUTORS.

*We invite the co-operation of all European and Native gentlemen in maintaining the status of this journal and to this end solicit contributions in the shape of News letters, stray notes &c. Contributors may rest fully assured that the confidence they place in us by sending communications will not be violated.*

## नवीन सुधारलेला मराठी सिव्हिल प्रोसिजर कोड

ह्मणजे

( सन १८७७ चा आक्ट १० सन १८७९ च्या १२ वरून सुधारलेला. )

## विशेष समजुतीच्या टिपा. महत्वाचे निवाडे व इंडेक्स सुद्धां.

सदर्हू कायद्याची आमची पहिली आवृत्ति संपून बरेच दिवस झाले होते इतक्यांत ह्या कायद्याच्या दुरुस्तीचा नवा आक्ट ह्मणजे सन १८७९चा १२वा तयार होऊन तावडतोब अमलांत आला त्यावरून पूर्वींचे कायद्यांत फारच महत्वाचे व पुष्कळ फेरफार झाले. यामुळें पहिलीं बुकें बहुतकरून सर्व प्रकारें निरुपयोगीं अशीं जहाल्यासारखीं आहेत. सदर्हू सर्व फेरफार जागचे जागीं न आल्यानें लोकांस फार अडचण पडेल ती पडूं नये ह्मणून आजवरव दुसरी आवृत्ति काढणें राहिली. नवीन दुरुस्तीचे कायद्याचें मराठी भाषांतर गेले गव्हर्नमेंट ग्याझिटांत आलें त्याप्रमाणें यांत जागच्या जागीं सर्व फेरफार करून छापण्याचें काम सुरूं आहे. या कायद्यांतील प्रत्येक अवघड कलमावर समजुतीच्या खुलासेवार टिपा व सर्व हायकोर्टाचे हें बुक छापण्यापर्यंत ह्या आक्टावर झालेले महत्वाचे निवाड्यांचे साराश व इतर आधारही दिले आहेत. ग्रंथ समजुतीस व चालनास सुलभ व्हावा यासाठीं प्रथम कलमांचें विल्हेवार विवेचनही केलें आहे. सदर्हू ग्रंथ रा. रा. नारायण बापूजी कानिटकर, वकील डिस्ट्रिक्ट कोर्ट पुणें यांजकडून तयार करविला आहे. एकंदर हा ग्रंथ जितका सुलभ व सोईचा होईल तितका करविला आहे.

उत्तम टाइपांनें व जाड कागदावर हा ग्रंथ तारीख २० मे रोजीं छापून तयार होईल. राहिलेला अल्पकाळ, तसेच ह्या कामास लागणारी मेहेनत यांचे मानानें याची किंमत थोडी ह्मणजे तारीख १ मे पर्यंत पैसा भरणारांस २॥ रुपये व मागाहून घेणारांस ३ रुपय ठेविली आहे. या शिवाय प्रत्येक बुकास टपाल हशील तीन आणे पडेल. एकदम १० प्रती घेणारास टपाल हशील पडणार नाहीं.

विशेष सूचना—ह्या ग्रंथाच्या प्रति आह्मी थोड्या काढणार आहो त्या अर्थी मागाहून लोकांस अडचण न पडावी या करितां लोकांनीं पैसे भरण्याची त्वरा करावी किमतीबद्दल पैसे पाठविणें ते मनिआर्डर किंवा पुण्याची दर्शनी हुंडी पाठवावी. कोर्ट फीचीं टिकिटें मुळींच घेतलीं जाणार नाहींत. टपाल हांशीलसह किंमत वर लिहिलेले मुदतींत आह्माकडे अथवा रा. रा. नारायण बापुजी कानिटकर वकील डिस्ट्रिक्ट कोर्ट पुणें, यांजकडे आली असतां ग्रंथ तयार होतांच रवाना करण्यांत येईल. कळावें. तारीख ३० माहे मार्च सन १८८० इसवी.

भाऊ गोविंद नापकर
ज्ञानचक्षूचे मालक.

## सुबोधसार.

भाग पहिला.

यांत राजनीति वगैरे अनेक ग्रंथांतून नीतिपर, बोधक, मनोरंजक, दृष्टांतिक, व अनुभवसिद्ध असे उत्तम निवडक श्लोक प्राकृत अर्थासह घेतले आहेत. अशा ग्रंथाच्या अवलोकनानें बहुतेक व्यवहारज्ञांस विशेषेंकरून नीतिशास्त्र वगैरे विषयांची चांगली माहिती होऊन सामान्य पुरुषासही व्यवहारांत समयविशेषीं कसें बोलावे व वागावें वगैरे अनेक प्रकारचें ज्ञान होण्यासारखें आहे हा ग्रंथ जाड कागदावर खिळेछापानें छापून विक्रीस तयार आहे. किंमत ०१० आणे टपाल खर्च ००६ आह्माकडे पाठविल्यास पुस्तक तावडतोब रवाना केलें जाईल. कळावें. ता. २६ आक्टोबर सन १८७९ इ.

वऱ्हाडसमाचाराचे मालक.

## कौमुदीमहोत्साहः.

या अत्यंत उपयोगी त्रैमासिक पुस्तकामध्यें "सिद्धांत कौमुदी" संस्कृत व्याकरण, आणि त्याचा शुद्ध मराठी अर्थ, स्पष्टीकरणार्थ भरपूर टीपा, आणि पाणिनीयादि सर्व आधारग्रंथ देऊन आणखी दुसऱ्या अनेक सोई केल्या आहेत. आजपर्यंत पांच खंड प्रसिद्ध झाले. यांत संज्ञा, परिभाषा, पंचसंधि, षडलिंग. अष्टाध्यायी, गणपाठ, धातुपाठ, लिंगानुशासन, शिक्षा, अनुवृत्तीपूर्वभाग इतकें संपूर्ण झालें, पुढील प्रकरण चालू असून क्रियापदाला आरंभ केला आहे. शिवाय दोनशें शब्दांच्या संपूर्ण विभक्ति चालवून दाखविल्या आहेत. कागद चांगले, सांचा मोठा, छापणी सर्वोत्कृष्ट, प्रत्येक खंडांत १०० पृष्ठें. किंमत इतर पुस्तकांच्या मानानें फारच अल्प. ह्मणजे प्रत्येक खंडाला केवळ एक रुपया, टपालखर्च एक आणा, पण वर्षाची वर्गणी अगाऊ चार रुपये पाठविल्यास टपालखच नाहीं. या पुस्तकाविषयीं मोठमोठ्या पंडितांनीं उत्तम अभिप्राय दिले आहेत. ज्यांस हीं पुस्तकें घ्यावयाचीं असतील त्यांहीं कृपा करून आह्मांस "पोष्टपेड" पत्रानीं कळवावें ह्मणजे पुस्तकें पाठविलीं जातील.

रामचंद्र भिकाजी गुंजोकर
कौमुदीमहोत्साहकर्ते.

मुंबई काकडवाडी घर नंबर ८

## नोटिस

रा. राघो वल्लद गोविंदा मुळें राहणार सावखेड तालुके चिखली जिल्हे बुलढाणें यास खालीं सही करणार कौसी मर्द राघो मुळें मुक्काम रायपुर तालुके चिखली जिल्हा बुलढाणें इजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तुमचे माझ्याशी लग्न झाल्यास आज तेरा वर्षें झालीं वे मी वयांत आल्यास पांच वर्षें झालीं, परंतु तुह्मी मजला नेत नाहीं व जनाशिरस्तेप्रमाणें कांहींच वर्तणूक तुमचेकडून होत नाहीं. सबब तुमचे पुरुषत्वाबद्दल मला संशय आल्यावरून माझे बापानेंही तुह्मास एथें आणून दोन महिने ठेविलें ते वेळेस तर तुह्मास पुरुषत्व नाहीं अशी माझी पक्की खात्री झाली. त्यास या नोटिशीनें तुह्मास विनंतीपूर्वक कळवितें कीं आतां यापुढें माझे बापाचे घरीं माझी राहण्याची सोय नाहीं. सबब तुह्मी कसेही असेल तरी मजला पूज्यच आहात त्या अर्थीं आजपर्यंत मी माझे बापाचे घरीं राहिलेले मुदतींत त्यास लागलेला खर्च दरसाल रुपये ५० प्रमाणें तेरा वर्षांचे रुपये ६५० सहाशें पन्नास ही नोटिस पावल्यापासून आठ दिवसांचे आंत सदर्हू रुपये माझे बापास देऊन मला तुमचे घरीं घेऊन जावें. वर लिहिलेले मुदतीचे आंत असें करण्यास तुह्मी चुकल्यास मी आपला दुसरे ठिकाणीं घरठाव करण्याची तजवीज पाहीन. शिवाय योग्य तजवीजीनें वर लिहिलेले सहाशे पन्नास रुपयेही घेईल हे खूप समजावें मग तुमचा माझे वरचा कोनतेही प्रकारचा दावा व हक्क तुटेल कळावें. तारीख २७ माहे एप्रिल सन १८८० इसवी.

( सही ) कौसी मर्द राघो मुळे राहणार रायपुर तालुके चिखली जिल्हा बुलढाणें निशाणी बां०

## पत्रव्यवहार

या सदरा खालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांसः—

वि. वि. पत्रकर्ते महाराज, आज बरेच दिवस झाले आपली सेवा माझे हातून घडली नाहीं. याबद्दल माफी मागून हल्लीं चार ओळी सादर करितो त्यास येत्या अंकीं स्थळ देऊन प्रसिद्ध कराल ही पूर्ण आशा आहे.

अलीकडे नाटकांविषयीं आपले पत्रांतून कित्येक वेळां चर्चा झालेली आहे ती पाहून माझेही मनांत थोडे विचार उद्भवले ते असेः-

मनुष्य प्राण्याचे निर्वाहास जितके हवा पाणी, अन्नवस्त्र व उद्योग धंदे हे अवश्यक आहेत तितके अन्य पदार्थ नाहींत हें जरी खरें आहे तरी प्रत्येक वस्तुमात्र मनुष्यानें आपल्यास उपयोगी अशी करून घेऊन त्याचा निरनिराळ्या प्रकारानें उपभोग घेत आहे. त्यांतीलच ही एक "नाट्यकला" समजावयाची. ह्या नाट्यकलेचें ज्यांनीं चांगलें अध्ययन केलेलें आहे, उत्तमोत्तम कवींनीं रचलेलीं नाटकें ज्यांच्या हृदयांत बिंबून करतळामळ झालेलीं आहेत व ज्यांच्या अंगीं चातुर्यादि गुणांनीं प्रेक्षक समूहास तन्मय करून सोडण्याची चांगली शक्ति आली आहे अशा नाटककारांचे प्रयोग पाहून संसारांतील त्रितापाचें क्षणभर निरसन होऊन नाट्यकलेपासून प्राप्त होणारें जें मुख्य फल 'मनरंजन' तें खरोखर प्राप्त होईल. भारती व रामायणी नाटकाच्या मंडळ्या अलीकडे आपल्या देशांत बऱ्याच स्थापन झालेल्या आहेत त्यांतून ह्मणण्यासारखें पुढें पाऊल एक दोघींचेंच असून बाकी च्यांचीं 'पिछेहाटच' चालली आहे; ह्मणून व्हावा तसा त्या मंडळ्यांपासून उपयोग होत नाहीं. देशाची विद्वत्ता व अभिरुचि ज्याप्रमाणें वाढत जाते त्याचप्रमाणें करमणुकीचे व मनरंजनाचे प्रकारही बदलत गेले पाहिजेत तरच त्यापासून उभय पक्षांस फायदा होतो नाहीं पेक्षां पुष्कळ अर्भकें आपल्या अमोल्य विद्याभ्यासास मुकतात, कुलीन पुरुष आपल्या नावरूपांस मुकतात, श्रीमान आपल्या धनद्रव्यास मुकतात व कित्येक अबला आपल्या पतिपुत्रास, घरादारास व नाव लौकिकास मुकतात तथापि उठावा तसा ठसा उठत नाहीं.

अशा प्रकारें मन रंजन करणारे लोकांच्या केवळ आपल्याकडे पूर्वापार जातिबनून राहिल्या आहेत. दरवेशी लोक बैल, वानर, अस्वल, व वाघ हे दारोदार घेऊन फिरतात. तसेच गारोडी निरनिराळ्या जातीच्या सापाचे पेटारे घेऊन फिरतात व हस्तचांपल्यानें खडा लपवून रुपया मंत्रानें केला असा दाखवितात. पैल्वान लोक कसरतीचे खेळ करतात, आणि बहुरूपे तर निरनिराळे वेश बदलून आठ पंधरा दिवस सोंगेंच दाखवितात, परंतु यांची तऱ्हा निराळी.

अलीकडे घोड्यांचें नाटक घेऊन युरोपियन गृहस्थ आपले देशांत येत असतात त्याप्रमाणें गेल्या मार्च महिन्यांत सदर्हू नाकट मुंबईबंदरीं येऊन उतरले व तेथें दर रोज खेळ सुरू आहेत. त्यांत चांगले शिकलेले १२।१९ घोडे आहेत तसेच त्यांवर स्वार होणारे पुरुष, स्त्री व लहान मुली मुलें आहेत. सदर्हू घोडे भरधाव मंडळावर फिरत असतां लहान मुलेंसुद्धां निर्भयपणें मोठमोठ्या उड्या घेतात नाचतात व मनसोक्त क्रीडा करितात. हें पाहून फार मौज वाटते. असे नवेनवे प्रकार आपले देशांत सुरू झाल्याचून उभय पक्षास फायदा होणार नाहीं असें मला वाटतें. पत्र विस्तार भयास्तव आतां पुरें करितों.

एक फिरस्ता.

वऱ्हाडसमाचार.

मिति चैत्र वद्य ९ शके १८०२

## विलायतचें प्रधान मंडळ.

पार्लमेंटचे मेंबर निवडण्याची पाळी सात वर्षांनीं एकदा येत असते. ती या वर्षीं आली. मेंबरांत २ पक्ष असत. कान्सर्व्हेटिव व लिबरल. पहिले राजपक्षास अधिक धरून चालतात; दुसरे सर्व गोष्टींत सारखे वागतात. पार्लमेट मेंबर मधून प्रधान मंडळ निवडलेलें असतें. ज्या पक्षाचा अधिक भरणा असतो त्या पक्षाचा मुख्य प्रधान असतो. आजपर्यंत कान्सर्व्हेटिव पक्षाचें प्राबल्य होतें व त्याच पक्षाचे लार्ड बिकन्सफिल्ड हे मुख्य प्रधान होते. हल्लींच्या पार्लमेंट मेंबरच्या निवडणुकींत लिबरल पक्षाचा भरणा अधिक झाला व त्यांचें वर्चस्व झालें. त्या बरोबर जुने प्रधान मंडळीनें राजीनामे दिले. नंतर चक्रवर्तिंनी साहेबानीं लिबरल पक्षापैकीं लार्ड हार्टिंगटन यांस बोलावून नेऊन प्रधान मंडळाच्या निवडणुकीविषयीं विचारिलें. त्यानीं मि. ग्ल्याडस्टन यांची सल्ला घ्यावी असें कळविलें त्यावरून त्यानां बोलाविलें व त्यांस मुख्य प्रधान होण्याविषयीं विचारिलें त्यानीं ती गोष्ट कबूल केली व नवीन प्रधान मंडळ निवडण्याची योजना केली. हल्लीं जे प्रधान झाले आहे तें:-

मि. ग्ल्याडस्टन साहेब मुख्य प्रधान व चान्सेलर आफ एक्सचेकर ह्मणजे जमाखर्चावरील मुख्य.

लार्ड सिलबोर्न लार्ड हायचान्सलर ह्मणजे न्यायखात्याचे प्रधान.

अर्ल ग्रानविल यांस परराष्ट्रसंबंधी स्टेट सेक्रेटरी.

राइट आनरबल एच चिल्डर्स युद्धखात्याचे स्टेटे सेक्रेटरी.

लार्ड हार्टिंगटन हिंदुस्थानाकरितां स्टेटे सेक्रेटरी.

लार्ड नार्थ ब्रूक आरमारखात्याचे फर्स्ट लार्ड.

राइट आनरबल फार्स्टर ऐर्लंडाकरितां स्टेट सेक्रेटरी.

अर्ल किंबरली कालनीचे ह्मणजे नव्या वसाहतीचे स्टेटे सेक्रेटरी .

ड्यूक आफ अर्गाइल लार्ड प्रिव्हि कौन्सिल .

अर्ल स्पेन्सर प्रिव्हि कौन्सिलचे लार्ड प्रेसिडेंट.

राइट आनरबल जान ब्राइट डचिल्यांकयास्टरचे चान्सलर.

याप्रमाणें नेमणुका झाल्या व अजून होत आहेत. आमचे हिंदुस्थानचे हितेच्छु मि. फासेट साहेब अंडर सेक्रेटरी होतील असें वर्तमान होतें पण तसें न घडतां त्यांस पोस्टमास्तर जनरल नेमिलें. ७ वर्षांपूर्वीं लिबरल पक्षाचें वर्चस्व झालें होतें तेव्हांही ग्ल्याडस्टन साहेब मुख्य प्रधान होते व हेंच प्रधानमंडळ वेगवेगळ्या जाग्यावर होतें. विलायतच्या राज्यरीतीची रचना फार उत्तम आहे. पार्लमेंटचे होतीं मोठी सत्ता आहे. चक्रवर्तिंनी साहेबाहूनही त्यांचा अधिकार मोठा आहे. तो कसा, पार्लमेंट कसें, व त्याचे नियम काय आहेत हें आह्मी आपल्या गैरमाहित वाचकांस पुढील अंकीं कळवूं.

## नवीन गवरनर जनरल.

विलायतचें प्रधानमंडळ बदललें त्या धोरणानें एथील हल्लींचे गवरनर जैनरल लार्ड लिटन यांसही उठकळा आली. व लिबरल पक्षाचें प्राबल्य दिसतांच त्यांणीं राजिनामा पाठवून दिला. तो मान्य झाला व नवीन गवरनर जनरलची नेमणूक झाली. आतां लार्ड लिटन एक दोन आठवड्यांत परत जातील.

नवीन येणारे गवरनर जनरल मार्किस आफ राइपन हे होत. यांचें सर्व नाव राईट आनरबल जार्ज फ्रेडरिक स्याम्युएल राबिन्सन के. जी. हें आहे. यांचें वय ५३ वर्षांचें आहे. हे रोमन क्याथोलिक मताचे आहेत. व यांनां हिंदुस्थानसंबंधी चांगली माहिती आहे. सन १८६१ सालीं हे हिंदुस्थानचे स्टेट सेक्रेटरीचे हाताखालीं अंडर सेक्रेटरी होते. आणि हे लिबरल पक्षाचे आहेत तेव्हां हिंदुस्थानास सुख देतील असा भरवसा आपण बाळगूं.

**पुणें प्रदर्शन** —पुण्यास या महिन्यांत प्रदर्शन सुरू होणार आहे, तें निवळ हिंदुस्थानच्याच कारागिरीकरितां आहे. अशी प्रदर्शनें ठिकठिकाणीं वारंवार होत गेलीं तर खरोखर आमच्या देशाचें हित आहे. पुणें प्रदर्शनांत जिनसास बक्षिसेंहि वरीं लाविलीं आहेत. कमिटीचीं चार बक्षिसें शंभर शंभर रूपयांचीं व दोन पंचवीस पंचविसांचीं आहेत. तऱ्हे तऱ्हेची माती कोठें कशी आहे तिचे गुण काय आहेत. व तिजपासून पदार्थ काय काय होतात, याची माहिती नमुन्यासह देणारास एक शंभर रुपयांचें बक्षीस आहे. दुसरें दगडांच्या तऱ्हा, ठिकाणें, जिन्नस वगैरेच्या माहितीकरितां १०० रुपये. तिसरें. लाकडासंबंधी ह्मणजे वुचाचें, पांढरीचें, फेन्सलीचें, देवदारी, महागनी इत्यादि प्रकारचीं लाकडें पुष्कळ कोठें आहेत व त्यांचे पदार्थांचे नमुने आणि माहिती या साठीं १०० रुपयांचें बक्षिस आहे. व चवथें या देशांतील गवत, झाडपाले वगैरे कोठें कोणते विपुल आहेत व यांचे कोणते जिन्नस होतात त्याचे नमुने व माहिती यासाठीं १०० रुपयांचें बक्षीस आहे. त्रिलेगि बांगड्यासाठीं २५ रुपयांचें बक्षीस. आणि रेशिम व जवसाचें तेल काढण्याचे कृतीसाठीं २५ रुपयांचें बक्षीस आहे. या शिवाय होळकर सरकारचें कापसाच्या उत्तम नमुन्याकरितां १०० रुपयांचें बक्षीस आहे. श्री. सर. टी. माधवराव यांचें चवच्या कुलपासारखीं कुलपें करणारास ७० रुपयांचें बक्षीस आहे.

मृत्यू--- आह्मांस लिहिण्यास वाईट वाटतें कीं रा. रा. श्रीकृष्ण शास्त्री तळेकर मुंबई इलाख्यांतील विद्याखात्याकडील मराठी ट्रान्सलेटर यांस नवज्वर होऊन गेले आठवड्यांत शुक्रवारीं पुणें एथें देवाज्ञा झाली. शास्त्रीबावा विद्वान असून स्वभावानें फार चांगले होते. अलंकार शास्त्रांत त्यानीं परीक्षा दिली होती. मेजर क्यांडी साहेबाजवळ यांचे वडील पंडित होते. पुढें हेही ४० रुपयांवर एक्झिबिशनर झाले. आणि शेवटास क्यांडी साहेबांचेच जागेवर यांची नेमणूक होती. नागपुराकडे हे डेपुटी इन्स्पेक्टर होते व तिकडून खानदेश व नगर याही जिल्ह्यांत डि. इ. होते. त्यांची बहुतांनां माहिती आहे ह्मणून त्या सर्वांस त्यांबद्दल इळहळ वाटल्यावाचून रहाणार नाहीं.

प्रेस कमिशनरची नेमणूक कमी केली. व त्यांच्या नावानें वर्तमानपत्राच्या प्रति जात होत्या त्या बंद झाल्या असें समजतें. ही गोष्ट खरी असेल तर प्रेस कमिशनरप्रमाणें प्रेसआक्टही रहित होणें योग्य आहे.

थिबा राजाच्या मरणाची अफवा-- ब्रह्मदेशांत हल्लीं देवीच्या आजाराची सांथ फार जारीनें सुरू आहे. थिबा राजाचा वारस पुत्र नुक्ताच देवीच्या आजारानें मरण पावल्याची खबर पूर्वीं प्रसिद्ध झाली होती हें वाचकांच्या स्मरणांत असेलच. आतां थिबा राजाच्या मरणाविषयींच्याही निरनिराळ्या बातम्या येत आहेत त्यावरून तो मेला किंवा नाहीं याचा पक्का निश्चय होत नाहीं. तथापि ज्या कांहीं बातम्या आल्या आहेत त्या सारांश रूपानें पुढें दिल्या आहेत त्यावरून मंडाले एथील सांप्रतच्या स्थितीचें वाचकांस कांहीं अंशीं अनुमान करतां येईल असें आह्मांस वाटतें. ब्रह्मदेशाचा थिबा राजा हा देवीच्या आजारानें मरण पावला व त्याचें गादीवर आजपर्यंत अगदीं गुप्त ठेविलेला बळून राजपुत्र आला. थिबाराजा आजारी झाला तेव्हां १०० मुली तो बरा होण्याकरितां बळी देण्यांत आल्या असें रंगून एथील बौद्धधर्माधिकारी यांस खात्रीलायक समजलें आहे. आतां या संबंधाची दुसरी बातमी आली आहे तीवरून पहिल्या बातमीच्या खरेपणाविषयीं संशय उत्पन्न होतो. दुसरी बातमी थिबाराजा मेला नाहीं अशाविषयीं आहे. ती अशीं कीं ब्रह्मी राजा देवी आल्यामुळें विशेष आजारी आहे, तो मेला त्याच्या राजधानींत कित्येक मनुष्यांचे अन्यायानें बळी दण्यांत येत आहेत अशा प्रकारच्या ज्या ज्या अनेक बातम्या आजपर्यंत बाहेर आल्या त्या सर्व खोट्या आहेत असें वॉलेस कंपनीस मंडाले एथून आलेल्या तारेवरून समजतें. वालेस कंपनीनें ती तार प्रसिद्ध केली आहे तींतील आशय असा आहे कीं, ब्रह्मी राजा चांगला निरोगी आहे, तो आजारी नव्हता, रोज कचेऱ्या भरत असतात, शहरांत सर्वत्र शांतता आहे. मनुष्यें मारलीं गेलीं नाहींत.

The Lunatic Asylum Report of Amraoti for 1879 has been delayed in the press in its publication rather unduly and resulting also from the Resident's absence from Hyderabad.

There were 33 lunatics during the year on the roll of whom 4 were cured and discharged, and two died of pneumonia.

The accommodation is somewhat limited and it is in contemplation to erect a separate Asylum capable of accommodating 75 male and 25 female lunatics. A lunatics asylum is on the very highest authority supposed to be a benevolent institution, and not a place where, insanity is treated as a crime and incarceration its attendant penalty. According to the census of 1867 there were 788 lunatics in Berar. It has never been known that the asylum at Amraoti ever had more than 30 inmates at a time, and the number of cures effected annually since its establishment only nominal. It then naturally resolved itself into the question of what has become of the large number registered at the census. It is manifest that they are not treated at the Asylum. The new Asylum that is to be erected will in all probability fill to overcrowding ere half a score of years have rolled over. It is a puzzle incomprehensible why the existing edifice is condemned and a new site selected for a new asylum. If it is on sanitary grounds as conjectured that this change is made it is inconceivable what arguments could have been adduced to support the original project, which has resulted in the evident of loss to government by abandoning the existing building.

The revelation that "one crimi-"nal lunatic was transferred to the non-criminal" represents the source from which the non-criminal class are recruited. If the assumption is not incorrect, it is altogether a sorry principle. There are numerous cases of insane persons who would be fit subjects as inmates in a lunatic asylum, are left to their fate, simply because (1) they have not committed a breach of the laws or (2) because they are not dangerous. These of course demand the first attention of the state, but there are a great number not included in these two classes for whom an asylum would be a boon. It is understood that

insanity is a curative disease, if so the asylum should receive all maniacs regardless of peculiar recognised idiosyncracies being a necessary qualification, and maintain the reputation which it ought to of being a benevolent institution. There may be fears of abuses creeping in, similar to those detected in some parts of England, resulting from indiscriminate admissions, but with a little prudence and discretion on the part of the Suprintendent combined with the very minutest degree of watchfulness on the part of official visitors there would be very little prospects of its taking root in Berar.

Of the known cases of individuals now in the asylum the causes of insanity are attributed to.

5 to Ganja smoking
4 to opium eating.
5 to spirit drinking.
2 to epilepsy.
1 to fever or brain affection
and
2 to greef.

Narcotics eventually exhibit their deleterious effects on such persons as immoderately use them and the overwhelming majority comparatively under this head of insane noticeable from the above data is worthy of remark.

The occupation of the lunatics is confined within a limited sphere such as are governable being engaged in gardening operations twine and rope making, sweeping, water drawing and the like. The hours of their labor being from 7 to 10 in the morning and 3 to 5 in the afternoon.

The recreation allowed to the lunatics after supper is diversified by singing, dancing, discoursing native music, and indulging in popular games.

To this institution is attached,
1 suprintendent on Rs. 50 a month
1 Hospital Assistant on Rs. 70 .,
1 Jamadar on Rs. 10
2 peons at Rs. 6 each
2 Peons at Rs. 7 each
1 Bhisti at Rs. 6
1 cook at Rs. 6.

and the average compensation for dearness of grain drawn by the estabishment is Rs 7 per mensem thus making an average cost of Rs. 181 per mensem for maintaining the establishment or Rs. 2172 per annum.

The total cost of the asylum is Rs. 4107. If the cost of the establishment be deducted, then Rs. 1935 remains of which Rs. 1574 was expended in dieting lunatics or Rs. 4 per lunatic per month. Rs. 203 for clothing or Rs. 6 each per year and Rs. 8 for medicines or Rs. 0—3—10 per lunatic per year.

The cost for maintaining the establishment has been larger than that spent on the personal comforts of the inmates of the asylum and to maintain this larg establishment for 30 odd lunatics is simply false economy. The same establishment would suffice for 100 lunatics and perhaps with an additional peon or two another 103 can be supervised. It then only remains for accommodation to be provided. Then there need exist no restrictions to admissions In advocating the erection of an asylum capable of accommodating 2 to 300 lunatics instead of as is in contemplation for only 100, it is intended that the cost of the management should not be entirely borne by the state, but that the relatives of the unfortunate sufferers should, where they are found capable of doing so defray the expenses of diet and so forth. By this means there will be a class of paying as well as non paying lunatics. Criminal lunatics will of course be maintained entirely by the state.

The cost of medicines appears extraordinarily low. It goes to prove that no effort is made to ameliorate the condition of the lunatic by administering remedies tending to his cure. In the presidency town of Bombay, as well as at Nagpur lunatics undergo a regular course of treatment attended with satisfactory results, and there exists no reason to the contrary to anticipate that similar results may not be gained even in Berar

The manufacturing department in the asylum realized Rs. 70 as the sale proceeds of work turned out by the lunatics. As some of the insane refuse to work and as time allotted to them for this purpose does not exceed 5 hours a day, and making every allowance for the vagaries of their mental aberration, the outturn is passable.

---

## वऱ्हाड.

रा. रा. गोपाळराव महादेव भिडे यांची मागें लिहिल्याप्रमाणें वाशिमास क्लार्क आफ धि कोर्टचे जागीं नेमणूक झाली व एथें त्यांचे जागेवर रा. रा. परशराम जगन्नाथ यांस नेमिलें. आतां लवकरच ते येथील वहे जातील.

रा. रा बजाबा रामचंद्र डिपुटी इन्स्पेक्टर शनिवारीं रजेवर गेले. रा. रा. बाळकृष्ण लक्ष्मण शास्त्री बापट हेही या आठवड्यांत जाणार आहेत.

मि० डनलप साहेब खामगावचे स्माल काज जडज हे उन्हाळ्यांत चिखलदऱ्यास जाण्याकरितां खामगावाहून आज निघणार होते.

रा. रा. वामनराव नारायण बापट चांदूरचे तहशिलदार तीन दिवसांची रजा घेऊन एथें मित्र मंडळीस भेटण्याकरितां आले होते ते आज परत गेले.

रा. रा. बापुजी रंगनाथ एकस्ट्रा असिस्टंट कामिशनर वाशिमाहून आज एथें येऊन चिरंजिवाचे लग्नाकरितां पंढरपुरास जाणार आहेत.

मि० महमद इस्मायल एथील डिपुटी क्लार्क यांस यवतमाळास क्लार्क आफ कोर्टची जागा मिळाल्याप्रमाणें दोन दिवसांनीं ते तिकडे जातील, ते एथें आफिशिएटिंग क्लार्क आफ कोर्टचें काम करित होते त्याचा च्यार्ज त्यांनी बुलढाण्याहून आलेले रा. रा. बाळाजी राजाराम कावळे यांस दिला.

तेल्हारें येथें सऱ्याचे भावाचा उलगडा अजून चांगला झाला नाहीं. ९ दुकानदारांनीं कपाशीचा ७१॥। व जवारीचा २४ प्रमाणें भाव तोडला परंतु प्रतिष्ठित तीन दुकानदार या भावास राजी नाहींत. व पंचानीं बोलाविले असतां ते त्यापुढें जात नाहींत- त्यांनीं अपमुक्त्यारीनें कपाशीची ६९ व जवारीचा २१ रु. भाव लाविला आहे असें एकाकडून पत्र आल्यावरून समजतें.

इलिचपुरास ब्राह्मण व परभू ज्ञातींत ऐक्य नाहीं तें व्हावें याजकरितां उभय पक्षाची मंडळी १८ वे तारखेस रा. रा. बळवंत नरसिंव्ह मुधोळकर डिपुटी इजुकेशनल इस्पेक्टर यांचे एथें जमली होतीं; व त्या संबंधानें त्यांचीं भाषणें झालीं असें व. मि. वरून समजतें. वादाच्या गोष्टी धमसत राहणें किंवा वाट वाढणें यापेक्षां तो मिटविणें फार चांगलें. कोणाचा वाद मिटणें आहे तर अभिमान सोडून जरा पड घ्यावी ह्मणजे तसें करतांनां पहिल्यानें थोडें वाईट वाटलें तरी सुखकारक परिणामानें शेवटास फार संतोष होतो. इलिचपुरास शेवट काय झाला तो आमचे बंधु लिहितील तर बरें होईल.

मालेगावचे सब पोस्टस्मातर रा. रा. राजाराम वासुदेव यांस तीन महिने सक्तमजुरी कैद व ५० रुपये दंड अशी शिक्षा झाली.

नांदुऱ्यास बिगर पासाचीं सुमारें १०० शेर अफू खामगावकर शेट किसनदास देवीदास यांचे मुलाजवळ सापडली. हरभऱ्याचे पोत्यांतून चामड्याच्या पिशव्यांत ठेवलेली ही अफू मिळाली व ती पोलिसांत गुदरली.

खामगावचे साहू चैनसुक सुरतराम व तुकारामदास खुशालचंद यांची दिवाळीं निघालीं. हा कपाशीच्या सऱ्याचा परिणाम होय. या दोन दुकानांमिळून दीड लाख रुपये लोकांचे बुडाले व सऱ्यासंबंधी नुकसानी भरण्याकरितां खामगावाहून सुमार चार लक्ष रुपये बाहेर गेले असे ह्मणतात.

बाळापूर (मित्राकडून) तारीख ३।५।८०

एथें उन्हाळा जाणवूं लागला आहे तरी बाग बगीचे असल्यामुळें व नदीला थोडें पाणी असल्यामुळें स्थिति बरी आहे.

एथून जलंब स्टेशनापर्यंत लारीचे कंत्राट मि. फ्रामजी शेट पार्शी यांनीं घेतलें आहे. पण तें काम शेटजीकडून चांगल्या रीतीनें चालत नाहीं. ७।८ मनुष्य मात्र लारीवर बसण्याची जागा असतां वीस वीस मनुष्यही ते समयीं दडपून भरतात तेणें करून लोकांस अतिशय त्रास व पीडा होते. शिवाय इतकीं मनुष्ये भरल्यानें लारीवाले सर्हजच लारी चांगली चालवीत नाहींत. जलमहून रात्रीं तीन वाजण्यापूर्वीं निघालेली लारी सूर्योदयीं खामगावास आली. व पायीं येणारे लोक तिच्या आधीं आले. सबब लारीची योजना लोकांचे सुखार्थ असल्यास तें काम कंट्राक्टरकडून बजाविलें जात नाहीं या गोष्टीकडे सरकारचें लक्ष पोचावें व बंदोबस्त व्हावा अशी इच्छा आहे.

रा. रा. शंकरराव क्लार्क आफ कोर्ट यांजकडे गुरुवारीं चिरंजिवाची मुंज झाली. समारंभ चांगला झाला. त्यांचे आप्त व इष्टमित्र बरेच आले होते. साहेब लोक, पार्शी लोक, व इतर प्रतिष्ठित लोक यांस पानसुपारी झाली. मुंबईकर राधा नायकिणीचें गाणें झालें. कचेरीचा थाट उत्तम होता. रोषनाई चांगली केली होती. सर्व लोक खुश झाले.

एथील नाटकवाले रा. रा. नानाभाई मोठे अव्वूदार आहेत असें आपले पत्रांतून वाचण्यांत आलें. त्यांनीं मुंबईस शिमगा करून आपले मंडळीस छापील कार्डस् पाठविल्य त्यांतील एक आपले अवलोकनार्थ पाठविली आहे. मर्जीनुरूप उपयोग व्हावा.

इलिचपूर छावणीच्यालगत एक कांडली ह्मणून गांव आहे तेथे आग लागून सुमारे वीस घरें जळालीं नुकसान किती झालें हें समजलें नाहीं. तसेंच याच तालुक्या पैकीं करजगाव येथें आग लागून सुमारे १५० घरें जळाली व नुकसान अजमासें ५०००० रुपयांचें झालें असें कळतें. व. मि.

---

## वर्तमानसार.

मुंबईचे नवीन गवरनर सर जेम्स फर्ग्युसन बारोनेट के. सी. एम. जी . २७ वे तारखेस मुंबईस आले.

मक्का एथील शेरीफ जेद्याचे बाजारांतून फिरत असतां त्यांस एका ह्मातान्या पठाणानें भोंसकून ठार मारिलें. याचें कारण त्यानें असें सांगितलें कीं, सदहू शेरिफाकडे कांहीं कामाच्या संबंधानें गेलों असतां त्यानें कठोरपणाचें भाषण केलें होतें त्याबद्दल हा सूड उगविला.

जोधपुरचे महाराज यांचा मेवाड, जेसलमीर आणि बिकानीर या संस्थानांशीं कांहीं हद्दीसंबंधी तंटा उपस्थित झाला आहे त्याचा निकाल करण्यासाठीं महाराजांनीं एक इंग्लिश अम्मलदार सरकाराजवळ मागितला आहे असें समजतें.

कृपण मनुष्य.—रशिया देशांतील पोडोलिया या शहरांत एक मनुष्य थंडी व क्षुधा यांच्या व्यथेनें मरण पावला; कारण याचें बिऱ्हाड अतिशय स्वस्त भाड्याच्या घराच्या पोटमाळ्यांत असे व कितीही कडक थंडी पडली तरी यानें घरांत शेकोटी पेटविली नाहीं. मरण पावल्यानंतर याच्या खोलींत ३० लक्ष रुपयांचें निवळ सोनें सापडलें! या संपत्तीचा मरणारास काय बरें उपयोग! सु. प.

रा. रा. लक्ष्मणराव यादव असेलडकर इंदुराकडे मंडलेश्वरास जडज होते व त्यांस ४०० रुपये पगार होता. होळकर सरकारांनीं हल्लीं खर्च कमी करण्याचा विचार केल्यावरून त्यांस दुसरीकडे सोय पहावी असें कळविलें त्यावरून त्यानीं राजीनामा दिला व निघून गेले. रयतेनें व त्यांचे मित्रांनीं त्यांस पानसुपारीचा देत केला. एक मानपत्र वाचिलें व एक शाल्जोडी दिली. लक्ष्मणराव फार योग्य मनुष्य आहेत त्यांस होळकर सरकारानीं दूर केलें हें चांगलें झालें नाहीं.

तुर्किस्थान येथून आलेल्या बातमीवरून समजतें कीं, तिकडे अगदीं झोटिंगपाछाई चालली आहे. बिवाकचकार येथें तुर्किस्तान येथलि फौजेतून काढून टाकलेला एक शिपाई आला आहे तो अशी बातमी सांगतो कीं, याकुबखानानें तुर्किस्थानांत पाठविलेल्या काबुली पलटणीपैकीं लोक दररोज आपल्या घरीं पलटणी सोडून चालले आहेत.

पुणें —( ता. २४ एप्रिल १८८० ) लिहिण्यास अति दुःख वाटतें कीं काल एथें तीन ठळक मृत्यु घडून आले. वे. शा. सं. रा. रा. श्रीकृष्णशास्त्री तळेकर मराठी ट्रान्स्लेटर यांस मागच्या शनवारपासून विषमज्वर होऊन काल सकाळीं सात वाजतां ते स्वर्गस्थ झाले. त्याच घटकेस येथील डेक्कन काल्लेजांतील फेलो रा. रा. विष्णु रावजी जोशी हे परलोकवासी झाले. जोशी हे सुमारें १२ दिवस तापानें आजारी होते. वरील गृहस्थाचें दहन करून मंडळी नदीवरून घरीं येऊन पोंहचते न पोंहचते तों रावसाहेब हरिभाऊ सोहोनी श्रीक्षेत्र वाईचे सबा. अ. जज्ज यांस देवाज्ञा झाली. हरिभाऊ परवांचे दिवसीं सकाळीं एथें वाईहून आले. हरिभाऊ हे वाईसच तापानें अजारी पडले होते.

वरील तिन्ही गृहस्थ एकाच दिवशीं व अति अल्प काळाच्या अंतरानें मरण पावले म्हणून शहरचे लोकांस मोठा धक्का बसला आहे. विष्णु रावजी हे अल्पवयी व होतकरू होते. त्यांचा द्वितीय संबंध गेलेसालीं रा. रा. सखाराम यशवंत परांजपे यांचे कन्येबरोबर झाला. इं. प.

लार्ड लिटन यांस अर्लचा किताब मिळून, यैकौंट नेबवर्थ हें त्यांस उपनाम मिळालें.

सय्यद मन्सूर अली बंगालचे नबाब नाशीम यांची ६ वर्षांची हजीरा बेगम आणि पत्नी शरा बेगम या दोघी लंडन एथें मरण पावल्या असें समजतें.

महमद जान व महमद हसनखाँ हे मैदान एथें आहेत ते लौकर शरपुर एथें जातील असें वाटतें. अबदूलरहमान यांस जाऊन मिळण्यासाठीं पुष्कळ हत्यारबंद लोक आफगाणी टर्किस्तान एथें जात आहे.

काबूल एथें ता. १० रोजीं दरबार झाला त्यावेळीं कोहिस्थानी मलीक हजर होते. सरवरखान परवानी व मीरबचा व दुसरे कित्तीएक योग्यतेच्या गृहस्थांच्या सह्यांनिशीं पत्र गुलाम हैदर हे घेऊन गेले होते व त्यांनीं त्यांस आपला मुख्त्यार नेमला आहे म्हणून लिहिलें. मि. लेपल ग्रिफिन यांच्या सूचनेवरून गुलाम हैदर यांणीं एकंदर हकीकत तोंडानें कळविली. पुढें मि. ग्रिफिन व गुलाम हैदर यांच्या गाठीं पडून बोलणीं चालणीं व्हावयाचीं असें समजतें.

विलायतेंतत हिंदुस्थानांतील चाहाचा खप हळुहळू वाढत चालला आहे. आणि तो चीनच्या चाहास मागें टाकील असें एका चांगल्या व्यापाऱ्याचें म्हणणें विलायतेंतील पत्रांत प्रसिद्ध झालें आहे.

विलायतेंतील सर्व वर्तमान पत्रांचा मिळून वर्षाचा आठ कोटि प्रतीचा खप हल्लीं आहे असें म्हणतात.

ताज महमह हा पूर्वीं अमिरांच्या सैन्यांत दफेदार होता तो सुमारें महिन्यापूर्वी ताशकरगन एथून निघाला व ता. १९ एप्रिल रोजीं काबुलास येऊन पोचला. तो सांगतो कीं अबदुल रहिमान यानें लोकांची कत्तल केल्याविषयींची बातमी आहे ती खोटी आहे. कारण त्याच्या सैन्यांत सगळे १०० असामी आहेत. मग ७०० असामी तो मारील कोठून ? ता. २२ एप्रिलची तार.

मुंबईस एका पारशाच्या मुलाला त्याच्या बापानें घोड्यांचा खेळ पहाण्याला जाण्यासाठीं पैसे दिले नाहींत म्हणून त्यानें पाण्यांत बुडून जीव दिला.

चीन देशाची राजधानी पेकिंग एथें दंगा झाल्यामुळें तेथील जर्मनीच्या वकिलानें आपला बावटा खालीं उतरून तो शहर सोडून गेला असें तिकडील वर्तमानपत्राधारें समजतें.

पुणें एथील गणेश पेठेंत गुजराथ्याचे धर्मशाळेंत उदरानें आजारी असलेल्या एका गृहस्थाचे पोटांतून शस्त्रक्रियेनें डाक्टर भिकाजी अमृत व डाक्तर विश्राम रामजी घोले यांणीं सुमारें सात आठ शेर पाणी काढलें. याचप्रमाणें आणखी दोन वेळां तरी पाणी काढावें लागेल असा उभयतांचाही अजमास आहे.

कोहिस्तानकडील मुख्य सरदार काबुलाकडे आले त्यांत जे कित्येक इंग्लिशांस विरुद्ध होते असेही आहेत.

राणीगंज एथील कोळशाची खाण ढासळून तिच्या कांठावर असलेला म्यानेजरचा बंगला कोसळला परंतु तो, त्याची बायको व मुलें मोठ्या चमत्कारानें वांचलीं आणि खाणींत काम करीत असलेले मजूर गडप झाले.

दरवडेखोरांचा पुढारी होन्या हा अजून जिवंत असून अहमदनगराच्या आसपास एका टोळीनिशीं दरवडे घालीत आहे असें म्हणतात. मेजर ड्यानियल हे राहुरीस छावणी देऊन आहेत व रोज रोज नवे पोलिसचे लोक मेलमधून त्या ठिकाणीं येत असतात. सर्दहू दरोडखोर अन्नासाठीं दरोडे घालतात ही गोष्ट सरकारच्या नजरेस येत नाहीं असें डे. स्टा. कर्ते म्हणतात.

लार्ड लिटन व लार्ड बीकन्सफोल्ड या दोघांचे राजीनामे एकदम दिले जातील. आणि लार्ड लिटन राणी सरकारच्या खुषीनें त्यांच्या जागीं दुसरे कोणी येत तोंपर्यंत हिंदुस्थानांत रहातील.

लार्ड लिटन साहेब १२ एप्रिल रोजीं रात्रौ सिमल्यास जाण्यासाठीं निघाले. तेव्हां हावऱ्याच्या स्टेशनावर युरोपियन व एतद्देशीय लोकांचा मोठा जमाव त्यांस भेटण्याकरितां जमला होता. रेलेव स्टेशनावर व हुलगीच्या पुलावर रोषनाई केली होती. स्वारी सिमल्याहून परत येऊन आपल्या कामाचा चार्ज नवीन गव्हर्नर जनरलांस देऊन मग स्वदेशीं जातील असें वाटतें.

गिजनी शहर घेतलें— प्रेस कमिशनर यांच्या सिमल्याच्या ता. २३ च्या तारेवरून असें कळतें कीं जनरल स्टिवर्ट मुक्काम एथून ता. १९ रोजी जात असतां वाटेंत आंदारी, तुराकी सुलेमानखेल व इतर लोक मिळून १५ हजार लोक जमा झाले होते त्यांची गांठ पडली. या लो पैकी ३ हजार तरवारवाले लोक येऊन यांच्या फौजेवर पडले. लढाई एक तासपर्यंत झाली. शत्रूचे लोक चोहोंकडे पसरून जाऊ लागले. त्यांचा पाठलाग करण्यास जवळ सामान सांभाळावयाचें होतें म्हणून झालें नाहीं. तथापि सरकारची फौज नऊ मैल जऊन नानी या गावास गेली आणि ता. २० रोजीं स्वारांची पलटणें पुढें जाऊन गिजनी शहरांत प्रवेश करून तें घेतलें. शत्रूचे एक हजारावर मनुष्य मेले सर्व मिळून २ हजारांचा नाश झाला. इंग्रजांचीं १७ मनुष्यें मेलीं व ११५ जखमी झालीं. ने० ओ०

सातारा शहरास पाण्याचा पुरवठा करण्यासाठीं कास एथून पाणी आणण्याकरितां झालेला प्लयान व इस्टिमेट सरकारानीं मंजूर केलें म्हणून समजतें.

ट्रिचनापल्ली जिल्ह्यांतून एक दरोडेखोराची टोळी जात असतां तिला पोलिसानें अडवून तिचे दोन मुख्य पकडले. त्यावेळेस यांनीं बरीच गडबड केली. हे दरोडेखोर सुमारें ८ वर्षांपासून पोलिसास झुकांड्या देत होते पण शेवटी सांपडले. यांच्यामुळें दुसऱ्याही कित्येक दरोडेखोरांचा पत्ता लागल असें म्हणतात. ज्ञा. प्र.

## मुंबई इलाख्यांतील पिकापाण्याची हकीकत.

मुंबई इलाख्यांतील हवा पाणी व पीक यांच्या संबधानें तारीख १४ मिनहूपर्यंत जो सरकारि रिपोर्ट प्रसिद्ध झाला आहे त्यावरून हकीकत कळेत ती येणेंप्रमाणें:—

कराची—तारीख ३० मिनहू रोजीं कोहिस्थान एथें थोडोशी पर्जन्यवृष्टि झाली. घोराबरी तालुक्यांत उंसाची लावणी सुरू आहे. पांच तालुक्यांत देवीची साथ, एक तालुक्यांत गोंवराची साथ, तीन तालुक्यांत गुरांढोरांची साथ व सहा तालुक्यांत तापाची सांथ याप्रमाणें रोगराई आहे. तारीख ६ मिनहू रोजीं नदीस ३ फूट ४ इंच पाणी होतें. मागील सालीं याच तारखेस ३ इंच पाणी कमी होतें. शिकारपुर—नदीस ३ फूट २ इंच पाणी होतें. मागील सालीं २ फूट १० इंच पाणी होतें. १५ तालुक्यांत देवीची सांथ व ५ तालुक्यांत गुराढोरांची साथ सुरू आहे. रबीच्या पिकाची मळणी सुरू आहे. हवा उष्ण झाली आहे. रयत निरोगी आहे. हैदराबाद—रबीची मळणी सुरू आहे. तापाची सांथ चालू आहे शहादादपुर एथें गुराढोरांची साथ सुरू आहे. हवा नेमस्त आहे. उत्तरसिंद्ध सरहद्द—हवा फार उष्ण झाली आहे. आकाश कधीं कधीं मेघाच्छादित असतें. तारीख ९ मिनहू रोजी रात्रीं थोडोशी वृष्टि झाली. रबीचीं पिकें नदी किनाऱ्यास चांगलीं असून मळणीचें काम सुरू आहे. सर्व जिल्ह्यांत देवीची सांथ सुरू आहे. अमदाबाद—रबीची मळणी पुरी झाली. रयत निरोगी आहे. पंचमहाल—आकाश कधीं मेघाच्छादित असून वारा जोरानें वाहतो. खेडा—रबीची मळणी पुरी होत आली आहे. ३ तालुक्यांत तापाची सांथ सुरू आहे. भडोच—मळणीचें काम पुरें होत आलें आहे. जंबुसर व अंकलेश्वर. तापाची सांथ क्वचित सुरू आहे. सुरत—रबीची मळणी सुरू आहे. ३ तालुक्यांत तापाची सांथ सुरू आहे. खानदेश—आकाश कधीं कधीं मेघाच्छादित असतें. रयत निरोगी आहे. नाशिक—दोन तालुक्यांत सीतज्वराची साथ सुरू आहे. इगतपुरी एथें गुराढोरांची सांथ सुरू आहे. रबीची मळणी पुरी झाली. हवा उष्ण होत आहे. ठाणें—रबीचीं पिकें चांगलीं आहेत. रयत निरोगी आहे. कुलाबा—तारीख २२ मिनहूपर्यंत रिपोर्ट अलीबाग एथें गोंवर व देवीची सांथ सुरू आहे. महाड एथें तापाची साथ सुरू आहे. अलीबाग, पेण, रोहें आणि महाड एथें गुराढोरांची सांथ सुरू आहे. रबीची मळणी चालू आहे. रत्नागिरी—(तारीख ६ मिनहूपर्यंत रिपोर्ट) संगमेश्वर तालुक्यांत तापाची सांथ व रत्नागिरी तालुक्यांत देवीची सांथ सुरू आहे. पुणें—(तारीख ११ मिनहूपर्यंत रिपोर्ट) ज्वारी व बाजरीची धारण जिल्ह्यांत उतरत आहे. अहमदनगर—रबीच्या पिकाची कापणी झाली असून मळणी सुरू आहे. सोलापुर-पिकाची स्थिती पूर्वीप्रमाणेंच आहे. रयत निरोगी आहे. सातारा----हवा उष्ण झाली असून आकाश कधीं कधीं मेघाच्छादित असतें. रयत निरोगी आहे. कलादगी—विजापुर ४ दोकडे बदामी १९ दोकडेप्रमाणे पर्जन्य वृष्टी झाली. हवा उष्ण झाली आहे. पुढील खरीपाचे पिकाची पेरणी करण्यास्तव जमीन तयार होत आहे. रबीच्या पिकाच्या मळणीचें काम बहुतेक अंशानें पुरें होत आले आहे. कपाशीची वेंचणी सुरू आहे. तापाची सांथ किंचित् सुरू आहे. बेळगाव—१ इंच पर्जन्यवृष्टी झाली. जिल्ह्यांतही कांहीं पर्जन्यवृष्टी झाली. धारवाड पर्जन्यवृष्टी ५८ दोकडे झाली. तीन तालुक्यांत रबीच्या पिकाच्या मळणीचें काम सुरू आहे. कपाशाची वेंचणी चालू आहे. आठ तालुक्यांत तापाची सांथ किंचित् सुरू आहे. कानडा—समुद्र किनाऱ्यावरील प्रदेशांत रबीच्या पिकाचें मळणीचें काम बहुतेक अंशानें पुरें होत आलें आहे. येल्लापुर एथें ८३ दोकडे पर्जन्यवृष्टी झाली. तापाची सांथ सुरू आहे. राजकोट—हवा फार उष्ण झाली आहे. रयत निरोगी आहे. वडवान—हवा फार उष्ण झाली आहे. रयत निरोगी आहे. बडोदें—रबीच्या पिकाचें मळणीचें काम बहुतेक अंशानें पुरें होत आलें आहे. रयत निरोगी आहे. धारणीचें मान किंचित उतरलें आहे.

एकंदरीनें रबीच्या पिकाचें मळणीचें काम बहुतेक अंशानें पुरें होत आलें आहे. दक्षिण दिशेकडील प्रदेशांत किंचित् पर्जन्यवृष्टी झाली. २ जिल्ह्यांत गुराढोरांची सांथ, एका जिल्ह्यांत देवीची सांथ, तीन जिल्ह्यांत तापाची सांथ अशी रोगराई सुरू आहे. याशिवाय इतर रीतीनें रयत निरोगी आहे. ज्ञा. प्र.

हें पत्र अकोलें एथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत खंडेराव बाळाजी फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक १४ — अकोला, सोमवार तारीख १० माहे मे सन १८८० इसवी. — अंक १८


## वऱ्हाडसमाचाराची किंमत.

| | रु. |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ६ |
| साल अखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ०४ |
| डाक हाशील. | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| ,, अखेर | २ |

नवीन वर्गणीदार होऊं इच्छिणारे लोकांकडून अगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र सुरू केलें जाईल.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, १० ओळींचे आंत | १ |
| १० ओळीपुढें दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०३ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |

NOTICE TO CONTRIBUTORS.

*We invite the co-operation of all European and Native gentlemen in ma[illegible]aining the status of this journa[illegible]d to this end solicit contributions [illegible] the shape of News letters. stray notes &c. Contributors may rest fully assured that the confidence they place in us by sending communications will not be violated.*

## नवीन सुधारलेला मराठी सिव्हिल प्रोसिजर कोड

ह्मणजे

( सन १८७७ चा आकट १० सन १८७९ च्या १२ वरून सुधारलेला. )

## विशेष समजुतीच्या टिपा. महत्वाचे निवाडे व इंडेक्स सुद्धां.

सदर्हू कायद्याची आमची पहिली आवृत्ति संपून बरेच दिवस झाले होते इतक्यांत ह्या कायद्याच्या दुरुस्तीचा नवा आकट ह्मणजे सन १८७९चा १२वा तयार होऊन ताबडतोब अमलांत आला त्यावरून पूर्वीचे कायद्यांत फारच महत्वाचे व पुष्कळ फेरफार झाले. यामुळें पहिलीं बुकें बहुतकरून सर्व प्रकारें निरुपयोगीं अशीं जहाल्यासारखीं आहेत. सदर्हू सर्व फेरफार जागचे जागीं न आल्यानें लोकांस फार अडचण पडेल ती पडूं नये ह्मणून आजवरच दुसरी आवृत्ति काढणें राहिली. नवीन दुरुस्तीचे कायद्याचें मराठी भाषांतर गेले गव्हर्नमेंट ग्याझिटांत आलें त्या प्रमाणें यांत जागच्या जागीं सर्व फेरफार करून छापण्याचें काम सुरू आहे. या कायद्यांतील प्रत्येक अवघड कलमावर समजुतीच्या खुलासेवार टिपा व सर्व हायकोर्टाचे हें बुक छापण्यापर्यंत ह्या आकटावर झालेले महत्वाचे निवाड्यांचे साराश व इतर आधारही दिले आहेत. ग्रंथ समजुतीस व चालनास सुलभ व्हावा यासाठीं प्रथम कलमांचें विव्हेवार विवेचनही केलें आहे. सदर्हू ग्रंथ रा. रा. नारायण बापूजी कानिटकर, वकील डिस्ट्रिक्ट कोर्ट पुणें यांजकडून तयार करविला आहे. एकंदर हा ग्रंथ जितका सुलभ व सोईचा होईल तितका करविला आहे.

उत्तम टाइपानें व जाड कागदावर हा ग्रंथ तारीख २० मे रोजीं छापून तयार होईल. राहिलेला अल्पकाळ, तसेंच ह्या कामास लागणारी मेहेनत यांचे मानानें याची किंमत थोडी ह्मणजे तारीख १ मे पर्यंत पैसा भरणारांस २॥ रुपये व मागाहून घेणारांस ३ रुपये ठेविली आहे. या शिवाय प्रत्येक बुकास टपाल हशील तीन आणे पडेल. एकदम १० प्रती घेणारास टपाल हशील पडणार नाहीं.

विशेष सूचना — ह्या ग्रंथाच्या प्रति आह्मी थोड्या काढणार आहो त्याअर्थी मागाहून लोकांस अडचण न पडावी या करितां लोकांनीं पैसे भरण्याची त्वरा करावी किमतीबद्दल पैसे पाठविणें ते मानिआर्डर किंवा पुण्याची दर्शनी हुंडी पाठवावी. कोर्ट फीचीं टिकिटें मुळींच घेतलीं जाणार नाहींत टपाल हशीलासह किंमत वर लिहिलेल मुदतींत आह्मांकडे अथवा रा. रा. नारायण बापुजी कानिटकर वकील डिस्ट्रिक्ट कोर्ट पुणें, यांजकडे आली असतां ग्रंथ तयार होतांच रवाना करण्यांत येईल. कळावें. तारीख ३० मार्च १८८० इ.

भाऊ गोविंद सापकर
ज्ञानचक्षूचे मालक.

## सुबोधसार.

भाग पहिला.

यांत राजनीति वगैरे अनेक ग्रंथांतून नीतिपर, बोधक, मनोरंजक, दृष्टांतिक, व अनुभवसिद्ध असे उत्तम निवडक श्लोक प्राकृत अर्थासह घेतले आहेत. अशा ग्रंथाच्या अवलोकनानें बहुतेक व्यवहारज्ञांस विशेषेंकरून नीतिशास्त्र वगैरे विषयांची चांगली माहिती होऊन सामान्य पुरुषासही व्यवहारांत समयविशेषीं कसें बोलावें व वागावें वगैरे अनेक प्रकारचें ज्ञान होण्यासारखें आहे हा ग्रंथ जाड कागदावर शिळेच्छापानें छापून विक्रीस तयार आहे. किंमत ०१० आणे टपाल खर्च ००६ आह्मांकडे पाठविल्यास पुस्तक ताबडतोब रवाना केलें जाईल. कळावें. ता. २६ आक्टोबर सन १८७९ इ.

वऱ्हाडसमाचाराचे मालक

## कौमुदीमहोत्साहः.

या अत्यंत उपयोगी त्रैमासिक पुस्तकामध्यें " सिद्धांत कौमुदी " संस्कृत व्याकरण, आणि त्याचा शुद्ध मराठी अर्थ, स्पष्टीकरणार्थ भरपूर टीपा, आणि पाणिनीयादि सर्व आधारग्रंथ देऊन आणखीं दुसऱ्या अनेक सोई केल्या आहेत. आजपर्यंत पांच खंड प्रसिद्ध झाले. यांत संज्ञा, परिभाषा, पंचसंधि, षडलिंग. अष्टाध्यायी, गणपाठ, धातुपाठ, लिंगानुशासन, शिक्षा, अनुवृत्तीपूर्वभाग इतकें संपूर्ण झालें, पुढील प्रकरण चालू असून क्रियापदाला आरंभ केला आहे. शिवाय दोनशें शब्दांच्या संपूर्ण विभक्ति चालवून दाखविल्या आहेत. कागद चांगले, सांचा मोठा, छापणी सर्वोत्कृष्ट, प्रत्येक खंडांत १०० पृष्ठें- किंमत इतर पुस्तकांच्या मानानें फारच अल्प- ह्मणजे प्रत्येक खंडाला केवळ एक रुपया, टपालखर्च एक आणा, पण वर्षाची वर्गणी अगाऊ चार रुपये पाठविल्यास टपालखर्च माहीं. या पुस्तकाविषयीं मोठमोठ्या पंडितांनीं उत्तम अभिप्राय दिले आहेत. ज्यांस हीं पुस्तकें घ्यावयाचीं असतील त्यांहीं कृपा करून आह्मांस " पोष्टपेड " पत्रानीं कळवावें ह्मणजे पुस्तकें पाठविलीं जातील.

रामचंद्र भिकाजी गुंजीकर
कौमुदीमहोत्साहकर्ते.

मुंबई काकडवाडी घर नंबर ८

## नवीन दिवाणी कायद्यासंबंधी सर्क्युलरें

वऱ्हाडाकरितां अलीशान रेसिडेंट साहेबांनीं तयार करून रेसिडेन्सी आर्डरमध्यें जीं नवीन दिवाणी कायद्यासंबंधी सर्क्युलरें छापून प्रसिद्ध केलीं व ज्याचें मराठी भाषांतर मे० जुडिशियल कमिशनर साहेबांनीं छापवून कोर्टांनिहाय दिलें त्याच्या प्रति वऱ्हाडसमाचार छापखान्यांत विक्रीस आहेत. किंमत ६ आणे बाहेर गावीं एक आणा अधिक पडेल.

COMEDY OF ERRORS.

## कामेडी आफ एरर्स.

अथवा

## भ्रांतिकृतचमत्कार.

या नावाचें शेक्स्पियरच्या इंग्लिश नाटकाचें भाषांतर विद्वान् गृहस्थांनीं तयार केलेलें आमचे छापखान्यांत छापून विक्रीस तयार आहे. यांतील संविधानक फार मौजेचें असून हास्यरस ओतप्रोत भरलेला आहे. व ग्रंथरचनाही फार चांगली साधली आहे. असें बहुतांचे तोंडून ऐकिलें आहे. याची किंमत सहा आणे. व डाकेतून मागविल्यास हशिलाबद्दल अर्धा आणा पडेल.

वऱ्हाडसमाचाराचे मालक

## गजकरणाचें औषध.

आमचे छापखान्यांत गजकरणाचे औषधाच्या डब्या विकावयास आल्या आहेत हें औषध खात्रीचें असून यापासून गुण लवकर येतो. लावतांनां आग मुळींच होत नाहीं. औषध थंड पाण्यांत भिजवून गंधाचे उटीप्रमाणें पातळ करून स्नान केल्यानंतर लावावें. किंमत ०६ आणे.

हें औषध गजकरणा शिवायकरून खरूज व नायटे यांजवरही चांगलें प्रकारें लागू होतें.

या गजकरणाच्या औषधाच्या डब्या २ वर्षांपूर्वी आमचे छापखान्यांत विक्रीकरितां होत्या व त्यांपासून पुष्कळांस गुणही आला. परंतु अलिकडे सदर्हू औषधाच्या डब्या आमचे जवळ शिल्लक नव्हत्या व तेणेंकरून या रोगानें पीडलेलीं गिऱ्हाइकें परत गेलीं ह्मणून आह्मी त्या औषधाच्या डब्या मुद्दाम आणिल्या आहेत.

## नोटिस

सिदाजी वल्लद लक्ष्मण वस्ती सिरलें परगणें पातुर सेकबाबु तालुके बाळापुर यांस खालीं सही करणार यांजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तुह्मी तारीख १० एप्रिल सन १८८० इसवी रोजी उर्दूअखबारांत दिलेली नोटिस पावली ती अगदी खोटी आहे. तिचे उत्तर देतो कीं, तुह्मी लिहिलेली जागा तुमचे पासून आह्मी घेतली नाहीं. त्या जागेवर वडिलोपार्जित आह्मी रहात असून ती आमचे मालकीची आहे. व त्याजवर शेकडो रुपये खर्च करून आह्मी इमारत बांधली आहे. त्या जागेवर तुमचा अगर तुमचे मालकीचा बिलकूल हक्क नाहीं. त्या जागेऐवजी दुसरी जागा देण्याचें आह्मी कबूलही केले नाहीं. आह्मी तुमचेवर स्माल काज कोर्टांत फिर्याद केली होती त्या अदावतीनें ही खोटी नोटिस तुह्मी दिली आहे. आतां या नोटिशीचा खर्च आह्मांस विनाकारण झाला. तो आठ दिवसांचे आंत दाखल करावा. न केल्यास रीतीप्रमाणें तजवीज केली जाईल. कळावें तारीख ७ माहे मे सन १८८० इसवी.

( सही ) मानाजी वल्लद नानजी
आमले निशाणी खुद्द हातची.


## पत्रव्यवहार

या सदरा खालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांसः—

वि. वि. खालील मजकूर छापून प्रसिद्ध करण्याची कृपा करावी.

वऱ्हाडांत सन १८७९ सालापासून सब ओव्हरसियर लोकांस घोड्या बद्दल भता साडेसात रुपये मिळूं लागले. खरा खर्च पाहूं गेलें असतां निदान सोळा रुपये लागतात ज्यावेळेस महर्गतेनें आपले पाऊल पुढे टाकलें त्यावेळेस भता कमी झाला. नशीब त्या सब ओव्हरसियर लोकांचें. दर रोज २ शेर हरभरे व रुपयास १२ शेर प्रमाणें पांच रु-




Emery Walker Ltd. sc.

To face page 1.

पास केला व कारकुणावर मुकदमा करण्या लागा पुरावा मिळाल्याचें समजतें.

मुंबईहून सुटीमध्यें बळवंत आवाजी दिवेकर बी. ए. व रा. रा. गणेश श्रीकृष्ण खापरडे बी. ए. एथें आले होते. मंडळीस भेटून खापरडे उमरावतीस वडिलांचे भेटीस गेले व दिवेकर नाशकास गेले.

मौलवी मासुम साहेब वऱ्हाडांतील मुसलमान लोकांचे धर्माध्यक्ष गेल्या मार्च महिन्यांत परलोकवासी झाले. हे बाळापुरास रहात असत. हे आर्बी व पार्शी भाषेचे चांगले जाणते असून मोठे प्रसिद्ध पुरुष होते. यांचें हैदराबाद मोठें वजन असून निजाम शाहींतून यांस दररोज पांच रुपये प्रमाणे मान मिळत असे. त्यांच्याप्रमाणें धर्माध्यक्षाची गादी त्यांच्या मुलास मिळावी वगैरे ह्मणून यांनीं मरणापूर्वींच मृत्युलेख करून ठेविला होता. व त्याप्रमाणें मागें व्यवस्थाही केली गेली; तथापि त्यांचे दुसरे कोणी वारसदार उभे राहून गेल्या गुरुवारीं मैत मोलवी साहेबांचे थडग्यापाशी कांहीं दंगा करणार अशी बातमी आल्यावरून एथून मि० किट्स साहेब असिस्टंट कमिशनर व मेजर गनथार्प साहेब पोलिस सुप्रिंटेंडेंट हे हिंदु शिपाई व जागल्यांसह बंदोबस्त ठेवण्याकरितां बाळापुरास गेले होते.

कालिदास पुणेकर नाटककार— यांची एक टोळी खामगावास असून एक टोळी एथेंच होती. तीही गेल्या आठवड्यांत खामगावास निघून गेली. या नाटकाचे मालक रा. रा. नानाभाई गणपतराव धैर्यवान हे शिमगा करावयास मुंबईस गेले होते ते बरेच दिवस तिकडे राहिले होते. ते नुकतेच खामगावास येऊन गेल्या आठवड्यांत एथेंही आले होते पण एथील लोकांकडून शेंकडों रुपये उचापत खाऊन ते न देतां रात्रींतून सामानाच्या गाड्या भरून चालते झाले इतकेच नाहीं तर एथील धर्मशाळेप्रीत्यर्थ त्यांनीं एक नाटक केलें तो पैसा व त्या शिवाय रुपये बक्षिस देण्याचें कबूल केलें होते त्यांतून ही एक पैसा दिला नाहीं यावरून व यांच्या मुंबईतील शिमग्याच्या हकीकतींच्या छापील कार्डास यांच्या प्रत्येक नोकर लोकांच्या नावानें रवाना झाल्या त्यांतील मजकुरावरून या धैर्यवान नाटककारांच्या थोरपणाचा व सभ्य पणाचा चांगला बोध होईल.

मि. लक्ष्मीपती नायुडु बारिस्टर यांचे एथील दोघा नोकरांनीं आपले धन्याचे घरांतील कांहीं चांदीचे जिन्नस चोरून एथील सराफ मोतीसा पुंजासा डोंगरे याचे एथें गहाण ठेविले होते. त्याचा पुकारा होऊन पोलिस मार्फत तपास चालला त्यांत एका चांदीच्या लोटीचे झाकण, एक घुंगरू वगैरे माल सांपडला व मागें रा. रा. लक्ष्मण गोविंद यांजकडे चोरी झाली होती त्यांतील ही कांहीं माल सांपडला असें ऐकतों. सदर्हू दोन चोर पोलिसाचे ताब्यांत असून तपास चालू आहे.

अकोट तालुक्यांतील पिलकवडी एथील आमचे वर्गणीदार रा. रा. तुकाराम गंभीरजी यांस वेळच्यावेळीं पत्र पोंचत नसे ह्मणून यांनीं सब इन्स्पेक्टर आफ पोस्ट आफिसेस डिव्हिजन वऱ्हाड यांजकडे अर्ज केला होता त्या प्रकरणांत इन्स्पेक्टर साहेब यांनीं चांगलें लक्ष पुरवून बंदोबस्त केला याजबद्दल आह्मास संतोष वाटतो व आह्मी मि० सब इन्स्पेक्टर साहेब यांची आह्मी तारीफ करितों.

ज्यांचा बोभाटा असेल असे इतर वर्गणीदार यांनीही कळविल्यास त्यांचा बंदोबस्त होईल असा आह्मास भरवसा वाटतो.

रा. रा. गोविंदराव लक्ष्मणराव देशमुख उमरी ज्यांनीं नुकतेंच एथील लायब्ररीला व मुलीचे शाळेला १००० रुपये बक्षिस दिले त्यांस मे. डिपुटी कमिशनर साहेब अकोलें यांनीं कोणत्याही दरबारांत व युरोपियन आफिसरांसमोर खुर्ची मिळत जावी अशा बद्दल सर्टिफिकिट दिलें हें कळविण्यास आह्मास फार संतोष वाटतो.

काबुलाकडे जाण्याचे हेतूने आलेली पलटण आज बरेच दिवस एथें मुक्कामास आहे. ती आतां काबुलाकडे न जातां लवकरच हिंगोलीस जाईल असें समजतें.

चालू सालचे सुट्यांचे तक्त्यांत चंद्र व सूर्यग्रहणांचे दुसरे दिवशीची सुटी शेरीक केली आहे.

बडणेर नजीक मालखेड रेल्वे स्टेशनचे स्टेशनमास्तर व सांधेवाले यांच्या हयगईनें गाडीस अपघात झाला ह्मणून त्या दोघांवर फौजदारी खटले झाले. यांची चौकशी रा. रा. श्रीकृष्ण नरहर ए. आ. कमिशनर यांचे कोर्टांत होऊन स्टेशनमास्तर यांस १०० रुपये दंड व तो न दिल्यास सहा महिने कैद व सांधेवाल्यास सहा महिने कैद अशा शिक्षा झाल्या प्र. सि.

मागाहून आलेली नोटिस.

गुलाम लुतफुद्दीनखा जहागिरदार रहाणार पातुर शेखबाबू हल्लीं रहाणार शहर हैदराबाद व महमद अयनुद्दीन रहाणार मंगरूळपीर व पाटील पटवारी मौजे कोथळी, व मौजे साथळी, व मौजे पुनोती, मौजे जोगळखेडे व नासिराबाद व मौजे तिवसे, मौजे कात खेडे वासी गुलाम जलालुद्दीनखा व गुलाम सुजान अली खा व गुलाम फकरूद्दीन खा जहागिरदार सदरी गावचे याजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तुह्मा लोकांनीं सदरील गावाचे उत्पन्नांत कपटीकाम चालविलें कारणानें सदरीचे जहागिरीचे गावांत आह्मी स्वतः आमचे हातानें काम सुरू केलें आहे. सबब या पुढें सदरीचे जहागिरीबद्दल जें कांहीं कामकाज, शेत लावणी, व साऱ्याचा पैसा देण्याबद्दल वगैरे कोणतेंही काम जाहागिर संबंधीं जें कांहीं आहे तें सर्व काम आह्मासी करून घेऊन उत्पन्नाचा पैसाहि आह्मास देत असावा आणि आमची पावतीही घेत असावी. आह्मा शिवाय दुसरे कोणास कांहीं एक पैसा देऊं नये. जर कोणी दुसऱ्यास पैसा दिला तर त्याची जबाबदारी तुमचेवर आहे. आह्मी जें जें नुकसान होईल तें तें दुपटीनें तुह्मापासून भरून घेऊ आणि मागील सालाबद्दल वगैरे रुपये तुमचेकडे राहिले आहेत त्याचा हिशेब एक महिन्याचे आंत आह्मास दाखवून सर्व पैसे आह्मास द्यावे. न दिल्यास त्याबद्दल तुह्मावर फिर्याद करून खर्चासुद्धां रुपये भरून घेऊ कळावे तारीख ९ माहे मे सन १८८० इसवी.

(सह्या) गुलाम जलालुद्दीनखा जहागिरदार द० फार्शी.
गुलाम सुजात अलीखा जहागिरदार द. फार्शी.
गुलाम फकरूद्दीनखा जहागिरदार द. फार्शी.

## वर्तमानसार.

हिंदुस्थानचे नवीन गवरनर जनरल १९ वे तारखेस इकडे येण्याकरितां निघणार आहेत. लार्ड लिटन साहेब पर्जन्य पडल्यावर सिमल्याहून येतील व विलायतेस जातील.

मार्किस ल्यांडस्डोन यांस हिंदुस्थानचे अंडर सेक्रेटरी नेमिलें.

रशियाचे बादशहाचा नुकताच वाढदिवस झाला तेव्हां जर्मनीच्या व आस्ट्रियाच्या बादशहांनीं आपले दोनशें हत्ती या आनंदोत्सवानिमित्त रशियन राजधानींत बादशहाकडे पाठविले होते.

नागपुराकडून-रायपुराकडे जाणाऱ्या रेलवेचा एक तुकडा ३४ मैल गेल्या आठवड्यांत सुरू झाला.

देव मामलेदार हरी भक्तिपरायण यशवंतराव महाराज यांची स्वारी मनमाडास आहे.

धोंड मनमाड रेलवेचे पुलाचें बहुतेक काम पुरें होत आलें आहे, या पावसाळ्यामध्यें गाडी बंद होणार नाहीं असें ह्मणतात. जून महिन्यापासून चालू कामाची वहिवाट सरकार जी. आय. पी रेलवेकडे देणार असल्याचें वर्तमान आहे.

ठाण्यास शिमग्याच्या संबंधानें रस्त्यांत लिळ्ल्याबद्दल तिघां मनुष्यांवर माजि. मि. कुवरजी यांच्या आग्रहामुळें जो एक खटला झाला होता व जो दुसऱ्या माजिस्त्रेटाकडे पाठवावा ह्मणून डिस्त्रिक्ट माजिस्त्रेटांकडे गेला होता त्याबद्दल डिस्त्रिक्ट माजि. यांणीं योग्य ती माहिती मिळवून शेवटीं हा गुन्हाच होत नाहीं असें ठरवून खटला कमी करून टाकला असें खटल्याचे उत्पादक माजि. मि. कुवरजी यांस लिहिलें असें समजतें व त्याबद्दल डिस्त्रिक्ट माजि. हे परकीय असतां यांणी जे आपले विचार दाखविले त्याबद्दल सर्व लोक आनंदांत असून त्यांचे आभार मानीत आहेत.

गारो डोंगरांतल्या लोकांनीं ज्या कित्येक देवांच्या मूर्ती केल्या आहेत त्यांत महाराणीची मूर्त केली असून ती फिरंग्यांची माता ह्मणून ते तिची पूजा अर्चा करतात!

काबुलच्या दवाखान्यांत दररोज सुमारें १४२ रोग्यांस औषध मिळतें.

इंग्रजीराज्यव्यवस्थेस कंदाहारचे लोक फार खुष आहेत व हीच राज्यव्यवस्था राहावी अशी यांची इच्छा आहे असें ह्मणतात.

गेल्या मार्च महिन्यांत मुंबईबंदरांतून ६३,८१० खंडी किंमत १,४३,१०,९८१ रुपयेचा कापूस बाहेर गेला.

लढाईंतली लूट छपवून नेण्याची अफगाणलढाईंतील बाजारबुणग्या लोकांनीं एक नवी युक्ती काढली आहे असें दिसतें. असें सांगतात कीं, खेलांत येथें सामान सुमानाची तपासणी करीत असतां एका गवतकापणाराच्या घोड्यास दोन खोगीरें असल्याचें आढळलें. पैकीं आंतल्या खोगिरांत मिळविलेली जवाहीर वगैरेची लूट भरलेली होती. तसेंच दुसऱ्या एकानें बऱ्याच किंमतीचा रेशमी माल छपवून ठेवल्याचें आढळलें.

झुलुलढाईंत पडलेल्या लोकांच्या कवट्या विलायतेस नेल्या असून अफगाणलढाईंत पडलेल्यांच्याही मागविल्या आहेत. अ. द.

बडोदे एथें एका ब्राह्मणकुलांतील स्त्री एका प्रसिद्ध ब्राह्मणज्ञातीच्या गृहस्थाच्या घरीं असून उभयतांचा प्रसिद्ध रीत्या शरीरसंबंध हार चालू असल्याकारणानें सदर्हू स्त्रीच्या पतीनें घटस्फोटाचा विधि ता० २० मार्च रोजीं यथाशास्त्र केला असतां तेथील कित्येक शास्त्रीमंडळीनें जारकर्मी स्त्री पुरुषांस यथाशास्त्र बहिष्कारादि दंड करण्याचे खटपटींत न पडतां उलट त्यांच्याच पक्षास मिळून घटस्फोटाचे कर्ते,-करविते, व तो करावा ह्मणून शास्त्रार्थ सांगणारे, अशा तिघांस बहिष्कृत केलें आहे, असें इं० प्र० पत्रावरून समजतें

दर्भंगाच्या महाराजांप्रमाणेंच भावलपुरचे तरुण नवाबही शिकारीच्या कामांत प्रसिद्धीस येत चालले आहेत; त्यांनीं गेल्या महिन्यांत कानपुरा नजीक दोन मोठाले वाघ मारले.

मणीपुराहून अशी खबर आली आहे कीं, चुसद एथील दरवडेखोरांस शिक्षा करण्याकरितां जे लोक पाठविण्यांत आले होते, ते त्या दरवडे खोरांचें रिकामें पडलेलें गांव जाळून परत आले. कुकी लोक ब्रह्मदेशचे हद्दींत पळून गेले आहेत. परंतु तेवढ्यावरून ब्रह्मदेशाशीं कांहीं तंटा उपस्थित होईल असें वाटत नाहीं.

हल्लीं महाबळेश्वरें एथें नवीन जाणाऱ्या लोकांस रहावयास जागाही मिळत नाहीं इतकी खीच झाली आहे, असें समजतें.

सर जान स्ट्रेची यांनींही पण आपल्या कौन्सिल मधील मेंबरच्या जागेचा राजीनामा दिला व ते आतां लवकरच हिंदुस्थान सोडतील, अशी बोलवा आहे. आतां पुढें येणाऱ्या लोकांची राज्यरीति कशी काय होणार याजबद्दल सिमल्यास मोठी चळवळ सुरू आहे.

मार्किस ऑफ रायपन यांस हिंदुस्थानचे व्हाइसराय नेमिलें असें २८ व्या एप्रिलच्या लंडन एथील तारेवरून कळतें.

एक बातमीदार लिहितो कीं, सर माधवराव यांच्या सुधारलेल्या राज्यव्यवस्थेमध्यें बडोद्याची स्थिति सुधारत चालली आहे. त्या संस्थानांत पब्लिकवर्क्स, रेलवे व ट्रामवे यांची सुरवात होणार आहे. मुंबईच्या ट्रामवे कंपनी पैकीं मि० किंड्रज यांची या कामांत वकील सल्ला मसलत घेत आहे.

नेपाळ प्रांतांत पिकाची स्थिति चांगली आहे. तथापि तेथील राजधानीचे शहर खटमंडू एथें हल्लीं यात्रा फार जमल्या कारणानें पटकीचा आजार उद्भवला आहे.

मद्रासेकडे कालवे व पाटबंधारे बांधण्याच्या कामाप्रीत्यर्थ जी कंपनी आहे ती कालव्यांच्या बाजूनें बातमी पोंचविण्याकडे तारायंत्राचे ऐवजी टेलिफोन. (दूरश्रविवाहक) यंत्राचा उपयोग करूं लागण्याच्या विचारांत असल्याचें समजतें. इं. प्र.

जनरल सर डोनल्ड स्टयुअर्ट यांनीं ता. १९ एप्रिल रोजीं यश मिळविलें याजमुळें व जय होतांच त्यांनीं गिझनीस हस्तगत करून घेतल्यामुळें त्याची फार वाहवा होत आहे असें तिकडील तारेवरून समजतें.

गिझनी जवळची लढाई.-- ता. १९ एप्रिल रोजीं गिझनीपासून दोन टप्यांच्या अंतरावर अहमद खेल येथें जनरल स्टुअर्टच्या फौजेवरावर अफगाणी लोकांचा साम्ना होऊन इंग्लिशांस जय मिळाला व शत्रूचें अतिशय नुकसान होऊन गिझनींत इंग्लिशांचा शिरकाव झाला. या लढाईंत आफगाण लोकांनीं पुष्कळ शौर्य दाखविलें परंतु इंग्लिशांच्या तोफखान्यापुढें व बंदुकीपुढें त्यांचें कांहीं चाललें नाहीं. आफगाण लोकांकडे ३० हजार पायदळ व तीन हजार घोडेस्वार होते. ही लढाई दीड तास चालली होती.

सर वुइलियम जोन्स हे प्रवास करीत असतां त्यांस आटलांटिक महासागरांतील जोहाना बेटांत एका मशिदीवर हा लेख आढळला:— जग आपली उन्नता करून घेण्यासाठीं आहे. मोठ मोठे वाडे बांधण्यासाठीं नाहीं. आयुष्य धर्माचरणासाठीं आहे विषयोपभोगासाठीं नाहीं. संपत्ति परोपकारार्थ आहे. अधाशीपणानें संग्रह करून ठेवण्यासाठीं नाहीं. ज्ञान चांगलीं कर्में व्हावींत ह्मणून आहे पोकळ वाद विवाद करण्यासाठीं नाहीं. ने. ओ.

धरणीकंप.—गेल्या फेब्रुवारी महिन्याच्या २३ व्या तारखेस पहाटे १ वाजण्याच्या सुमारास जपानांत पाकोहामा येथें धरणीकंपाचा धक्का बसला तो सुमारें २० सेकंड पर्यंत अनुभूत होता व तेणेंकरून फार नुकसान झालें असें जपान मेलच्या आधारें अ. र. कर्ते लिहितात.

मागें विद्याकल्पतरु नावाचें एक मासिक पुस्तक निघत असे व त्याच धरतीवर विद्यामाला ह्मणून एक पुस्तक अलीकडे रत्नागिरीस निघत असतें त्याचा गेल्या वर्षाच्या मे महिन्याचा अंक या आठवड्यांत बाहेर आला हें पाहून नवल वाटतें. व्यवस्थितपणा थोडा जास्त होईल तर बरें असें आह्मास वाटतें.

नाशीकच्या गंगेंत एक ठिकाणीं स्नानें करण्याची महारांची वहिवाट असून तेथें त्यांणीं स्नानें करूं नये अशी म्युनिसिपालिटीनें नोटिस लावली होती, पण वहिवाटीप्रमाणें आह्मी स्नान करणार असा महारांनीं आग्रह धरल्यावरून आसि. कलेक्टर यांणीं त्यांस तेथें स्नान करण्याची परवानगी दिली असें समजतें.

कंदाहार एथें इंग्रजी रीतीप्रमाणें सुधारणुकेच्या कामांस आरंभ व्हावयास लागला. तेथें "कंदाहार न्यूज" ह्मणून एक लहान पत्र निघूं लागलें. लायब्ररीची व क्लबची लवकरच स्थापना होईल असें ह्मणतात.

नाशीक एथील खजिन्यांतून सहा लक्ष रुपये प्रयागाकडे रवाना झाले असें समजतें.

मीठ लावलेली मासळी नेणाऱ्या एका मनुष्यास गोव्याच्या हद्दींत एका पोलिसानें अडविलें व मासळींचें मीठ चोरीचें आहे असें ह्मणू लागला. व त्यावरून त्या उभयतांत मारामारी सुरू झाली व दुसरेही पुष्कळ लोक आले व बरीच मोठी मारामारी होऊन त्यांत एक मेला व दोन्हीकडचे कित्येक लोक जखमी झाले व त्यावरून चवकशी सुरू आहे असें ह्मणतात. अ. द.

## दानधर्म

देयमार्तस्य शयनं परिश्रान्तस्य चासनम्।
तृषितस्य च पानियं क्षुधितस्य च भोजनम्।

अर्थ — रोग्यास बिछाना, श्रम पावलेल्यास आसन, तृषितास उदक आणि क्षुधितास भोजन द्यावें)

या देशांत इंग्रजी राज्य झाल्यापासून अनेक फेरफार झाले व होत आहेत. त्यांतून कित्येक देशाची उन्नति करणारे आहेत. व कित्येक त्याची दुर्दशा करणारे आहेत. कोणचे फेर देशोन्नतीस कारण होत आहेत. व कोणते त्याची दुर्दशा करणारे आहेत याविषयीं मतभेद होईल. तथापि प्रत्येक मनुष्यानें आपापल्या प्रमाणें दाखवून, अमक्या गोष्टींपासून देशाचा फायदा होत आहे. व अमक्यापासून नुकसान होत आहे हें सांगणें इष्ट आहे. लोकांस सन्मार्गाचा उपदेश करीतें असतां तर अशा प्रतिपादनाची फारच अवश्यकता आहे.

चांगल्या गोष्टी ह्मणजे ज्या गोष्टीपासून देशाची खरी उन्नति होत असे प्रकार ह्मटले ह्मणजे विद्येचा सार्वत्रिक प्रसार होय. दुसरी त्याच प्रकारची ह्मटली ह्मणजे जीवित व वित्त यांचें रक्षण होय. सडका व अनेक सुधारणा, ज्यांचें वर्णन करण्यास पुष्कळ ग्रंथ लागतील अशा सुधारणा इंग्रजी राज्य झाल्यापासून झाल्या आहेत. हे फायदे ज्या गोष्टीपासून झाले आहेत त्या अशा असंख्य गोष्टी आहेत. तेव्हां त्यांची आपण स्तुति करूं लागलों ह्मणजे अशी आपली स्थिति होते कीं यच्चावत् जितक्या ह्मणून इंग्रज लोकांच्या गोष्टी आहेत त्या सर्वच पूज्य. व जितक्या ह्मणून पुरातन गोष्टी आहेत त्या सर्वच वाईट. आमची दानधर्म करण्याची रीत वाईट, आमची रहाण्याची रीत वाईट, आमचें जेवण वाईट, एकंदरीत जें कांहीं ह्मणून आमचें तें सर्वच वाईट आहे असा आपला समज होत जातो. आतां इंग्रज लोक अशी आपली निंदा करितात हें वाजवीच आहे. कारण आपण स्वराज्यभ्रष्ट झालो आहोत व ते विजयी आहेत. ग्रीस देशाची अशीच अवस्था झाली होती. रोमन लोक त्यांचे राज्यकर्ते होते तेव्हां ग्रीस लोकांस ते लबाड बोलणारे ह्मणत असत.

असो, तात्पर्य काय कीं इतर लोकांनीं आपणास कितीही नांवें ठेविलीं तरी आपण आपली पूर्ण परीक्षा केल्यावांचून कधीं कोणाचें ऐकूं नये. आणि ही गोष्ट विशेषेंकरून राष्ट्रास फारच लागू आहे, तर करितां आपण आपले देशास कदापि नांवें ठेवूं नये. ही स्वकीय रीतीभातीची निंदा करण्याची चाल इतकी माजली आहे कीं, आमचा धर्म वाईट त्यांत बिलकूल सत्यांश नाहीं. पश्चिमदेशीय धर्म उत्तम. त्याचप्रमाणें आमची दानधर्म करण्याची रीत फारच वाईट, अयोग्य व अविचाराची होय असा लोकांचा ग्रह झालेला आहे. व उत्तरोत्तर अधिक होत जात आहे. याला प्रमाण वर्तमानपत्रांतून वारंवार सरकारास सूचना येत असतात कीं जसा इंग्लंडामध्यें "पूवरला" ह्मणून भिकार लोकांसाठीं कायदा आहे त्याप्रमाणें आमच्या देशांतही व्हावा. आतां ह्या सूचना सरकार मान्य करील किंवा न करील याविषयीं आह्मांस कांहींच सांगणें नाहीं, परंतु हा कायदा आपणास किती अपायकारक होईल याविषयीं दोन शब्द सांगणें आहेत.

इसवी सन १८७६–७८ च्या दुष्काळ प्रीत्यर्थ हिंदुस्थान सरकारास सुमारें ११ कोट रुपये खर्च आला तरी दुष्काळपीडित लोकांस साह्य व्हावें तसें झालें नाहीं. इंग्लंडांत त्याच वेळीं, पूर ला वर २१ कोट रुपये एक वर्षांस खर्च झाले. हिंदुस्थान सरकारची प्रजा एकंदर २५ कोटि आहे. ह्या पैकीं सर्वच लोक दुष्काळानें ग्रासिले नव्हते परंतु मुंबई व मद्रास या दोन इलाख्यांत दुष्काळ पडला होता त्यामुळें निदान एक कोट लोक तरी दुष्काळाच्या तडाक्यांत सांपडले असतील आणि वरचे २१ कोट रुपये केवळ १० लाख मनुष्यांकरितां इंग्लंडांत खर्च झाले. यावरून अजमास कसा काय होतो, ऐन दुष्काळांतसुद्धां आमच्या लोकांचा धर्म पुष्कळ असतां हीं धर्मशाळा वगैरे उपयोगाच्या गोष्टीकडे झाला नाहीं. तर सर्वांहून श्रेष्ठ उपयोग जो प्राण वाचविणें त्याकडे झाला. आणि या ११ कोटीचा बोजा प्रजेवर पडतो. जरी सरकार पैसा खर्च करितें तथापि पैसा लोकांचाच खर्च होतो. वर सांगितलेली जरी गरीब लोकांकरितां तजवीज केली आहे तथापि जे इंग्लंडांत दरिद्री आहेत त्यांचें दारिद्र्य कमी झालें आहे काय? उकीरड्यावरील अन्न खाऊन कितीएक दरिद्री लोक आपला निर्वाह करितात असें वारंवार ऐकण्यांत येतें. इंग्लंडांतील गरीब लोकांची स्थिति अत्यंत निकृष्ठ आहे अनाचार व पाप ह्यांनीं तर त्यांच्यांत आपली वस्तीच करून टाकिली आहे. स्त्रीपुरुषांची जी स्वाभाविक मर्यादा असते ती सुद्धां त्यांच्यांत रहात नाहीं. पुरुष व बायका एकाच ठिकाणीं राहतात तेव्हां नीति त्यांच्यांत कशी राहत असेल याचा आपणच विचार करावा. चोरी व खून वगैरे जीं घोर पापें तीं अशा दरिद्र्यांच्याच हातून होतात. जसे मागें आपल्या देशांत ठग व पेंढार असें त्याचप्रमाणें खुद्द लंडन शहरांत चोराचे अड्डे आहेत. त्यांच्या रस्त्यांतून गेलें असतां परत जीवंत सुखरूपपणें येणें कठीण साहेब लोक बैबलाचें महत्व सांगूं लागले ह्मणजे अशी एक गोष्ट सांगतात कीं अमका अमका एक पाद्री अशा चोरांच्या अड्ड्याकडे निर्धास्तपणें जात असता, यावरून बैबलाचें महत्व सिद्ध होवो अगर न होवो परंतु हे लोक किती दुष्ट झालेले असतात ह्याचा अजमास आपणास मिळतो.

कोणच्याही देशांत कशीही व्यवस्था असो दरिद्री लोक ह्मणून एक जनसमूहाचा वर्ग रहावयाचाच. अर असें आहे तर त्यांच्यासाठी कांहीं एक तजवीज केली पाहिजे. आणि ही तजवीज सरकाराकडून झाली असतां प्रजेवर कराचा बोजा फार होतो व तसें करूनही सर्व दरिद्री लोकांची व्यवस्था लागत नाहीं हें आपणास इंग्लंडच्या इतिहासावरून कळतें. जातीचा हिंदु तेव्हां इंग्रज लोकांच्या चालीविषयीं मला मत देण्याचा अधिकार नाहीं. तर खुद्द इंग्रजांचीच साक्ष घ्या. विलियम डिगबी यांणीं गेल्या दुष्काळाचें वर्णन या नावाचा ग्रंथ केला आहे. त्यांत ते ह्मणतात कीं हिंदुस्थानांत भिकाऱ्यांसाठीं "पूवर ला" ची जरूर नाहीं आणि जर केला तर प्रजेवर कराचा बोजा फार होईल. शिवाय ते ह्मणतात कीं जेव्हां ख्रिस्ती धर्म हिंदुस्थानांतील लोकांचा धर्म होईल तेव्हां गोरगरीबांच्या व्यवस्थेचा कायदा व खर्च अवश्य होईल. या वाक्यावरून डिगबी साहेबा सारख्या विद्वान मनुष्यास तो कायदा आपले देशांत असणें इष्ट वाटत नाहीं. सरकारनें मग या संबंधानें नसावें हें जर जरूर आहे तर या गरीब लोकांची जी व्यवस्था करणें ती लोकांकडेसच आहे. जर लोकांकडे आहे तर त्याची लोकांनीं कांहीं तरी तजवीज केली पाहिजे.

ही तजवीज योजण्याचे प्रकार दोन आहेत. एक, फार सधन लोकांनीं मोठमोठाल्या उपयुक्त शाळा घालून त्यां द्वारें अनाथांचें रक्षण करणें व दुसरा सर्व लोकांनीं आपआपल्या शक्त्यनुसारें यथामति अनाथांची भिक्षा रूपानें संकटें दूर करणें हा होय. आह्मांस वाटतें ह्या दोन्ही प्रकारच्या गोष्टीची अवश्यकता आहे, कारण ज्यास फार खर्च लागणार अशीं मोठमोठीं कामें कितीही गरीब एकत्र जमून होणार नाहींत. परंतु ज्यांस परमेश्वरानें राव केलें आहे. त्यांनीं केली असतां अशीं कामें होणार आहेत. सर जमशेटजी जीजीभाई यांचा रोगीशाळा किंवा डेव्हिड सासून यांची अपराधी बालकांकरितां शिक्षणशाळा ही पहिल्या प्रकारचीं उदाहरणें उत्तम होत.

दुसरा प्रकार दिसण्यांत मोठ्या महत्वाचा दिसत नाहीं, परंतु त्यापासून काम किती होतें याचें प्रत्यंतर पाहणें असल्यास कांहीं वर्षांपूर्वीं जो भयंकर दुष्काळ पडला होता तो उत्तम होय. दुष्काळपीडित लोकसंख्येच्या मानानें व तो होता त्या काळच्या अवधीच्या मानानें पाहतां सरकारास अकरा कोट रुपये खर्च यावा हें मोठें आश्चर्य आहे. परंतु आपल्याकडे भिक्षा घालण्याची जी चाल आहे त्याचा विचार केला असतां ती फार उपयुक्त आहे हें वरच्या गोष्टीवरून आपल्या अनुभवास येतें. ह्या भिक्षा घालण्याच्या रितीनें पुष्कळ मानव प्राण्यांस अन्न मिळून त्यांनीं कांहीं दिवस टिकाव धरिला. ही रीत जर नसती तर लोकांची मोठी दुर्दशा झाली असती ह्यांत तिळप्राय संशय नाहीं असें बहुत विचारी व सुज्ञ इंग्रजांचें ह्मणणें आहे.

परंतु ह्या रीतीचा जो अन्यथा उपयोग झाला आहे, तिकडे आपल्या लोकांनीं विशेष लक्ष दिलें पाहिजे. जे रोगी आहेत त्यांसच औषध व शयन दिलें पाहिजे. जे श्रान्त झाले आहेत त्यांसच आसन देणें आहे, जे तृषित आहेत त्यांसच पाणी पाजिलें पाहिजे व जे क्षुधेनें व्याकूळ झाले आहेत त्यांसच अन्नदान केलें पाहिजे. परंतु जे लोक पुष्ट व ज्यास स्वतःच्या घामानें पोट भरण्याचा तिरस्कार त्यांस देऊन उपयोग नाहीं व अशास देण्याविषयीं परमेश्वराची आपणास आज्ञा नाहीं. सत्पात्रीं दान करणें यासारखें सुख नाहीं. परंतु सत्पात्र कशास ह्मणावें याविषयींचा वरचा लेख ध्यानांत ठेविला पाहिजे. अशा प्रकारें दान धर्म केला असतां त्याचें श्रेय फार आहे. सु. प.

हें पत्र अकोलें एथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत खंडेराव बाळाजी फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक १४ अकोला, सोमवार तारीख १७ माहे मे सन १८८० इसवी. अंक १९

## वऱ्हाडसमाचाराची किंमत.

| | रु. |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ५ |
| साल अखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ०४ |
| डाक हाशील. | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| ,, अखेर | २ |

नवीन वर्गणीदार होऊं इच्छिणारे लोकां कडून अगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र सुरू केलें जाईल.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, १० ओळींचे आंत | १ |
| १० ओळीपुढें दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०३ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |

NOTICE TO CONTR BUTORS.

*We invite the co-operation of all European and Native gentlemen in maintaining the status of this journal and to this end solicit contributions in the shape of News letters, stray notes &c. Contributors may rest fully assured that the confidence they place in us by sending communications will not be violated.*

## नोटिस

भुलाई मर्द एड्या महार वस्ती पिलकवडी प्रगणे पंचगव्हाण तालुके अकोट इला खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं तुजकडे आमचे ४० रुपये व शिवाय एक वर्षाचें व्याज येणें आहे हे रुपये आह्मी तुला दोन चार वेळ मागितले तरी तूं दिले नाहींत ह्मणून ही मुद्दाम नोटिस देण्यांत आली आहे ही पावल्यापासून पंध्रा दिवसांचे आंत सर्व रुपये देऊन आमची पावती घ्यावी असें न केल्यास दिवाणी कोर्टांत फिर्याद करून सर्व रुपये भरून घेऊं व येणेंकरून कोर्टखर्च तुजवर बसेल. या नोटिसीचा खर्च तुजपासून घेतला जाईल. कळावें तारीख ३ मे सन १८८० इ.

( सही ) तुकाराम गंभिरजी पाटील पिलकवडीकर दस्तुर खुद.

## पत्रव्यवहार

या सदरा खालील मजकूर पत्रकर्त्याच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांसः—

वि. वि. पत्रकर्ते महाराज मी फिरत फिरत दक्षिणेंत गेलों होतों इकडे जें या चालू काळास अनुसरून झालेली हकीकत समजली ती अशीः—

या प्रांतीं मी आज बरेंच दिवस फिरत आहे. व हे दिवस भरउन्हाचे आहेत तथापि आपल्या वऱ्हाडापेक्षां इकडे उष्णता पुष्कळ अंशानें कमी आहे व हवा बरीच रमणीय असते.

अहमदनगर जिल्ह्यांतील राहुरी एथें रहाणारा गंगाराम नाईक गोळसे यास व त्यांचे कनिष्ट मुलास फाशी देण्याचा ठराव झाला व त्या ठरावावर अपील होऊन त्या अपिलाचे चवकशीची तारीख २० मे सन १८८० इसवी ही नेमिली आहे. या गृहस्थास फाशीची सजा होण्याचें कारण असें समजतें कीं, यांनीं आपले वडील हुलास मारून रहाते घरांतील विहिरींत टाकून दिला. व या कृत्यास त्याचे कनिष्ट चिरंजीवानें सहाय केलें. वडील चिरंजीवास बापानें मारण्याचें खरें कारण काय असावें हें पक्कें समजत नाहीं. तरी असें ऐकण्यांत आलें आहे कीं वडील मयत चिरंजीवाची बायको जारिणी असल्यामुळें हें कृत्य उद्भवून असे मोठे घराण्यांतील दोन पुत्र व एक बाप यांचा समूळ ऱ्हास होण्याचा प्रसंग येऊन ठेपला. जारकर्माचें परिणामाचें हें एक ठळकसें उदाहरण समजलें पाहिजे.

मनमाडपासून दौंडपर्यंत रेलवेचे दरम्यान गोदावरी, प्रवरा व मूळा नदीचे पूल तयारीस आले आहेत एत्या पावसाळ्यांत बहुतकरून आगगाडी बंद होणार नाहीं असें वाटतें.

नगर, पुणें, सोलापुर व सातारा या ४ जिल्ह्यांत शेतकरी लोकांकरितां केलेला दिवाणी प्रकर्णी नवीन कायदा चालू केल्यापासून इकडील दिवाणी कोर्टांचीं कामें फार कमी झाली आहेत. ती अशीं कीं ज्या कोर्टांत सालीना चार हजार मुकद्दमे फैल होत होते त्या कोर्टांत पांचशें होत नाहींत असें समजतें. तथापि त्या जिल्ह्यांत अधिक मुनसफ नेमण्याचा विचार सरकारांत चालू आहे असेंही समजतें. लोभ करावा ही विनंती. कळावें तारीख १० मे सन १८८० इसवी.

एक प्रवासी.

---

तेल्हारे– तारीख ८ मे १८८०

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः—

वि० वि० आमचे एथील सट्याचे संबंधानें आपले पत्री थोडा मजकूर आल्यावरून एथील घडलेली हकीकत आपणाकडे पाठविली आहे ती मर्जीनुरूप प्रासिद्ध व्हावी.

तेल्हारें एथें रुईचा व जवारीचा सवदा फाल्गुन शुद्ध १५ चे कराराचा होत आहे त्याप्रमाणें साल मजकुरीं सवदा झाला. सवद्याचे भावाचा उलगडा फाल्गुन शुद्ध १५ स झाल्यावर सर्व दुकानदार लहान मोठे गावांतील धर्मशाळेंत गोळा होऊन चार इसम दोन माथेवाले दोन पोतेवाले सर्व दुकानदाराचे मतीनें चौघे पंच भावाचा उलगडा करितात. त्याप्रमाणें साल मजकुरीं झालें नाहीं. व ९ दुकानदारानी दर सालची रीति सोडून इसरदास अखेराम याचे दुकानावर जमा होऊन त्याहीनें आपले मतीप्रमाणें बेरीतीनें भावाचा उलगडा केला त्यावरून दुसरें दिवशीं सर्व गावचे १८ दुकानदारांनी जमा होऊन त्या नऊ दुकानदारास बोलावणें पाठविलें परंतु ते कांहीं आले नाहींत नंतर अठरा दुकानदारांनीं विचार करून रुईचा भाव दर ६९ प्रमाणें व जवारीचा भाव दर २१ प्रमाणें उलगडा केला असें आह्मी ऐकिलें. कळावें तारीख ८ माहे मे सन १८८० इसवी.

एक रहिवाशी.

---

पंढरपुर—तारीख ३० एप्रिल १८८० ज्ञानप्रकाशकर्ते यांस—वि. वि.

बाजारभाव—जोंधळे दर रुपयास ०८२॥= ०८२।॥, गहूं ०८९, तुरी हरभ्याची डाळ ०८१।॥, ०८२, तांदूळ ०८१८—....०८१। करडी ०।॥ पायली वजनी माप तूप दर मणी रुपये ८....८। गूळ १।॥ रुपये साकर ४....४॥— मिरची २।....२॥ तेल २॥ प्रमाणें भाव असून तेल खेरीज करून बाकी सर्व जिनसांस मंदी आहे.

ऋतुमान—उष्णतेच्या योगानें अंगाची आग हीं दिवस होत असे, विषमज्वराची सांथ उद्भवून कांहीं सजीव नरतनूस निर्जीव वर्गांत जावें लागलें. आलीकडे प्रखर उष्णतेनें होणारी आग कमी होऊन ज्वराचेंही पाऊल मागें दिसतें. उष्णमापक नलिकेंत पारा ९०–९८ अंशपर्यंत भ्रमण करीत असतो. वारा कधीं उत्तर, कधीं पश्चिम आणि कधीं पूर्व अशो दिशांनीं वाहत असतो. काल परवा आसपास थोडा पाऊस पडल्याचें ऐकतो. ढगांच्या स्वाऱ्या हल्लीं बऱ्याच आकाशांत संचार करूं लागल्या आहेत.

चैत्रीची यात्रा—या खेपेस मागील एक दोन सालांपक्ष यात्रा ज्यास्ती येऊन रोगराई वगैरेच्या तडाक्यांत न सांपडतां कमिटीस सुमारें ३९०० रुपये कर देऊन आपापल्या गावाकडे चालती झाली.

पैका मिळविण्याची शैली—म्युनिसिप्यालिटीनें करसंबंधी बसाविलेल्या नाक्यांचे बाहेर दोन हातांवर असलेल्या मनुष्यावर देखील कराची तोहमत नसावी व अशीचें वहिवाट सर्व नाकेभर चालत असतां नदीच्या नाक्याच्या पलीकडे सुमारें पांच पंचवीस हातांचे आंत शिंगणापुराकडून आलेले यात्रेकरू पंढरपुरांत न येतां परभारे नाक्याच्या पलीकडून जात असतां त्यांस नाकेदारांनीं नदीचें स्नान केलें एवढ्या सबबेवरूनच पकडून नाक्याचे हद्दींत आणून सोडावें हे जरा बरे दिसत नसावेंसें वाटतें. कित्येक अशी युक्ति लढवितात कीं, जरी ते नाक्याचे हद्दींत नव्हते तथापि त्यांनीं चंद्रभागेचें स्नान करून एथील यात्रेसंबंधी करावयाच्या ज्या दोन मुख्य गोष्टी ह्मणजे देवदर्शन व स्नान त्यापैकीं स्नान झाल्यानें निम्मे ह्मणजे आठ आणे पुण्य त्याच्या पाकीटांत पडलें असतां चार आणे कर देण्यास काय हरकत आहे. असेंच थोडेंसें विवेकचातुर्य पुढें चालविलें तर दुसरी ही युक्ति सांपडेल ती ही " पंढरीचा वारा यम कांपे थरथरा" या न्यायानें पंढरपुरावरून वाहत गेलेला वारा ज्या गृहस्थास लागेल त्याची यमपुरी चुकेल. असा वारा खाऊन यमपुरी चुकविणारांस करोंच झपाट्यांतून सोडणें ही एक कमिटीची मेहेरबानी पेक्षां कसुरीच समजली पाहिजे.

हांसत करावें आणि रडत भोगावें—यंदाच्या यात्रेंत बरेच लबाड लोक पकडले गेले. त्यांत चिंतु देवधर या नावाचा इसम दुबार टिकिटे विकल्याचे तोहमतींत सांपडून देन महिन्यांचे सक्त मजुरीचे कैदेंत गेला दुसरा एकजण पैसे घेऊन माणसें सोडणार तोंच त्यास पकडून एक महिन्याचे कैदेंत घातलें आणखी दोन इसम कच्चा कैदेंत आहेत. ते पक्कींत जातात किंवा कच्चींत राहतात तें पाहावें. खोटीं तिकिटें करणाराचा अद्याप थांग नाहींच. अशा प्रकारच्या गुन्ह्याची चंगळ या खेपेस कां उडाली कोण जाणें. कोणी ह्मणतात इन्स्पेक्टर लोकांच्या दक्षतेमुळें गुन्हे पकडले गेले. आणि कोणी ह्मणतात कीं यात्रेसंबंधी नाकी वगैरेच्या व्यवस्थेंत फेरफार झाल्यामुळें लोकांस गुन्हे करण्याची सवड सांपडली. दोन्ही कारणें खरीं असण्याचा संभव आहे, पण कोणतें खरें असेल तें असो. कसें जरी असलें तरी या प्रसंगीं आह्मी इन्स्पेक्टर लोकांची तारीफ करून कमिटीस असें सूचवितों कीं अशा लोकांस उमेद येऊन त्यांनीं झटून काम करावें असें कांहींतरी खाद्य कमिटीकडून त्यांस मिळालें पाहिजे. बड्या लोकांच्या मंजुऱ्या एकवटतील तर हें सहज होईल.

साहेबी वागणूक व एका वकीलाचा उपमर्द——आह्मी असेंच संध्याकाळीं सहज नदी किनाऱ्यानें फिरत असतां मामलेदार कचेरींत दिव्याचा प्रकाश पाहिला. ह्मणून आंत गेलों आणि तेथें बसून थोडा वेळ झाला नाहीं तोंच एक मोकदमा निघाला. तो बहिवाटीचा होता. इतक्यांत एक गृहस्थ बाहेरून आंत आले आणि तेथें पडलेल्या एका रिकाम्या खुर्चीवर जाऊन बसले. मामलेदाराच्या प्रश्नावरून आपल्याम या खटल्यांत वकील पत्र आहे असें त्यांनीं उत्तर दिलें. या बोलण्यावरून ते वकील आहेत असा आह्मी तर्क बांधला. "आमची कांहीं हरकत नाय" असें मामलेदार सदर वकीलास बोलले. असो. पुढें वादीची जबानी सुरू झाली. वकिलानीं उलट तपासणी करितां कांहीं प्रश्न विचारले ते मुद्दास लागू नाहींत ह्मणून मामलेदारानीं आक्षेप घेतला, त्यावर ते प्रश्न मुद्यावर लागू आहेत असें सिद्ध करून दाखवूं असें वकील बोलत असतां आमचे माजिस्त्रेट साहेब खो, खो, हासले. आमची बुद्धी कोती असल्यामुळें या हशाचा प्रकार आमचे लक्षांत आला नाहीं. पुढें काम चाललें असतां वकी

...नी आणखी एक प्रश्न विचारला. तो मामलेदार यांनीं आपले भर्षेत साक्षीदारास विचारावे, असा माझा प्रश्न मुळींच नहीं ... वकील बोलल्यावर " तुझी याचा प्रश्न ... धर्वा. आह्मास समजत नाय' असें मामलेदारांनीं ... शिरिस्त्याच्या कारकुनास ... वकील व मॅजिस्ट्रेट हे उभयतां ... ब्राह्मण असून एकच भाषा बोलणारे असतां एकाची भाषा दुसऱ्यास न समजणें हें मोठें आश्चर्य नव्हे काय? दुसऱ्या साक्षीच्या वेळेस असाच गडबडगुंडा होऊन हंशाचा मासला वरच्याप्रमाणेच उडाला. अखेरीस उलट तपासणी चालू असतां अमुक प्रश्न मुद्याला लागू नाहीं अशी तक्रार मामलेदारांनीं केल्यावरून कोणत्या कलमावरून हा प्रश्न मुद्यास लागू आहे असें मी सांगतों, असें वकील बोलतांच आमचे रावसाहेब, " बरें करा आमची कांहीं हरकत नाय; पण वेळ व्यर्थ खर्च होतो, कारकुनास उगीच त्रास्याहार्ते लागतें." अर्थातच या बोलण्याचा वकिल्यास घुस्सा येऊन पुढें परस्परांची पुष्कळच बाचाबाच झाली. अखेरीस तुमच्यापुढें आमची काम करण्याची इच्छा नाहीं असें ह्मणून वकील तडकाफडकी उठून चालते झाले. ठीकच आहे. भरकोर्टांत अशा प्रकारचा उपमर्द कोणास सहन होणार! आतां मामलेदार साहेबांस आमची अशी सूचना आहे कीं, त्यांनीं साहेबी थाट सोडून द्यावा आणि हायकोर्टानें पास केलेले विद्वान वकील आपले कोर्टांत काम चालविण्यास आले असतां त्यांचा उपमर्द न करतां त्यांस योग्य रीतीनें वागविण्याची तजवीज ठेवावी.

सेवाधाऱ्यांनीं वडऱ्यांवर दिवाणी कोर्टांत नुकसानीबद्दल दावा केल्याचें समजतें. कच्ची हकीकत पुढील पत्रीं देण्यांत येईल. पत्रविस्ताराची माफी असावी. कळावें लोभ असावा हे विनंती.

आपला,
पंढरपुरकर.

---

## वऱ्हाडसमाचार.

मिति वैशाख शुद्ध ८ शके १८०२

---

## रा. रा. यशवंतराव महादेव साधु मामलेदार.

" साधवो नहि सर्वत्र " असें ह्मण आहे. ह्मणजे साधु सर्वत्र असत नाहींत ते क्वचित असतात अतएव दुर्मिळ आहेत. साधु शब्दाची व्याख्या अशी आहे कीं कामक्रोधादि सहा षड्रिपु ज्यानें धुवून टाकिले तो साधु. एवढ्या पदवीला मनुष्य येणें ह्मणजे तो विशेष कोटींतलाच असला पाहिजे. अडनावाचे साधु पुष्कळ आढळतात पण ते बहुतेक ढोंगी, त्यांत खरें नाणें सापडत नाहीं. गोसावी, बैरागी, बुवा, महाराज हीं सर्व नामें साधुवाचक आहेत व अशांचा मेळा आपले देशांत फार मोठा आहे परंतु तो बहुधा सर्व नामधारी- एवढेंच नव्हे, लोकांत पीडाकारक ह्मणून त्यापासून त्यांचे स्वतांचा उद्धारही होणें अवघड, मग त्यांचा जगास उपभोग व्हावयाचा दूरच राहिला. हे असले साधु गावांत राहून फंद माजवितात. बायकांस मुलें देतात, लोकांस नादीं लावितात, सकपट वागतात, आपली तुंबडी भरतात व कधीं कधीं फटफजिता करून घेतात. असले साधु काय कामाचे? ज्याच्या मनाची पूर्ण तयारी झाली नाहीं व खरोखर ज्यानें सहा शत्रु जिंकिले नाहींत त्याला कधीं कोणी साधु ह्मणू नये. व तो बळेंच आपणास तसें ह्मणवीत असेल, आणि पिनलकोडांत आधार असेल तर खोटें नाव चालविण्याबद्दल त्यांनां सजा असावी! कोणास कदाचित् हा आमचा लेख कठीण वाटेल परंतु फसगफल्लीपासून अलग राहण्यास यापासून मोठा उपयोग होईल. अस्तु. आतां यशवंतराव महाराजांविषयीं आह्मी कांहीं लिहितों.

व्यवहारांत राहून साधु बनणें फार अवघड आहे. परंतु आनंदाची गोष्ट ही कीं आमचे यशवंतराव महाराज उत्तम व्यवहारज्ञ असून चोख साधु आहेत. कारकुनीचे कामापासून मामलेदार होऊन व बहुत वर्षें काम चालवून ते शेवटास साधु झाले आहेत. तथापि त्यांनां लोकांनीं साधु ह्मणणें मनापासून अगदी आवडत नाहीं. मी साधारण मनुष्य आहे. माझ्या पाया पडूं नका, असें ह्मणून त्यांच्या कोणी पाया पडूं लागला तर ते उलट त्यांच्या पाया पडतात. त्यांनां भेट व नवस घेऊन लोक जातात परंतु ते त्याचा स्वीकार करीत नाहींत. ज्याच्या वस्तु त्यास परत देतात. ढोंग, दांभिकपणा, अहंता किंवा मोठेपणाचे देखावे त्यांचे नाहींत. शांतवृत्ती अति उत्तम आहे. कुटुंबवत्सल आहेत. कोणी त्यांकडे गेला असतां अति आदरानें व फार सौम्यतेनें ते त्याशीं भाषण करितात. साधुचा त्यांणीं कांहीं वेगळा वेष केला आहे असें नाहीं. व व्यवहारीक मनुष्याच्या कृतीहून त्यांची भिन्न कांहीं कृति आहे असें नाहीं. व काम, क्रोध, लोभ, मोह, मद आणि मत्सर हे सहा शत्रु यांनीं खरोखर जिंकिले आहेत. असें त्यांचे सांनिध्य झालें असतां कळून सहज येते. यांपासून कोणास कसलां उपसर्ग नाहीं. उलट लोकांनाच यांनां अतिशय उपसर्ग आहे. यांचे पदवंदनावर लोकांचा इतका मारा असतो कीं बिछान्याचे पाय बहुतकाल सुजलेले असतात. पैशाची अडचण असली तरी भक्तांची पुरवास दाटी कांहीं कमी नसते. गोसावी, बैरागी, हे कधीं कधीं येऊन भिक्षेकरितां व गांज्याच्या पैशाकरितां महाराजांस इतका त्रास देतात कीं, शीघ्रकोपीच नव्हे पण समंजस मनुष्यही त्यायोगें त्रासून त्या भिकाऱ्यांस पोलिसांत पाठवील, पण यशवंतराव महाराज कांडीमात्र व्यग्र न होतां त्यांचे आर्जव करीत असतात व त्यांची दाढी धरून विनवणी करीत असतात कीं बाबा, आज गांजाला दोन पैसे घ्या उद्या ४ देईन. व ते कर्जदारी दाखल तंटा करीत असतात व महाराज त्यांची तोडजोड करीत असतात. किती हें स्वस्थ वृत्तीचें उत्तम उदाहरण! यशवंतराव महाराज तुमची धन्य आहे! व तुह्मी खरे साधू आहा आणि ईश्वराचे घरीं तुमचें साधुत्व खरोखरी रुजू होईल. गुरुमंत्र देणाऱ्या व चेले बनवून हिंडत फिरणाऱ्या साधूपेक्षां हे साधु शतपट नव्हे पण सहस्रपट चांगले यांत संशय नाहीं.

आमचे दक्षिण हिंदुस्थानांत आज बहुत वर्षें आह्मी दोनच खऱ्या व प्रसिद्ध साधूविषयीं ज्ञात आहो. एक अक्कलकोटकर महाराज व दुसरे हे यशवंतराव महाराज. त्यांतून पहिले पैशाचे वृत्तीनें वागत असत ह्मणून त्यापेक्षां लोक यांत अधिक वाखाणीत तथापि तेंही खरें नाणें होतें. परंतु ईश्वर अवकृपेनें तें जगतास बहुतकाल लाधलें नहीं त्यास ईश्वरानें आपले सन्निध नेलें. तेव्हां हल्लीं काय ते हे एकच साधु दक्षिण प्रांतांत आहेत तर परमेश्वरानें लोकोपकारासाठीं यांस बहुतकालमर्याद वांचवावें व यांजपासून लोकांस सुखानुभव होऊं द्यावा अशी आमची इच्छा आहे.

हे साधु स्वतां कोणास गुरुमंत्र किंवा उपदेश देत नाहींत परंतु यांची सद्वृत्ती पाहून लोकांनीं तो उपदेश अंतःकरणीं घेऊन चिरकाल ठसवावा व तसें सोज्वळ वृत्तीचे व्हावें यांत मोठा उपयोग आहे. यशवंतराव महाराज लोकांपासून दक्षिणा घेत नाहींत व कोणाचें कांहीं फुकट घेत नाहींत. व कांहीं व्यावसाय धंदा करीत नाहींत. तरी संस्थानिका सारखा हजारो रुपयांचा त्यांचा खर्च चालू आहे. हा खऱ्या विभूतीचें लक्षण त्यांच्या ठायीं असल्यावाचून कदापि चालणार नाहीं. लोकांनीं त्यांस पैसा दिल्यास तो ते उसनवार घेतात व त्यांची जमा करून ठेवून पुढें फेडितात. हल्लीं ते मनमाड मुक्कामीं आहेत त्यास ३ महिने झाले नित्य दर्शनास येण्यांची आगगाडींतून व बैल गाड्यातून शेकडो लोकांची दाटी असते. त्यांचा थोडे दिवसांत भुसावळेकडे येण्याचा बेत आहे. इंग्लिश सरकार त्यांस मामलेदारीचें पेनशन देत होतें परंतु तें त्यांनीं घेतलें नाहीं. त्यांचा हेतु असा कीं आपण नोकरी करण्यास समर्थ असतां निर्निमित्त पेनशन घेऊन खाणें अन्याय होय. अहाहा! हा हेतु किती स्तुत्य आहे! त्यांस अजूनही उमेद आहे ह्मणतात कीं आपण एकादे नेटिव संस्थानांत जावें व नोकरी करून लोकांचें ब्रह्मस्कारच्छावें. हाही हेतु असला तर चांगला आहे. व तो परमेश्वर सिद्धीस नेईल तर फार चांगलें होईल.

---

The Marquis of Ripon has been offered the Viceroyalty of India and has accepted it. Before him the probability rested on Lord Dufferin Mr Goschen and the earl of Kimberley to each of whom the Viceroyalty had been offered and had been refused. The Marquis we learn is a thorough politician and having held high offices of responsibility is not to be lightly thought of. His religious belief has created a regular sensation among the Journalists of India and we have been bewildered at the extreme tendency of cross comments elicited by each of them. The Journals specially devoted to religion on the protestant side are very caustic in their remarks, while the secular journals are more moderate in their expressions. We have not been able to form an idea of the views of the Catholic organs, not being favored with such exchanges. However these various riders have intuitively set us a meditating on the prospects before us and whether the new Governor General would do Justice to his name and title. The conclusion arrived at is, that the scare appears to be groundless. For what has the religious belief of the Governor General to do with the efficient management of India. Lord Ripon was previous to his conversion to the Catholic faith a thorough protestant and the grand master of all the masonic lodges in England and Europe (for it is a well known fact that the lodges in Europe aknowledge England as the propagator of masonic principles abroad.) Until he makes an avowal ( publicly ) not of his faith but of the cause which led to it, we have no means of knowing the cause of his sudden change but it is patent to all that his conversion has been as thorough as was his former conviction. His being a catholic may be a cause of slight satisfaction to the catholic population and perhaps of a sullen displeasure to the protestant, but it is manifest that India is neither catholic nor protestant but mainly composed of Hindoos and Mahomedans. The christian population is scarcely 2 per cent and to us natives the integrity of the empire, and peace at home, and given a living, it matters very little of what creed the Governor General may be. Our apprehensions ought rather to be arosused seeing a christian Governor General but we are not sure with what spirit it would have been received had Lall Mohun Ghose succeeded in being elected a member of Parliament and the Governor Generalship of India given him. We are decidedly of opinion that it would be uncharitable to anticipate evils of a nobleman who has been vastly popular and posseses all the pride of "high birth." The Parliament is now composed strongly of the Democratic element and we are assured that the best selection has been made. Notwithstanding his difference in belief we are sanguine the coming Viceroy will meet, particularly from the Hindoo people, with an enthusiastic reception.

---

During the quarter ending 31 st March 1880, there were in In[illegible]8 Government savings ल्ला. चोरस्या counting 1761 depo- झापान असतs. 9, 95, 123 and 2258 withdrawals of Rs. 44, 66, 182 plus 5504 of interest; leaving in the hands of the Banking agency a balance of Rs. 42, 11, 460. Similary. Berar possesses two banks and there were 103 depositors during the quarter banking 11,118

Rs. There were 40 withdrawals amounting to Rs. 5193 plus Rs.1-8 as interest leaving a balance of Rs. 88,806.

Saving affords a means of aggrandizing the state. When the national wealth is abundant, there is less of taxation. We cannot understand why the mercantile community are distrustful of Government savings banks, and we are equally surprised at a restriction placed by Government on amounts that may annually be placed in banks. We are well aware that savings to be secure, the nation opening banks must be one guided by the opinions of the people. If moneys entrusted to banks could at any moment be appropriated by the state there would be no security. This could only happen under a despotic Government. It is our privilege to be governed by a free nation and one highly civilized; and therefore thrift encouraged would develop the wealth of the nation. In England there are penny savings banks opened for the work people and these work people are encouraged to save as much as they can, and instead of investing in the gin and beer shops, to place their surplus in these banks. We would be glad to see similar banks started in India, also for we know that the national debt can always be abated by means of these banks and the more the national wealth increases, we are sure there will be lessening of taxation for as much money as is saved tant amounts to capital in the hands of the state.

There are few of the Marwadees who venture to deposit their savings in Government savings bank. Evidently they have misgivings as to the security of the banks or they do not appreciate the rate of interest guaranted. If the former we should say that it is simply a delusion, but if the latter, the Marwadi class may be compelled to accept a low rate of interest if every workman was encouraged to save, and to avoid taking loans, for it is an infallible certainty that where there is no saving there is debt; and if these petty savings are numerous few would have recourse to the money lender, and the rate of interet must as a matter of necessity fall. They would then gladly deposit their surplus monies with a Government savings bank.

The Beraree has much to be thankful to the local government for the lively interest exhibited in his behalf. The Resident has ruled that all appointments of less than Rs.100 should in future be filled up by Berarees in preference to outsiders, we heartely welcome this piece of intelligence and hope it will operate as an incentive to many to qualify themselves for the various appointments under government in Berar for which they have every means at their disposal by the facilities afforded them through the Educational department.

## वऱ्हाड.

हवामान — उष्णता दिवसें दिवस अधिकाधिक होऊं लागली आहे. सकाळचे ८ ९ वाजल्यापासून तों सायंकाळचें ४ वाजेपर्यंत ओणवा लागल्यासारख्या झळा येत असतात. अंगाची आग होते व चैन पडत नाहीं. केव्हां केव्हां वारा सुटून अवेंही येतात. तेणेंकरून बरींच मुलें ताप, खोकल्यानें व गोवर कांजिण्यानें आजारी होतात. आज काल लग्न मुंजीचीही शहरांत व प्रांतांत बरीच गर्दी चालू आहे. फळभाज्या व पालेभाज्या या दुर्मिळ झाल्या आहेत. तरी अंब्याचा बाजर द्वितीयेच्या चंद्राप्रमाणें दिवसें दिवस वाढत आहे.

---

उमरावतीस प्रदर्शन व्हावयाचें ह्मणून गतवर्षापासून घाटत होतें व तें प्रकरण अलिशान रेसिडेंट साहेबांपर्यंत जाऊन दिवस फार थोडे राहिले सबब १८८१ चे जानेवारींत प्रदर्शन व्हावें ह्मणून ठरलें होतें. नंतर त्याविषयीं कांहींच हालचाल दिसेना ह्मणून तो बेत आतां रहित झाला असावा असें लोक तर्क करूं लागले होते; परंतु तसें कांहीं नसून त्याविषयीं तजवीज चालू आहे असें प्र. सिं. वरून समजतें.

---

मि० लक्ष्मीपती नायडु एथील बारिस्टर यांचे घरीं चोरी करणारे दोघे नोकर यांची चौकशी होऊन रामडू नांवाचे नोकरास ६ महिने सक्तमजुरीची कैद व दुसरा तुलशीराम ह्यास वीस फटके अशी सजा झाली.

---

एथें असलेली हैदराबाद कंटिंजंटची १ वी पलटण वरसातीचे दिवस काढण्याकरितां हिंगोलीस जाणार होती परंतु डाक्टर लोकांचे अभिप्रायावरून वगैरे ती आतां उमरावतीस जाणार असें ह्मणतात व या पलटणीचे कंमांडर इन चीफ यांस ३०० तट्टे खरीद करण्याचा हुकूम झाल्याचेंही कळतें.

---

पश्चिम वऱ्हाडचे एक्झिक्युटिव्ह इंजिनियर मि० क्रेग साहेब यांस आपले हेड क्वार्टर उन्हाळ्यापुरतें बुलढाण्यास नेण्याविषयीं परवानगी झाल्यावरून हल्लीं ते बुलढाण्यास जाऊन राहिले आहेत.

---

इकडील फर्स्ट क्लास असिस्टंट कमिशनर मेजर बुलक साहेब आज बरेंच दिवस विलायतेस रजेवर आहेत. ते येत्या जनच्या १९ वे तारखेपर्यंत इकडे येतील व उमरावती डेपुटी कमिशनरचे कामाचा च्यार्ज घेतील. व मि० निकोल्टूस साहेब पूर्ववत् स्माल काज कोर्टाचें काम पाहूं लागतील असें समजतें.

---

मि० किटूस साहेब एथील असिस्टंट कमिशनर गेले आठवड्यांत बंदोबस्ताकरितां बाळापुरास गेले होते ते या आठवड्यांत एथें परत आले. तेथें मेत मौलवी साहेबांचे वारस आपसांत दंगा करणार. ह्मणून जें वर्तमान होतें त्याप्रमाणें दंगा बखेडा कांहीं झाला नाहीं. हें कळविण्यास आह्मास संतोष वाटतो. आतां हक्काचे संबंधानें तो तंटा जरी चालावयाचा असला तरी तो दिवाणी कोर्टांतून चालेल हा राजरोश मार्ग. बाकी इंग्रज सरकारा सारख्या सुधारलेल्या राज्यरीतींत खाजगी हक्काबद्दल दंगा बखेडा करण्याची जरूर नाहीं सामोपचारानें सर्व कांहीं होतें.

---

एथील स्टांप वेंडर रा. रा. नारोबा कोंडाजी यांचे दुकानाचें कुलूप गेले सोमवारीं रात्रीं चोरट्यांनीं तोडून आंतील पेटी नेली त्यांत रुपये व स्टांप कागद मिळून शंभर रुपयांवर माल गेला असें कळतें पोलिसाकडून तपास जारीनें सुरू आहे अजून पत्ता लागला नाहीं.

---

सन १८६७ इसवी सालीं आपले वऱ्हाडांत खाने सुमारी झाली होती त्याप्रमाणें सर्व हिंदुस्थानची लवकरच खानेसुमारी होणार आहे. व इलाखे इलाख्यांतून त्याबद्दल व्यवस्था चालू आहे. त्याप्रमाणें अलिशान रेसिडेन्ट साहेबांनीं मि० डन साहेब यांस वऱ्हाडचे खानेसुमारीकरितां कमिशनर नेमिलें आहे. व मागील कागदपत्र पहावयास ते लवकरच हैदराबादेस जातील. यांचे मागें मि० हेर साहेब असिस्टंट कमिशनर हे लॉंमगावास स्माल काज जडजाचें काम पहातील असें समजतें.

---

एथील खजीन्याचे तपासणीकरितां मे० कमिशनर साहेब यांनीं मि० हेर साहेब असिस्टंट कमिशनर वाशीम यांस नेमिल्याचें कळतें.

---

गेल्या शुक्रवारीं दिवसाचे चार वाजतां ताजना पेठेंत एका मुसलमानाचे घरीस आग लागली होती. वेळेवर पोलिसाची व लोकांची मदत पोंचल्यामुळें ती जागच्या जागी विझवली गेली नाहीं पेक्षां अनर्थ व्हावयाचा. ही आग लागण्यास कारण चुन्याच्या भट्टींतील विस्तव झाला असें समजतें तेव्हां अशा प्रकारच्या भट्या घरांत करण्या पेक्षां गावा बाहेर एकीकडे पेटविल्या असतां बरें होईल असें आह्मांस वाटतें.

---

उमरावती तालुक्यांत नांदगांव पेठ येथें बळिरामपंत बाबा पांडे यांचे येथें तारीख १४ एप्रेल १८८० रोजीं घरफोडी होऊन सुमारें १३२६ रुपयांचा माल चोरटे लोकांनीं ३ पेट्यांत कपडा, सोनें, चांदीचे डागीनें व रोखरुपये मिळून काढून भरला. इतक्यांत चोरटे लोकांस पोलिसांनीं तेथच्यातेथेंच पकडलें. चोरटे ९ होते त्यां पैकीं ६ इसम घरांतच धरले जाऊन तीन माळवदावरून पळाले त्यां पैकीं दोन इसमांचा पाठलाग फारच त्वरेनें झाला ह्मणून ते लागलीच पकडले आणि एक पळून गेला. चोरट्यांपाशीं तलवार व काठ्या वगैरे सामान असता हीं त्यांस पकडलें. जेव्हां त्यांस पकडण्याची पोलिसानीं गडबड केली तेव्हां मंगलशिंग नावाचे इसमाचे हातांत तरवार असून त्यानें अंधारांत पोलिसचा मनुष्य समजून एक हात मारला तो खांद्यावर गेला व चिहू कुणबी या नावाच्या मनुष्यानें एक काठीचा दुसरा सेख भालू का. याचे हातावर मारला आणि तितक्यांत एक अनुसिंग ह्मणून चोरटा कवेलूचे पडवीवरून चढून पळून जाऊ लागला त्यास सेखभालू का. यानें बर्छा टोचला त्यामुळें अनुशिंगच्या पाठींत जखम लागून तो कांहीं दिवस अस्पिटलमध्यें मांदा होता, तो दुरुस्त झाल्यावर या खटल्याची चौकशी रा. रा. श्रीकृष्ण नरहर ए. अ. क. यांचे कोर्टांत चालू झाली आहे. एकंदर फिर्यादी तर्फे पुरावा होऊन ८ इसमांवर चार्ज ठेविले गेले. आरोपी लोकां पैकीं नंतर एकचा मंगलशिंग खेरीज करून चिहू, तात्या, विठू, बाळ्या, बापु, नारायण व अनुशिंग यांणीं आपल्या बऱ्यापत्रांत साक्षी दिल्या आहेत त्यांच्या चवकशीची तारीख आजची आहे. आरोपी पैकीं मंगलशिंग, चिहु, बापू, व नारायण या चार इसमाच्या मे. तहशिलदार यांचे समोर गुन्ह्याला कबूल असल्याबद्दल जबान्या झाल्या आहेत. ह्या गुन्ह्याची बातमी अव्वल दोन महिन्यापासून चीफ कान्स्टेबल रा. रा. मनोहरपंत यांस मिळाली असल्यामुळें मोठ्या युक्तीनें व हुशारीनें हे गुन्हेगार धरले गेले.

प्र. सिं.

---

यंदा एथील घोड्याच्या शर्तींचा समारंभ तारीख २।३ व ४ नवंबर रोजीं होण्याचें ठरलें. अलिशान रेसिडेंट साहेबांनीं नेटिव घोड्यांच्या शर्यती करितां जो पैसा लागेल तो देण्याचें कबूल केलें आहे. हें कळविण्यास आह्मांस संतोष वाटतो. तसेच वऱ्हाडांत दर वर्षीं घोड्यांचे प्रदर्शन करण्याचेंही सरकारानें मंजूर केलें आहे.

उ. अ.

---

इलिचपुरास लोकवार्ता आहे कीं हल्लीचे मेळघाट एथील तहाशिलदार यांची बदली यवतमाळचे क्लार्क आफ कोर्टचे जागीं झाली व त्या बाबतींत कांहीं पत्रव्यवहारही सुरू आहे, परंतु असें खरोखर घडेल असें आह्मास वाटत नाहीं. व घडण्यास योग्य सबळ कारणही नजरेस येत नाहीं. पहावें अखेर परिणाम काय होतो तो.

ब. मि.

---

## वर्तमानसार.

भयंकर आग — गेल्या शुक्रवारीं कोल्हापुरास. रा० रा० वामनराव गोविंद रानडे वकील यांचे घरास मरदोन प्रहरीं आग लागून फारच नुकसान झालें. सदरहू आग विझविण्याकरितां पुष्कळ लोकांनीं व म्यु० कमिटीनें फारच मदत केली असून पाणी नसल्यामुळें व्यर्थ गेली. या आगींत कित्येक पक्षकार लोकांचे बरेंच नुकसान झाल्याचें समजतें व कित्येक पक्षकारांचे अर्धे मुर्धे दस्तैवज मिळाले. एकंदर नुकसान सुमारें कागदपत्र व जिनगी सुद्धां ४०,००० वर झाल्याचे बोलतात.

सु. सिं.

सातारचे श्री० आबा सा० भोसले यांस छत्रपती ह्मणू नये ह्मणून इंग्रज सरकारचे अधिकारी यांजकडून सूचना झाल्या, यामुळें आमचा नाइलाज आहे. फर्स्ट क्लास सरदार बनले.

म. मि.

हल्लीं आफगाणिस्थानांत शेतें तयार झालेलीं असल्यामुळें अशावेळीं कांहीं लढाई वगैरे सुरू होऊं नये. कारण लढाई सुरू झाल्यास तयार झालेलीं शेतें फुकट जातील अशी आफगाण प्रजेची इच्छा आहे.

थोड्या दिवसांवर गयास्टेशनावर स्टेटरेलवेचें एक एंजिन पेटलें व त्याच्या योगानें तयील एका खेड्यांतील घरें व शेतें जळालीं असें ह्मणतात.

जबलपुर हें दरोड्यांचें मुख्य ठिकाण आहे असें ठगी व डाकायटी खात्याच्या आफिसरांचें मत आहे.

बावी एथें हरी रामोसी असल्याची बातमी ज्या मनुष्यानें प्रथम कळविली त्या मनुष्यास सरकारानें बावी एथील पाटीलकीचें वतन वंशपरंपरे बक्षीस दिलें असें कळतें.

गेल्याचे मागील आठवड्यांत मेडसिंग तालुके सांगोलें या गावीं दरवडा पडला. या दरवड्यांत एक दोन इसमांस जखमाही झाल्या आहेत. अ. द.

न्युयार्क एथें बायकांस विद्याखात्यांतील कोणत्याहि सरकारि जागा देण्यास हरतकत नाहीं असा कायदा झाला हा कायदा आमचे इकडे होईल काय?

माजी गवर्नर जनरल लार्ड नार्थब्रूक यांचे एकुलते एक चिरंजीव ३० वर्षांच्या वयाचे असून पार्लमेंट सभेंत निवडले गेले आहेत. लार्ड साहेब हिंदुस्थानांत असतां हे चिरंजीव आपल्या तीर्थरूपांचे एडीक्यांप होते.

पेरंबोअर एथें थोड्या दिवसांपूर्वीं एक फकीर मरण पावला त्याणें आपल्या मरणाचा दिवस घटका, व पळें हीं अगोदरच सांगून ठेविलीं होतीं. व असेंहि सांगून ठेविलें होतें कीं माझ्या थडग्याजवळ येऊन माझी प्रार्थना करून आपल्या भावी संकटाचा परिणाम जो विचारील त्यास थडग्यांतून जबाब मिळेल!! ह्या त्याच्या सांगण्यावरून शेंकडो मुसलमान व हिंदुधर्माचे लोक प्रत्येक गुरुवारीं व मंगळवारीं त्याच्या थडग्याजवळ जमून एकेक पैसाहि त्यापुढें ठेवितात. या पैशाचीं रकम हल्लीं ७००० रुपयांपर्यंत वाढली असून ह्या पैशाचा उपयोग त्या साधु मुसलमानाच्या जाग्यावर एक भव्य मशीद बांधण्याकडे करावा. असा लोकांचा इरादा आहे.

मि. मोहनलाल घोस यांस त्यांच्या मित्रमंडळीनें पार्लमेंट सभेंत सभासद होण्याकरितां प्रयत्न करण्याबद्दल सुचाविलें होतें. व या कामाकरितां जो त्यांस खर्च होईल तो पुरविण्याबद्द कलकत्ता एथें वर्गणीहि जमा होत असल्याचें कळतें.

रशियाचीं दोन लढाऊ जहाजें सीलोन ( लंका ) मध्यें आलीं असून त्यामुळें तेथील लोक भयाभित झाले आहेत, पण सरकारी कामगार त्यांच्याशीं दोस्तीनें वागत असून त्यांस दररोज मेजवान्यांचाही थाट उडत आहे.

हिंदुस्थानांत काम काज कसें चाललें आहे याची चौकशी पार्लमेंट सभेनें करावी ह्मणून ब्रिटिश इंडियन असोशियेशननें अर्ज केल्याचें कळते,

खंबायतचा नबाब यावरखान यांस गेल्या तारीख २९ रोजीं देवाज्ञा झाली. यास जाफर अली खान नावाचा मुलगा सुमारें २४ वर्षांचा असून तोच गादीचा मालक आहे.

काठेवाडांतील गरीब लोक हल्लीं फारच विपत्तींत असून गवत व पाला यांच्यावर निर्वाह करित आहेत. व गेलीं तीन वर्षें त्या देशास अशी नापीक तसेंच चवथें येईल तर लोक निघून जाऊन देश उजाड होण्याचा संभव आहे असें ह्मणतात ऐलँडांतील लोकांकरितां जशी वर्गणी सुरू आहे तशी काठेवाडी लोकांकरितां कां करूं नंये? अशी एखादी वर्गणी सुरू करून आपल्या अन्नार्थी भावांस मदत करण्याचें धैर्य कोणा नेटिवांत नाहीं काय?

उल्वरच्या महाराजांनीं गवर्नर जनरल यांच्या सेक्रेटरीस असा मजकूर कळविला आहे कीं मी आपल्या पदरच्या खर्चानें आपली सर्व फौज आफगाण लोकांशी तोंड देण्याकरितां सरकारच्या स्वाधीन करितो. व प्रसंगवशांत याशीहि जरूर लागल्यास मी स्वतां लढाईवर जाण्यास तयार आहे. आमच्या लोकांची इंग्रजसरकाराकडे केवढी राजनिष्ठा ही!

ह्या सालीं माळव्यांत अफूचें पीक कमी झाल्यामुळें चिनांतील आंफीमिया लोक गडबडून गेले आहेत मनुष्य व्यसनी झाला ह्मणजे कठीण! पु. वै.

वैनाद येथील सोन्याच्या खाणींत सोनें पुष्कळ सांपडावयास लागलें याजमुळें तूर्त कामें बंद ठेवून बिगारी लोक सोनें घेऊन जातील ह्मणून त्यांस कामावरून काढून टाकलें असें ह्मणतात.

हल्लींचे पार्लमेन्ट मेम्बर निवडणाच्या खर्चाकरतां लार्ड डर्बी यांणीं खासगीचे १.००,००० रुपये दिले व यावेळीं लिबरल लोक निवडले जावे ह्मणून लिबरल पक्षाच्या लोकांनीं एकंदर १६,००,००० रुपये खर्च केले व हा खर्च आतां निघणार कसा असें एक पत्रकर्ता ह्मणतो.

या महिन्याच्या आरंभापासून मद्रासेकडील रेलवेच्या तिसऱ्या क्लासाच्या गाड्यांचें भाडें दर मैलास २ पै केलें आहे.

चीन देशाची राजधानीं पेकिंग एथील अस्वस्थस्थितीमुळें त्या देशांतील उत्तरेच्या वाजूच्या बंदरांचें व्यापाराच्या संबंधानें अतीशय नुकसान होत आहे असें समजतें.

काजइबाज खेड्यांतील लोकांनीं सरकारि सामान लुटलें होतें ह्मणून त्या खेड्याच्या मालिकास शिक्षा करण्यासाठीं कर्नल टानर हे अडीचशें लोकांनिशीं ता. २ मे रोजीं चालून गेले आणि तें खेडें हस्तगत करून सरकारी सामान परत घेतलें परंतु ते खिलात इंग्लिशांकडे परत येतात तों शत्रूचे ३०० लोक एका सुरक्षित ठिकाणीं जमलेले पाहिले तेव्हां कांहीं लोक आणलेल्या सामानावर संरक्षणार्थ ठेवून बाकीच्यानिशीं त्यांवर हल्ला केला. तेव्हां शत्रु निकरानें लढला. परंतु शेवटीं त्याचा पराभव होऊन त्याचे १४ असामी मारले गेले, ८ कैदी झाले व पुष्कळ जखमी झाले. इंग्लिशाकडील एक मनुष्य जखमी झाला. या पराजयामुळें त्या प्रांतांत आतां शांतता होईल असें ता. ७ मेच्या कंदाहारच्या तारेवरून समजतें.

हरद्वाराकडील परत येणाऱ्या जत्रेची गर्दी झाल्यामुळें नेपाळांत खाटमंडू एथें वाख्याची सुरुवात झाली आहे.

सिंध प्रांतांत सक्कर एथें दरवडेखोरांचा फार त्रास होऊं लागला आहे व त्यांचा बंदोबस्त होणें कठीण झालें आहे.

बाबू लाल मोहनघोस यांस त्यांच्या मित्रांनीं असें सांगितलें आहे कीं, तुह्मीं कांहीं दिवस इंग्लंडांत राहून एकाद्या गांवाच्या किंवा शहरच्या वतीनें मेम्बराच्या निवडानिवडींत आपली नेमणूक पार्लमेंटमध्यें होण्याची संधि साधेल तर पहा. या संबंधानें कलकत्यास एक कमिटी तयार होत आहे व तिचा उद्देश त्यांची नेमणूक पार्लमेंट सभेंत होण्याच्या संबंधानें जो खर्च लागेल त्यासाठीं वर्गणी जमवावयाची असा आहे.

काश्मीरचे महाराज, सिंदे सरकार, जयपुरचे महाराज, व दुर्भगाचे महाराज, वगैरे बरेच नेटिव सरदार उन्हाळ्यांत सिमल्याम जातील असें ह्मणतात.

आफगाणिस्थानांतील लढाईच्या खर्चाच्या संबंधानें सरकारी रीतीचा हिशोब प्रेसकमिशनर यांजकडून लवकरच प्रसिद्ध होण्यास बाहेर येईल असें दिसतें.

आफगाणिस्थानांत पाठविलेलें सगळें सैन्य थोड्याच दिवसांत परत बोलविलें जाईल अशी बातमी जिकडे तिकडे पसरत आहे; परंतु ही बातमी बहुतकरून लिबरल पक्षाचे लोक लवकरच युद्ध बंद करतील अशा अजमासावर उठली असावीसें दिसतें.

मुंबई समाचारचा एक बातमीदार ह्मणतो कीं, सर टी माधवराव यांणीं मि. आनंदराव बर्वे यांस नवसरी येथें डि. जज्ज नेमून आपला मुलगा मि. टी माधवराव ( जो हल्लीं पब्लिकवर्क्सचा सेक्रेटरी आहे ) त्यास त्यांच्या जागीं बडोद्याचे सिटी जज्ज नेमिलें.

लंडनच्या तारीख ६ मे च्या तारेवरून कळतें कीं, सर जान स्ट्राची यांच्या बजेटांत जी आश्चर्यकारक तूट आढळून आली तिजबद्दल तेथील लोकांत खूप चर्चा सुरू आहे; सर्व वर्तमानपत्रकर्त्यांनीं तर एक दिलानें सदरहू गोष्ट अगदीं अयोग्य असें कडकपणानें आपलें मत दिलें आहे, व मि. बक्स्टर ह्यांनीं हौस आफ कामन्समध्यें याजबद्दल विचार व्हावा अशी सूचना केली आहे. टाइम्सनें असें प्रसिद्ध केलें आहे कीं, ही दुष्कीर्तिकारक घोड्याएवढी चूक करण्याचा सर्वस्वी दोष हिंदुस्थान सरकार व विशेषेंकरून सर जान स्ट्राची यांवर आहे; व त्या संबंधानें ज्या सबबी पुढें केलेल्या आहेत त्या इतक्या पोरकट व अयोग्य आहेत कीं, कोणत्याही इंडियाच्या स्टेट सेक्रेटरीच्यानें त्यांच्या समर्पनार्थ बोलण्यास क्षणभर देखील टिकाव धरवणार नाहीं.

बाबु निशिकंठ चतरजी जे कांहीं थोड्या दिवसांपूर्वीं सेन्तपितर्सबर्ग येथें हिंदुस्थानांतील भाषांचें प्रोफेसर होण्याकरितां गेले होते त्यांस येथील प्रोफेसर फार त्रास वगैरे देतात असें एका कलकत्याच्या पत्रकर्त्यास त्यांच्याच पत्रावरून कळतें. इं. प्र.

मेलबोर्न एथील प्रदर्शनास सुरुवातीपर्यंत २५००,००० रुपये खर्च लागला.

सालमजकूरीं हारीद्वाराहून अतिशय यात्रा आली ह्मणून नेपाळची राजधानी खाटमांडू एथें माहामारी चालू झाली आहे.

मुंबईचे कमांडर इन चीफ हे पुण्याहून महाबळेश्वरास गेले.

पुरंधर तालुक्यांतील लोक डोंगरास आग लाऊन जंगलाचा नाश करूं लागले आहेत असें ह्मणतात.

जनरल स्टयुअर्ट यांनीं बरोबर चांगला मजबूत पहारा घेऊन गिझनी शहर पाहिलें. तेथील किल्ला अगदीं मोडकळीस आलेला असून त्यांत १० तोफा सांपडल्या. बहुधा दुकानें बंद होतीं. सामानाचा पुरवठा अगदींच थोडा आहे त्यामुळें काळ्या फौजेस अर्धा शिधा दिला जातो असें गजनीच्या काबूलमार्फत आलेल्या तारीख एक मेच्या तारेवरून समजतें.

जनरल रास यांच्या छावणी नजीकच्या टेंकड्यांवर ता. २९ एप्रिल रोजीं शत्रूकडील सुमारें १०।१९ शें लोक जमून त्यांनीं छावणीवर गोळ्या सोडल्या. त्यांस तेथून पिटून लावण्यांत येऊन त्यांजकडील ४० असामी मारले गेले. इंग्लिशाकडील एक मारला गेला व चार जखमी झाले. मैदान व लोगार यांजमधील रस्ते अद्याप सुरक्षीत नाहींत कारण घाजी लोकांच्या टोळ्या त्या रस्त्यावर फिरत असतात आणि त्या रस्त्यानें जाणाऱ्या सर्व लोकांस अडवितात आणि त्यांचा झाड घेऊन मग जाऊं देतात असा प्रकार चालला आहे.

झुबेडा कालव्याचें मूळ——मुसलमान लोकांचें यात्रेचें स्थान मक्का एथें झुबेडा नावाचा एक गोड्या पाण्याचा कालवा आहे त्याच्या उत्पत्तीचा इतिहास चमत्कारिक आहे ह्मणून तो वां. ग्या. पत्राधारें थोडक्यांत देतों- बगदादचे खलीफ हरून अलरशिद याची राणी झुबेडा इला एके रात्रीं स्वप्न पडलें कीं "ती पृथ्वीवरील सर्व धार्मिक लोकांस पाजित आहे" या स्वप्नाचा अर्थ विचारण्याकरितां तिनें आपल्या एका दासीला एका मौलवीकडे पाठविलें परंतु आपलें नाव प्रकट न करितां मला ( दासीला ) च स्वप्न पडलें असें सांगावें ह्मणून तिला ताकीद केली होती. त्याप्रमाणें तिनें पंढितास सांगताच ते ह्मणाले हें स्वप्न तुझें नव्हे; कारण शोपेंत अशा प्रकारचे विचार तुझ्या स्वप्नांत येण्यासारखी तुझी योग्यता नाहीं हें उत्तर दासीनें राणीला सांगितल्यावर राणीनें त्या मौलवीस आपल्या हुजूर आणून त्या स्वप्नाचा अर्थ विचारला त्यानीं त्या स्वप्नाबद्दल राणीची फार प्रशंसा करून सांगितलें कीं पृथ्वीवरील सर्व मुसलमान लोकांनीं खुष व्हावे अशा प्रकारचें कृत्य आपल्या हातून घडलें पाहिजे असा या स्वप्नाचा हेतु दिसतो. तें कृत्य हें कीं या ठिकाणीं पाण्याचे दुर्भिक्ष्य असल्यामुळें पृथ्वीवरील सर्व यात्रेकरूंस मोठी विपत्ती भोगावी लागते ती घालविण्यासाठीं आपण या ठिकाणीं एक पाण्याचा कालवा सोडावा तेणेंकरून सर्व धार्मिक लोकांस पाजल्याचें आपणास श्रेय येणार आहे. हें उत्तर ऐकून झुबेडा राणी फारच खुष झाली आणि तिनें लागलाच हुकूम देऊन सुमारें १९ कोसांवरून एक गोड्या पाण्याचा कालवा मक्केंत आणून सोडला. त्यास त्या राणीचेंच नाव दिलें. त्या कालव्याचें आजपर्यंत यात्रेकरू लोक पाणी पीत आहेत व त्या राणीला आशिर्वाद देत आहेत. ने. ओ.

---

हें पत्र अकोलें एथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत रा० रा० खंडेराव बाळाजी डफळे यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

# वऱ्हाडसमाचार.

न १८८०इ० २

पुस्तक १४ अकोला, सोमवार तारीख २४ माहे मे सन १८८० इसवी. अंक


...न तालुक्यांत गुराढोरांचा अजार सुरू आ... फार उष्ण आहे. हैदराबाद— ६ ...पाचा अजार साधारण सुरू ...ंत गुराढोरांचा अजार सुरू ...व कंडियारो एथें देतीस येतें" या वाक्याचे यथा... सिंधसरहद्द— ...णी व ख...डा विचार करू.

## वऱ्हाडसमाचाराची किंमत.

| | |
|---|---|
| | रु. |
| वर्षाचे अगाऊ | ५ |
| साल अखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ०४ |
| डाक हाशील. | |
| वर्षाचे अगाऊ | १८८ |
| ,, अखेर | २ |

नवीन वर्गणीदार होऊं इच्छिणारे लोकां कडून अगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र सुरू केलें जाईल.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, १० ओळींचे आंत | १ |
| १० ओळीपुढें दर ओळीस | ०१८६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०३ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |

## NOTICE TO CONTRIBUTORS.

*We invite the co-operation of all European and Native gentlemen in maintaining the status of this journal and to this end solicit contributions in the shape of News letters, stray notes &c. Contributors may rest fully assured that the confidence they place in us by sending communications will not be violated.*

## सुबोधसार.

भाग पहिला.

गीत राजनीति वगैरे अनेक ग्रंथांतून नीतिपर, बोधक, मनोरंजक, दृष्टांतिक, व अनुभवसिद्ध असे उत्तम निवडक श्लोक प्राकृत अर्थासह घेतले आहेत. अशा ग्रंथाच्या अवलोकनानें बहुतेक व्यवहारज्ञांस विशेषेंकरून नीतिशास्त्र वगैरे विषयांची चांगली माहिती होऊन सामान्य पुरुषांसही व्यवहारांत समयविशेषीं कसें बोलावें व वागावें वगैरे अनेक प्रकारचें ज्ञान होण्यासारखें आहे हा ग्रंथ जाड कागदावर खिळेछापानें छापून विक्रीस तयार आहे. किंमत ०१० आणे ट पाल खर्च ००६ आह्माकडे पाठविल्यास पुस्तक ताबडतोब रवाना केलें जाईल. कळावें. ता. २६ आक्टोबर सन १८७९ इ.

वऱ्हाडसमाचाराचे मालक.

## गजकरणाचें औषध.

आमचे छापखान्यांत गजकरणांचे औषधाच्या डब्या विकावयास आल्या आहेत हें औषध खात्रीचें असून यापासून गुण लवकर येतो. लावतांनां आग मुळींच होत नाहीं. औषध थंड पाण्यांत भिजवून गंधाचे उटीप्रमाणें पातळ करून स्नान केल्यानंतर लावावें किंमत ०६ आणे.

हें औषध गजकरण शिवायकरून खरूज व नायटे यांजवरही चांगलें प्रकारें लागू होतें.

या गजकरणाच्या औषधाच्या डब्या २ वर्षांपूर्वीं आमचे छापखान्यांत विक्रीकरितां होत्या व त्यांपासून पुष्कळांस गुणही आला. परंतु अलिकडे सदर्हू औषधाच्या डब्या आमचे जवळ शिल्लक नव्हत्या व तेणेंकरून या-रोगानें पीडलेलीं गिऱ्हाइकें परत गेलीं ह्मणून आह्मी त्या औषधाच्या डब्या मुद्दाम आणिल्या आहेत.

## नादारी प्रकरणीं नियम.

वऱ्हाडांत नादारी संबंधी जो कायदा हल्लीं चालू आहे व ज्याच्या प्रति मे० जुडिशियल कमिशनर साहेबांनीं सरकारी कचेऱ्यांतून वहिवाटीकरितां छापून दिल्या आहेत तीं पुस्तकें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत विक्रीस आहेत. किंमत आठ आणे. बाहेरगावीं पाठविण्यास एक आणा अधिक लागेल.

## कौमुदीमहोत्साहः.

या अत्यंत उपयोगी त्रैमासिक पुस्तकामध्यें " सिद्धांत कौमुदी " संस्कृत व्याकरण, आणि त्याचा शुद्ध मराठी अर्थ, स्पष्टीकरणार्थ भरपूर टीपा, आणि पाणिनीयादि सर्व आधारग्रंथ देऊन आणखी दुसऱ्या अनेक सोई केल्या आहेत. आजपर्यंत पांच खंड प्रसिद्ध झाले. यांत संज्ञा, परिभाषा, पंचसंधि, षड्लिंग. अष्टाध्यायी, गणपाठ, धातुपाठ, लिंगानुशासन, शिक्षा, अनुवृत्तीपूर्वभाग इतकें संपूर्ण झालें, पुढील प्रकरण चालू असून क्रियापदाला आरंभ केला आहे. शिवाय दोनशें शद्बांच्या संपूर्ण विभक्ति चालवून दाखविल्या आहेत. कागद चांगले, सांचा मोठा, छापणी सर्वोत्कृष्ट; प्रत्येक खंडांत १०० पृष्ठें-किंमत इतर पुस्तकांच्या मानानें फारच अल्प-ह्मणजे प्रत्येक खंडाला केवळ एक रुपया, टपालखर्च एक आणा, पण वर्षाची वर्गणी अगाऊ चार रुपये पाठविल्यास टपालखर्च नाहीं. या पुस्तकाविषयीं मोठमोठ्या पंडितांनीं उत्तम अभिप्राय दिले आहेत. ज्यांस हीं पुस्तकें घ्यावयाचीं असतील त्यांहीं कृपा करून आह्मांस " पोष्टपेड " पत्रानीं कळवावें ह्मणजे पुस्तकें पाठविलीं जातील.

रामचंद्र भिकाजी गुंजीकर

कौमुदीमहोत्साहकर्ते.

मुंबई काकडवाडी घर नंबर ८

## नवीन दिवाणी कायद्यासंबंधी सर्क्युलरें

वऱ्हाडाकरितां अलीशान रेसिडेंट साहेबांनीं तयार करून रेसिडेन्सी आर्डरमध्यें जीं नवीन दिवाणी कायद्यासंबंधी सर्क्युलरें छापून प्रसिद्ध केलीं व ज्यांचें मराठी भाषांतर मे० जुडिशियल कमिशनर साहेबांनीं छापवून कौटोनिहाय दिलें त्याच्या प्रति वऱ्हाडसमाचार छापखान्यांत विक्रीस आहेत. किंमत ६ आणे बाहेर गावीं एक आणा अधिक पडेल.

## COMEDY OF ERRORS.

## कामेडी आफ एरर्स.

अथवा

## भ्रांतिकृतचमत्कार.

या नावाचें शेक्स्पियरच्या इंग्लिश नाटकाचें भाषांतर विद्वान् गृहस्थांनीं तयार केलेलें आमचे छापखान्यांत छापून विक्रीस तयार आहे. यांतील संविधानक फार मौजेचें असून हास्यरस ओतप्रोत भरलेला आहे. व ग्रंथरचनाही फार चांगली साधली आहे. असें बहुतांचे तोंडून ऐकिलें आहे. याची किंमत सहा आणे. व डाकेंतून मागविल्यास हशिलबद्दल अर्ध आणा पडेल.

वऱ्हाडसमाचाराचे मालक.

## पत्रव्यवहार

या सदरा खालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

रा० रा० वऱ्हाडसमाचारकर्ते यांसः—

वि० वि० पत्रकर्ते महाराज. आपल्या वऱ्हाड प्रांतांत वारंवार घडणाऱ्या अग्निप्रलयाच्यां संबंधानें आपले उमरावतीकर बंधूनीं गेले सोमवारच्या प्रमोदसिंधूंत सूचनार्थ कांहीं मजकूर प्रसिद्ध केला आहे. तो वाचून पाहून माझे मनांतही थोडे विचार आले ते आपणाकडे सादर केले आहेत त्यांस येत्या अंकीं जागा देऊन प्रसिद्ध कराल अशी आशा आहे.

प्रमोदसिंधूकर्ते लिहितात त्याप्रमाणें आपले वऱ्हाड प्रांतांत इतर ठिकाणांपेक्षां अग्निप्रलयाची हकाटी अधिक खरी व त्यास पुष्कळ अशीं कारणीभूत खेड्यापाड्यांतील गवती घरें आहेत हेंही निर्विवाद आहे. व तीं जितकीं कमी होतील तितकीं बरीं. परंतु त्याच लेखांत सदर्हू पत्रकर्ते असेंही सूचवितात कीं, " गवतीं घरें जितकीं कमी करवतील तितकीं करण्याची व्यवस्था सरकारांनीं करावी असें केल्यानें लोकांवर कांहीं प्रकारचा जुलूम होईल असें आह्मांस वाटत नाहीं. कारण कीं ज्यांनां ऐपत आहे अशा लोकांकडून त्यांचीं गवतीं घरें काढून कवलारू किंवा माळवदीं घरें बांधविण्यास कोणत्याही प्रकारची हरकत दिसत नाहीं." हेंही ह्मणणें गैर नाहीं परंतु इतकेंच लिहून सदर्हू पत्रकर्ते राहिले नाहींत तर ते असेंही सूचवितात कीं 'बरेच ऐपतदार अशा कुणबी व शेतकरी लोकांची इकडे जास्त संख्या असून त्यांचींही बहुतकरून गवतीच घरें आहेत असें दृष्टोसचीस येतें" या वाक्याचे यथार्थ... ...णी व ख...डा विचार करू.

या प्रांतांतील कुणबी किंवा शेतकरी ल्याचा जात्याच स्वभाव असा दिसून येतो कीं, त्यांच्या हातीं पैसा आला कीं ते त्याला डागडागिन्यांचे रूपानें किंवा रोकडीचे रूपानें राखून न ठेवितां आधीं घरें बांधितात व लग्न कार्यांत पैसा उडवितात. याविषयीं त्यांची इकडे ख्याति आहे व त्यावरून अशी ह्मण पडून गेली आहे कीं "कुणब्याला पैसा मिळाला कीं तो भिंतीत अगर * * * खर्च व्हावयाचा" या प्रांतांत प्रत्येक खेड्यांतून दहा दहा हात रुंदीच्या भिंतील्या मोठमोठाल्या उंच 'गढ्या' बांधलेल्या ज्या दृष्टीसें पडतात त्या सर्व कुणबी लोकांनीं बांधलेल्या आहेत. ही थोडी जुन्या काळची गोष्ट झाली परंतु सुमार १९ वर्षांपूर्वीं जेव्हां कपाशीला १०० १५० रुपये खंडीपर्यंत भाव चढला होता त्या वेळेस शेतकरी लोकांचे हातीं किती पैसा आला असावा! पण त्यापैकीं किती जणांनीं तो साठवून ठेविला आहे याविषयीं तपास केला तर हजारांत एकाजवळ तरी सांपडेल न सापडेल याची भ्रांतच आहे.

त्या पैशाच्या मोसमांत पुष्कळ कुणबी लोकांनीं नवीन गढ्या बसविल्या, मोडकळीस आलेल्या दुरुस्त केल्या, मोठाले गायवाडे व माळवदें व माड्या बांधिल्या, व पुष्कळांनीं निदान कवलारूचीं घरें केलीं, व लग्नकार्यांतही फक्त तासेवालें व पालखी या प्रीत्यर्थ सुद्धां शंभर शंभर रुपये हुंडे दिले व हजारो रुपये उडविलें. यावरून मला असें खात्रीनें वाटवें कीं शेतकरी व कुणबी लोक जवळ पैसा आला की, धाबें किंवा कवलारू बसविण्यास कधीं मागें घ्यावयाचे नाहींत. परंतु ज्या लोकांपाशीं पैसा नाहीं ते निरुपायानें आपला निर्वाह गवतीं झोपड्यांत राहून करतात. मी पुष्कळ शेतकरी असे पाहिले आहेत कीं, जे १ बैलाचा उदीम करितात, शेकडो रुपये शेतसारा सरकारांत भरतात, खंडोगणती कापूस, गहू, ज्वारी व आळशी वगैरे पदार्थ उत्पन्न करतात पण त्यांस त्यांतून वर्षाचीही खर्ची जवळ ठेववत नाहीं. वर्षाकाळांत त्यांस सावकाराकडून वाढीदिढीनें पोटगी आणावी लागेत. मग धाबें व कवलारू घर कशानें होणार ! "नाव सोनुबाई आणि हातीं कथलाचे वाळें" या ह्मणीप्रमाणें आमचे इकडील शेतकरी व कुणबी लोक मोठे ऐपतदार दिसतात पण ते कर्जानें किती ग्रासलेले आहेत, त्यांच्या खाण्यापिण्याची व घरादारांची किती हलाखी आहे; कर्जाचे फेडीसाठीं किती शेतकरी लोकांचीं घरें दारें, शेत मळे, व बैल खटे जप्त होऊन त्यांस कारागृहीं वास करावा लागला, इकडे थोडें लक्ष दिलें असतां सहज कळून येईल. व अशा लोकांनीं गवतीं घरें मोडून माळवदें व कवलारू घरें बांधावी ह्मणून सरकारानें कोणती तजवीज योजावी हें मला तर सूचत नाहीं. बाकी ऐपतदार लोकांकडून सामोपचारानेंच कां पण सक्तीनें सुद्धां तशीं बिनधोक घरें बांधवावीं. व लोकांनींही आपल्या शक्तीप्रमाणें निदान क-

इतकें
...प्रसंगविशे
...ly on India
...ent of ...वा ही विनंती.
...and ... शके १८०२
...the ... एक खेंडेगावचा
" रहिवासी "

वऱ्हाडसमाचार.

मिति वैशाख शुद्ध १५ शके १८०२

## पुणें एथील वक्तृत्वोत्तेजक सभा.

ही सभा स्थापन होऊन आज दहा वर्षें झालीं. तेथील मंडळीच्या सतत परिश्रमानें तिचें पाऊल दिवसेंदिवस पुढें आहे हें कळविण्यास आम्हांस परम संतोष वाटतो.- यंदा युनिव्हर्सिटीचे परीक्षेंत पास झालेले तरुण विद्वान् भाषणासाठीं आले होते ही आनंदाची गोष्ट आहे. या सभेचा दाहवा समारंभ चालू महिन्याचे तिसरे तारखेस सुरू होऊन आठवीला समाप्त झाला. या समारंभाकरितां तीन विषय नेमिले होते. पैकीं पहिला विषय—

"हिंदुस्थानांतील एतद्देशीय संस्थानांत हल्लीं राज्यकारभार चालविण्याची पद्धत कोणत्या प्रकारची आहे ती सार्वभौम इंग्रज सरकार, खुद्द संस्थानिक व त्यांची प्रजा यांचे खऱ्या हिताचें वर्धन करणारी आहे किंवा नाहीं व नसल्यास तींत कोणती सुधारणा केली पाहिजे" हा होता. या विषयावर भाषण करण्याकरितां ६ उमेदवारांचे अर्ज असून ४ जणांचीं संभाषणें झालीं. या विषयाचें १० रुपयांचें बक्षिस रा. रा. वामन शिवराम आपटे यांस मिळालें होतें पण तें त्यांनीं न स्वीकारतां दुसऱ्या नंबरचे उमेदवार रा. रा. महादेव वासुदेव लेले यांस देवविलें. दुसरा विषय--- "इंग्रजी विद्येचा फैलाव झाल्यापासून आपल्या लोकांच्या सामाजिक व गृहसंबंधी स्थितींत कोणकोणता फेरफार झाला आहे व तो एकंदरींत हितावह आहे किंवा नाहीं व नसल्यास तसा प्रकार न होऊं देण्यास काय तजवीज योजली पाहिजे." या विषयावर भाषण करण्यासाठीं ११ उमेदवारांचे अर्ज होते पैकीं ७ जणांचीं संभाषणें झालीं. यांत रा. रा. वासुदेव लक्ष्मण आठवले हे पहिले ठरून यांस ३० रुपयांचे बक्षीस मिळालें पण तें त्यांनीं सभेस फिरून परत दिलें. हेंही बक्षिस दुसऱ्या नंबरच्या उमेदवारास मिळावयाचें पण त्याचे भाषणाचे गुण निमेहून कमी उतरल्यामुळें त्यास मिळालें नाहीं. तिसरा विषय--- श्रीरामदास स्वामी यांचा पुढें लिहिलेला श्लोक होता:—

॥ देहे त्यागिता कीर्ति मागें उरावी ॥
॥ मना सज्जना हेचि क्रीया धरावी ॥
॥ मना चंदनाचे परि त्वा झिजावें ॥
॥ परी अंतरीं सज्जना नीववावें ॥

या विषयासाठीं ११ जणाचे अर्ज होते पैकीं ६ उमेदवारांचीं भाषणें झालीं. व यांत रा. रा. बळवंत खंडूजी पारख यांचें संभाषण उत्तम ठरून यांस सभेच्या फंडांतून १५ रुपये व कै० विष्णु परशराम रानडे यांचे स्मारक कृत्य फंडांतून २५ असे ४० रुपयाचें बक्षिस मिळालें या शिवाय रा. रा. हरी रावजी चिपळूनकर यांणीं पंध्रा रुपयांचें पागोटें दिलें. असें समजतें एकंदर भाषणाचे संबंधानें रा. ब. महादेव गोविंद रानडे यांनीं शेवटचे दिवशीं सुरस भाषण केलें.

शिवाय सभेंत भाषण होत असतां मोठ्या चपलतेनें तीं लिहून काढण्यासाठीं मुंबईहून इंग्रजी रिपोर्टर रा. रा. गजानन भाऊ हे गेले होते. यांनीं रा. रा. बळवंत खंडूजी यांचें व रा० ब० माधवराव गोविंद रानडे यांचें, हीं दोन भाषणें लिहून काढण्याचा प्रयत्न केला व तो बऱ्याच अंशीं सफल झाला. याबद्दल त्यांस मंडळीकडून ७५ रुपयांचें बक्षिस मिळालें व तीं दोन्ही संभाषणें गेले दोन्ही ज्ञानप्रकाशांत छापून प्रसिद्ध झालीं आहेत. ही ही एक आनंद मानण्या सारखी गोष्ट समजली पाहिजे.

अशा सभा मोठमोठाल्या शहरच्या जागीं, निदान दर जिल्ह्याचे ठिकाणीं तरी स्थापन होऊन असे समारंभ होतील; व त्यांचा उत्कर्ष ऐकावयास सांपडेल तो सुदीन समजला जाईल.

## मुंबईस भयंकर आग.

या आठवड्यांत मुंबईस कोटावरील शेट नसरवानजी माणकजी पेटिट यांचे नरसी केशवजीवाले गिरणीस आग लागून जमीनदोस्त झाली. ही गिरणी नुक्तीच ६ लक्ष १५ हजार रुपयांस विकत घेतली होती तोंडत क्षणांतच तिची राख रांगोळी झाली हें आमचे देशाचे दुर्भाग्य समजलें पाहिजे आगीची साग्र हकीकत आम्ही आपले वाचकांकरितां सु. प. वरून एथें घेतों.

"ही गिरणी बुधवारीं सायंकाळी नेहमीं प्रमाणें बंद झाल्यावर रातपाळीच्या पार्शी जमादारानें सभोंवार पाहिलें तेव्हां सर्व नीट होतें आणि सुमारें आठ वाजण्याच्या सुमारास त्याच गिरणींतील पार्शी हजिरीवाला गिरणींत आपल्या एका सोबत्याबरोबर जात असतां त्यानें गिरणीच्या छपरांतून मोठा धुराचा लोट चाललेला पाहून मोठ्यानें ओरडून आसपास लोकांस कळविलें व पोलिसास वर्दी देऊन एंजिनें आणविण्यासाठीं लोक पाठविले. तसेंच कुलाबा एथील तोफखान्याकडील पलटण व दुसरी एक पलटण यांतील गोऱ्या सोजरांस मदतीस बोलाविलें व त्यांनींहि मोठ्या उत्साहानें आपलें एंजिन घेऊन येऊन मदत केली. परंतु इतकी तयारी होई तों आग बहुतेक वरचा मजला ग्रासून खालीं उतरूं लागली होती आग इतक्या झपाट्यानें पसरण्याचें कारण एक तर या गिरणीच्या छपरांत लांकडी भाग फार होता व वरच्या मजल्यांत चरबी वगैरे जलद पेटणारे पदार्थ ठेविले होते आग विझविण्यासाठीं एकंदर तीन एंजिनें असून व पलटणींतील बरेच सोजर लोक मोठ्या मेहेनतीनें श्रम करीत असून आगीला अटकाव बिलकूल झाला नाहीं. कारण प्रथम पाण्याचा च पुरवठा असावा तसा नव्हता आणि मागून पाण्याचा पुरवठा झाला पण एंजिनेंच कांहीं केल्यों बरोबर चालेनात. सारांश गिरणीच्या बचावाबद्दल निराशा होऊन लोकांनीं मग आसपासच्या इमारतींचा बचाव करण्याकडे लक्ष दिलें. जवळच गैनेक्या रिएजचा कारखाना होता त्याच्या छपरावर ठिकटाळे उसळून त्यानें पेट घेतला. तेव्हां त्यानीं पांखीं मोडवून छपर ढांसळून टाकिलें. तसेंच दुसऱ्या एका इमारतीच्या छपरास अग्निस्पर्श झाला होता. तो लवकरच दृष्टीस पडून त्यावर पाण्याचा मारा केला म्हणून ती इमारतही बचावली. इकडे मख्य आग लागलेल्या इमारतींतील अग्नीस स्वतंत्रपणें अम्मल चालविण्यास सांपडल्यामुळें ११ वाजावयाच्या सुमारास छपर व मजले साफ जळून कोसळून पडले. त्यावेळेस मोठा आवाज होऊन पुढली खेरीज करून सर्व भिंती ही कोसळून पडल्या. तेव्हां मनुष्यांच्या जिवास धोका होण्याची मोठी भीती होती व दोन पार्शी मेले अशी कांहीं वेळ बातमीही पसरली होती पण ती खोटी झाली. मात्र एका सोजरास थोंडी दुखापत झाली.

या आगीनें गिरणीचें इंजिनहौस व बाइलरहौस हीं खेरीजकरून इतर सर्व इमारतीचा व आंतील सांचे (सर्व २६०), सुमारें १५०० चात्या, कापड व सूत वगैरे सामानाचा साफ नाश झाला. त्यामुळें एकंदर सुमारें ३। लाखांचें नुकसान कंपनीच्या माथीं आलें. या कंपनीचा विमा उतरलेला नव्हता यामुळें मुख्य भागीदारांची तर नाउमेद झाली असावी व इतर भागीदारांचेंही त्यांच्या भागांच्या मानानें नुकसान झालें. परंतु जे हजार दीड हजार लोक त्या गिरणींत कामावर होते त्यांचें आजच पोट भरण्याचें साधन बंद झाल्यानें त्यांची काय दशा झाली असेल तिचें वाचकांनींच अनुमान करावें. ही आग बुद्ध्या लावल्याच्या संशयावरून पार्शी जमादार व दोघे शिपाई यांस पकडलें होतें परंतु चौकशीअंती शेजारच्या गिरणीच्या चिमणींतून किटाळ येऊन छपरावर पडलें व त्यामुळें आग लागली असें ठरून त्यांस सोडून दिलें.'

---

The cost of the military operations in Afghanistan is assuming proportions enormous. The Total expenditure was calculated at £ 5,512 000 during the three financial years 1878 - 79, 1879-80 1880 - 81, but a recent despatch announces that it will be necessary to add at least £ 4,000 000 to the estimate of the cost of the war in 1880-81 thus making the total cost of the war amount to nearly £ 10,000,000 It is expected that the cost will not exceed this figure, unless the operations of the campaign are protracted. The estimates were first prepared by the Controllers of military accounts Bengal, Madras and Bombay. Their figures were accepted by the military accountant General who in turn compiled and submitted them to the Secretary to the Government of India in the Financial Department, The causes which led to the disturbance in the estimate, and which have been viewed somewhat gravely, are stated to be:—

1 The purchase of a very great proportion of transport.

2 Purchasing and transporting six months supplies to the frontier.

3 The enormous price paid for grain and other supplies almost at famine rates .—

4 Increase in price of stores, such as, firewood &c

5 Increased wages to followers. Allowing that the controllers are officers of considerable experience it is scarcely fair to expect them to furnish an accurate estimate of the cost of a war which at one period is at the point of a termination, while at another the probabilities are very remote. and a protracted war on an extended scale carried on with ever increasing armies. and in consequence ever increasing expenditure on transports, supplies, stores. &c. required. They could scarcely be expected to foresee what a turn events may take. It is well that the enormous expenditure required has atracted attention. The condition of the finances can not certainly exhibit such a stability as was anticipated, when the Financial statement was orininally planned and submitted to parliament. When a war between England and Russia was imminent. £ 6,00.00.000 was thought sufficient to drive the Russian fear away from Turkey. Here England is engaged with a semi-savage nation in a conflict protracted for three years with a very remote prospect of accellerating peace; and already 6,00,00.000 Rs. have been run through without any prospect of the expenditure diminishing or ceasing. in spite of the assertion that the condition of the finance "appears no less sound and satisfactory than it did when the Financial statement was made" it appears gloomy. We have just escaped the introduction of the income tax of Sir Richard Temple inaugurated by Sir John Strachey under a different name, to meet the exigencies of the war. We shudder to think what will be the upshot of this enormous expenditue. Our fate is at this moment involved in mysterious obscurity. A nation that has carried on hostilities to such a vast extent against a thoroughly disciplined body of men, during the space of three years, cannot complain of want of resources and means. As the Afghans can afford to keep up immense bodies of paid men, they can very well be compelled to pay an indemnity for the war. Releasing them from the obligation of an indemnity and in lieu submitting to a grant of a subsidy, will only enrich the Afghans, and encourage the refractory spirit they inherit; while it would tell heavi-

ly on India. We are quite confident of the issue of the campaign and can therfore safely discuss the question of indemnity. We are decidedly of opinion that it is a mere hallucimation to treat the Afghans with lenity, where the exaction of an indemnity for the war wonld make them more tractable, as well as amenable to reason and good rule.

---

The postal Inspector in Krishna Division Mr. Daves has issued a notice warning those using post cards not to inscribe any thing beyond the address on the printed side of the card at the risk of being charged extra. The native mind has not yet grasped the object of the post card. We are informed that some of the half educated class are of opinion that to write printed letters on post cards is compulsory, while others besides using post cards enclose them in an envelop and stamp them. Others again write letters on a number of them continuing the same letter on four or five cards and bundle them up. The Inspector of the Krishna Division has noticed that the natives of our days fill the post card on both sides of it with writing.

---

## वऱ्हाड.

हवामान— या आठवड्यांत उष्णतेचें मान जरी मागीलप्रमाणेंच आहे तरी वारा मोठ्या सोसाट्याचा वाहणें सुरूं होऊन मधून मधून आकाश अभ्राच्छादित असतें व काल सायंकाळीं पावसाची थोडी बुरबुरीही पडली. आतां पाऊस लवकरच सुरूं होईल असें वाटतें.

---

रा. रा. वामन गणेश परांजपे बुलढाण्याचे डिपुटी एजुकेनल इन्स्पेक्टर हे एथें मित्रमंडळीच्या भेटीकरितां आले आहेत.

---

उमरावती डेपुटी कमिशनरचे डेपुटी क्लार्क रा. रा. गणेश बापुजी यांस इलिचपुरास ८० रुपयांवर डेपुटी क्लार्क नेमून उमरावतीस एथील मि० शेख कासम यांस नेमिलें असें समजतें.

---

उमरावती तालुक्यांतील नांदगावास चोरीचे मुकदम्यांत पकडलेले सर्व आरोपींस एक एक वर्षाची सजा झाली असें प्र. सिं. वरून समजतें.

---

उमरावतीस क्षिपराबाई नावाच्या एक कथेकरीण बाई आल्या असून त्या पंढरपुराकडील रहाणाऱ्या आहेत असें समजतें. या बाईचीं कीर्तनें उमरावतीस सुरू असून यांनवर तेथील लोकांची चांगली भक्ती बसली आहे. यांस ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत व तुकाराम बोवाचे अभंग यांचें चांगलें पाठांतर असल्याचे ऐकतों हें स्त्री जातीस भूषणच समजलें पाहिजे.

चिखलदऱ्याचे अ० तहशिलदार रा. परशराम गणेश यांची यवतमाळास क्लार्क आफ धि कोर्टचे जागीं नेमणूक झाल्याचे संबंधानें इलिचपुरची लोकवार्ता आह्मी व. मि. वरून गेले अंकीं घेतली होती ती मिथ्या असून रा. रा. वासुदेव सदाशिव पितोळकर यांस ती जागा कायमची मिळाली आहे असें प्रमोदसिंधु कर्ते लिहितात.

---

मि. टी. एच मिली यांस अलिशान रेसिडेंट साहेब यांनीं १९ मार्च १८८० पासून ३१ मार्च १८८१ पर्यंत एक वर्षभर उमरावती म्युनिसिपल कमिटीचे नॉन् आफिशियल मेंबर नेमिलें असें कळतें.

---

सिव्हिल सर्जन लोकांस प्रांतांतून फिरण्याबद्दल दर मैलास आठ आणे प्रमाणें भत्ता मिळावा. रेलवेंतून प्रवास करावयाचा असल्यास दर दिवसाला पांच रुपयेप्रमाणें मिळावा व मेळघाटांतून फिरावयाचे झाल्यास १८४ प्रत्येक दिवसाबद्दल मिळावा अशाविषयीं रेसिडेंसी आर्डरमध्यें नियम प्रसिद्ध झाले आहेत.

---

एथील कायमचे डिपुटी कमिशनर मि. हडलस्टन साहेब आज बरेच दिवस विलायतेस रजेवर आहेत. ते आतां इकडे परत न येतां तिकडेच पेनशन घेऊन रहाणार असें ह्मणतात. हें जर खरें ठरलें तर मि० हडलस्टन साहेबांसारखे हुशार या प्रांताचे पूर्ण माहितगार व लोकप्रिय-असे अधिकारी इतक्या लवकर आमचे प्रांतास अंतरल्यामुळें आह्मी दिलगीर होऊं.

---

मेळघाटच्या संबधानें आमच्या समजण्यांत आले आहे कीं, हल्लींचे तहशिलदार ( परशराम गणेश ) यांनीं काटकुंभ, वैरागड, आणि आमनेर या तीन्ही परगण्या मिळून १३९ गांवांची रुजुवात केली. व त्या रुजुवातीचा परिणाम असा झाला कीं, २ गांवचे पाटलास प्रत्येकास १ वर्ष सक्त कैद व ५० रुपये दंड प्रत्येकास. व दंड न दिल्यास दोम व तीन महिनें कैद व दोन पटवाऱ्यांस चाळीस चाळीस रुपये दंड व एकास ४१ रुपये दंड याप्रमाणें निकाल झाला एकंदर बद्दल ३२५ रुपये जमाबंदी ठरावा शिवाय सरकार जमा झाले आहेत असें समजतें. ही हकीकत आमच्या ऐकण्यांत आली आहे. व. मि.

---

उमरावती एथील दवाखान्यावरील डाक्तर मि. अप्याकानू हे ३ महियांन्ची हक्कांची रजा घेऊन पांडिचरीकडे आपले घरीं गेले आहेत. व त्यांचे जागेवर मि. कुंजबिहारीलाल यांस नेमिल्याचें कळतें.

गेल्याचे मागील शनिवारीं रात्रीं रा. रा. धोंडो जगजीवन यांचे घर फोडलें जाऊन सुमारें १५००।१६०० रुपयांचे डागिने चोरट्यांनीं नेले असें कळतें. प्र. सिं.

---

## वर्तमानसार.

कोयनेनच्या बदला सिंकोनाईन हें तापावर देण्याची आलिकडे सुरवात झाली आहे, व सिंकोनाईनच्या झाडांची मद्रास इलाख्यांत सरकारानें बरीच लागवड केली आहे. त्याबद्दल एक पत्रकर्त्ता ह्मणतो कीं, हीं झाडें खेड्यापाड्यांतील सर्व लोकांनीं आपापल्या परसवांत लावावीं, अशी सरकारमार्फत तजवीज झाली पाहिजे ह्मणजे त्यापासून तें औषध स्वस्त होऊन गरीब गुरिबांस दवाखान्यापासून लांब अंतरावराहि मिळूं लागेल. ही सूचना फार चांगली आहे व ती सरकार मार्फत अमलांत येईल अशी आशा आहे.

सुमारें २५ दिवसांवर मुलतान एथील बाजारांत केरोसिन तेलाच्या एका दुकानास आग लागून ती आसपास पसरून बाजारचा बराच मोठा भाग जळून गेला.

राजापुराकडे गेल्या आठवड्यांत पाऊस बराच पडून नासाडी झाल्याचें समजतें.

पंढरपुरास चैत्राची यात्रा मागील दोन सालांपेक्षां यंदा जास्त भाली होती. कामिटीस ३९०० रु. कराचें उत्पन्न झालें. वाखा उद्भवला नाहीं.

मि. कृष्णराव गोपाळ देशमुख नवसरीचे जज्ज यांस मस्तकांत विकार झाल्यामुळें त्यांस तूर्त दूर केल्याचें आह्मीं मागें लिहिलें होतें. हल्लीं असें कळतें कीं, कृष्णराव हे दिवसेंदिवस बरे होत असून त्यांस तूर्त भरपगारी ३ माहन्यांची रजा देण्यांत आली आहे.

महाबळेश्वर— नामदार गवरनर ह्या० प्रायव्हेट आणि मिलटरी सेक्रेटरीसह एथें आले. कमांडरन्चीफ सा० याची स्वारी यथें येऊन दाखल जाहली. बालू सालीं अतिशय गर्दी जाहली आहे. अद्याप सा० लोक, पार्शी वगैरे लोक येत आहेत. एथील हवा अतिशय हितकारक असून उन्हाळ्याची स्मृती सुद्धां होत नाहीं. उष्ण मापकांतील थरमामेटर मधील पारा दोन प्रहरीं७७ अंषावर असतो पश्चिमेचा वारा संतव शितळ असा वाहात आहे. त्यांत थोडा परजन्य पडल्यानें रस्ते वगैरे स्वस्छ जाहले आहेत. एथील युरोपियनचे लायब्ररींत नवीन पुस्तकें आणविलीं आहेत आणि तेथें घड्याळाची सोय केली आहे.

गेल्याच्या मागच्या गुरुवारीं कलकत्याच्या पोलिसकोर्टांत असा मुकदमा होता कीं मि० इवेंग नावाच्या गोऱ्याच्या चाकरानें त्याचा एक कोट आंगांत घालून दोन दिवस बाहेर राहून तिसरे- दिवशीं आपण होऊन परत आला. मग धन्यानें त्याला पोलिसाच्या हवाली करून त्याजवर चोरीचा दोष ठेविला. परंतु माजिस्त्रेटानें ती चोरी होत नाहीं असें ठरवून त्यास सोडून दिलें. फिर्यादीनें माजिस्त्रेटास प्रश्न केला कीं, कोटाच्या ऐवजी जर माझें सोन्याचें घड्याळ व सांखळी; अथवा घोडा नेला असतां तर ? ती गोष्ट अगदीं भिन्न असें माजिस्त्रेटानीं सांगितलें.

मुंबई इलाख्यांतील हवा, पाणी व पीक यांचे संबधानें तारीख ९ मिनहू रोजीं जो सरकारी रिपोर्ट प्रसिद्ध झाला त्याजवरून हकीकत कळेते ती येणेंप्रमाणें:—

कराची—नदीस पाणी ४ फूट ९ इंच होतें. मागील सालीं हें पाणी ३ फूट ९ इंच होतें. १४ तालुक्यांत देवीचा अजार व दोन तालुक्यांत गुराढोरांचा अजार सुरू आहे. हवा फार उष्ण आहे. हैदराबाद— ४ तालुक्यांत तापाचा अजार साधारण सुरू आहे. ४ तालुक्यांत गुराढोरांचा अजार सुरू आहे. मेरो, नऊशाऱ्हो,व कंडियारो एथें देवीची सांथ चालू आहे. उत्तर सिंधसरहद्द-- हवा फार उष्ण आहे. रबीची मळणी व खरीपाच्या पेऱ्याची तयरि आहे. नदीकिनाऱ्यावरील पिकें बरीं आहेत. सर्व जिल्ह्यांत देवीची सांथ सुरू आहे. थळ तालुक्यांत गुराढोरांचा अजार सुरू आहे. अमदावाद — पुढील पिकाकरितां कांहीं तालुक्यांत जमीन खतावणीचें काम सुरू आहे. पंचमहाल— हवा फार उष्ण झाली आहे. खेडॉ—रयत निरोगी आहे. माटर तालुक्यांत गूराढोरांचा अजार सुरू आहे. भडोच—हवा फार उष्ण झाली आहे. रयत निरोंगी आहे. नाशीक—एका तालुक्यांत शितज्वरांचा अजार सुरू आहे. इगतपुरी एथें गुराढोरांचा अजार सुरू आहे. मळणीचें काम पुरें झालें असून पुढील पिकाकरितां जमीन तयार होत आहे. हवा उष्ण होत चालली आहे. ठाणें—रयत निंरोगी आहे. कुलाबा—( तारीख १ मिनहूपर्यंत रिपोर्ट ) अलीबाग एथें गोवर व देवींची सांथ आहे. महाड एथें तापाची सांथ व गुराढोरांचा अजार सुरू आहे रबीच्या पिकाचे मळणीचें काम सुरू आहे. रत्नागिरी—(तारीख २७ एप्रिल पर्यंत रिपोर्ट) मळणीचें काम सुरू आहे, संगमेश्वर एथें तापाची सांथ सुरू आहे. पुणें—(तारीख २ मिनहूपर्यंत रिपोर्ट) जिल्ह्यांत ज्वारीची धारण उत्तम आहे. परंतु बाजरीची धारण चढत आहे. अहमदनर—पुढील पिकाकारितां जमीन तयार होत आहे. सातारा—हवा उष्ण झाली आहे. रयत निरोगी आहे. कलादगी— तापाची सांथ किंचित सुरू आहे बेळगाव-- बिडी, संपगाव, चिकोडी, परसगड, गोकाक व बेळगांव तालुक्यांत पर्जन्यवृष्टि झाली. पुढील, पिकाकरितां जमीन तयार होत आहे. धारवाड--- सात तालुक्यांत व पेल्याचे गावीं सरासरीच्या प्रमाणांनें ३१ दोकडे पर्जन्यवृष्टि झाली. किंचित तापाची सांथ सुरू आहे. दोन तालुक्यांत गुरांढोरांचा आजार सुरू आहे. कपशीची वेचणी चालू आहे व इतर सर्व पिकांचे मळणीचें काम बहुतेक अंशानें पुरें होत आलें आहे. कानडा- पुढील पिकाकरितां जमीन तयार होतें आहे. सर्व तालुक्यांत सरासरीचे प्रमाणानें ३० दोकडे पर्जन्यवृष्टि झाली. हवा फार उष्ण झाली आहे. राजकोट-- हवा फार उष्ण झाली आहे. रयत निरोगी आहे. गोहेलवाड तालुक्यांत सोनगड एथें थोडीशी पर्जन्यवृष्टि झाली. बढवान--- रयत निरोगी आहे. दोन प्रहरचे एक वाजतां सावलीं उष्णमापक यंत्रांत पारा ११! अंशावर असतो. बडोदें- रबीची मळणी पुरी झाली कडी डिव्हिजनांत ज्वारीची पेरणी सुरू झाली आहे. खरिपाचे पेऱ्याकरितां जमीन तयार होत आहे. रयत निरोगी आहे. धारणींचें मान कायम आहे.

एकंदरीनें खरीपाच्या पिकाकरितां सर्व ठिकाणीं जमीन तयार होत आहे. हैदराबाद जिल्हा शिवाय करून इतर ठिकाणची रयत निरोगी आहे. धारवाड व कानडा जिल्ह्यांत थोडीशी पर्जन्यवृष्टि झाली. ज्ञा. प्र.

आफगाण लढाईचा खर्च वाढल्यामुळें १,१३,००,००० रुपये काढण्याचें हिंदुस्थान सरकारानें ठरविलें आहे.

बन्नी राजा आपल्या हद्दींतील युरोपियन वगैरे लोकांशी आलीकडे चांगला वागू लागला आहे. व त्यांचे तुम्बलेले पगार दिले व त्यामुळें तो राजा लोकप्रीय होत चालला आहे. अ. द.

गेल्या बुधवारीं मुंबई येथील न्यू मिन्त आणि वेहत गिरणींत बायलर फुटून वाफ बाहेर पडली, त्यामुळें ८।१० असामी कांकींने होरपळून दोन असामि लागलेच मेले; व दोन असामि दुसरे दिवशीं इस्पितळांत मेले. या अपघाताबद्दल चौकशी चालू असून ती खलास होऊन निकाल होईपर्यंत गिरणीचें काम बंद आहे.

पुणें एथें येत्या सप्टेंबरच्या अठरावे तारखेस ज्या घोड्यांच्या शर्यती व्हावयाच्या आहेत त्याकरितां नव्या गवर्नर साहेबांनीं एक हजार रुपये दिले.

गवर्नर जनरल साहेबांचे पत्र व त्यांनीं दिलेल्या देणग्या तारीख ११ रोजीं मोठ्या समारंभानें वालीशियर अल्लीखान यांस जनरल निमरोझ व दुसरे कितीएक कामगार व बडे लोक यांचे समक्ष नजर करण्यांत आल्या. वालीशियर अल्लीखान यानें असें बोलून दाखवेलें कीं दुराणी नसणाऱ्या लोकांवर जो शिरगणतीचा कर आहे तो व तांब्याच्या नाण्याच्या व्यवहारामध्यें जी मनास वाटेल तशी अव्यवस्था करण्यांत येते ती या दोन उपद्रव करणाऱ्या गोष्टी बंद करावयाच्या.

राणी साहेबांनीं मि. मानियर विलियम्स व मि. बोडन आक्सफर्ड एथील युनिव्हर्सिटीचे संस्कृत प्रोफेसर यांनां हिंदुस्थानांतील आपल्या राजाचे कंप्यानिअम आफ धि आर्डर ही पदवी दिली.

माद्रिड एथील एक पत्रकर्ता ह्मणतो कीं स्पेनच्या राज्यास ठार मारण्याचा यत्न करणाऱ्या ओटेरो नावाच्या मनुष्यास पकडला तेव्हां त्यानें असें कबूल केलें कीं, मी ज्या मंडळीच्या हुकुमावरून हा यत्न केला त्या मंडळीनें मला अशी ताकीद दिली आहे कीं जर तूं राजाला मारलास नाहींस तर तुला मारूं.

लग्न ही एक लोडत आहे अशी एक ह्मण आहे. याविषयीं एक उदाहरण नुक्तेंच घडलें तें असें: —

" मेन या नावाचे गावीं राहणाऱ्या एका शेतकऱ्यानें बोस्टन एथील एका उत्तम सुशिक्षित स्त्रीशी लग्न लाविलें. सदहू स्त्रीनें आपलें पूर्ववय भूगर्भशास्त्र व खनिजपदार्थ ज्ञानशास्त्र यांचा लक्षपूर्वक अभ्यास करण्यांत घालविलें असल्यामुळें तीस रध्या घरधंद्याची माहिती नव्हती. ती जेव्हां नवऱ्याबरोबर आपल्या घरीं गेली तेव्हां घरांतील कामधंद्याकडेस लक्ष न देतां तिनें आपल्या नवऱ्याच्या शेतांतून हिकडे तिकडे फिरण्याचा धंदा धरिला, आणि लवकरच एक सोन्याची खाण त्या जमीनींत शोधून काढली. तें उत्पन्न इतक्यांतच १,००,००० रुपये झालें आहे.

मलबार नावाची बोट बिलायतेस परत जात असतां तींतील १२ पुरुष, एक बायको व तीन मुलें इतके मनुष्यें मेलीं. यांपैकीं एका मनुष्यानें हिंदी महासागरांतून बोट जात असतां पाण्यांत उडी टाकून आत्महत्या केली. एक बायको बाळंत होऊन तिला दोन मुलें झालीं होतीं तीं दोन्ही मुलें मेलीं.

लंडन तारीख ७ मे च्या तारेवरून—मि. फॉसेट यानीं आपल्या कामाचा चार्ज घेतला व हेकनी एथील निवडणूक करणाऱ्या मंडळासमोर येऊन त्यांनीं आपणास पुन्हा मुखत्यार निवडल्याबद्दल त्या लोकांचे आभार मानून ते ह्मणाले कीं, "सरकाराला पहिल्यानें हिंदुस्थानच्या जमाखर्चाच्या संबंधानें विचार केला पाहिजे व जमाखर्चाच्या चुकीच्या बंदोबस्ताची लक्षपूर्वक तपासणी करून ज्यांच्या शिरावर त्याबद्दल जबाबदारी असेल त्यांना त्याचा जबाब विचारिला पाहिजे, आणि अफगाणिस्थानचे लढाईचा खर्च सोसण्यात इंग्लंडनें हिंदुस्थानास मदत केली पाहिजे.

कान्स्टान्टीनोपलच्या ७ मेच्या तारेवरून कळतें कीं, सुलतान साहेबांनीं रशियानें घात केल्या भिडेस कबूल करून कर्नल कामेरडाफ यास देहांत शिक्षा दिली. इं. प्र.

तारीख ८ मिनहूस रात्रीं बारा वाजण्याचे सुमारास पश्चिमेकडून पूर्वेस ह्मसदी व कुसुंबे या गावचे दरम्यान एक मोठा भयंकर तारा पडला. त्याचा प्रकाश चंद्राप्रमाणें असून अवाज मोठा झाला.

धुळ्यास एक ह्मातारा पेनशनदार आग्रा रोडच्या रस्त्यानें घोडा भरधाव उडवीत असतां त्यावरून खालीं पडला व त्या योगें तो आजारी होऊन मरण पावला. आ. व.

सोलापुरास लायसेन्स ट्याक्स आकारणीचे जाहिरनामे शहरांत प्रसिद्ध झाले असून वसुलासही सुरुवात झाली आहे. १०० रु० पर्यंत माफी व त्या पुढील उत्पन्नावर शेकडा १८ प्रमाणें आकारणी करण्याविषयीं ठराव झाल्याचें आजपर्यंत ऐकत होतों पण हल्लीं ७ रुपयेपर्यंत कर देणार लोक माफींत काढून बाकी सर्व लोकांवर शेकडा १ रुपये प्रमाणें आकारणी झाली आहे असें कळतें.

सोलापुरास रावजी कस्तुरचंद गुजर यांचे एथील लग्नाची मिरवणूक निघाली होती. त्यांत बंदुका व कडाबिणी सोडणारे लोकांस दारूचा पुरवठा करणारा एक मनुष्य खांद्यावर दारूची थैली घेऊन हिंडत होता त्याला अशा रीतीनें दारू घेऊन समारंभांत मिरवूं नये ह्मणून गुणिधर नावाचे मनुष्यानें १।२ वेळ सांगितलें. शेवटीं रागें भरून हरकत केली आणि बाटल्यांतून किंवा भांड्यांतून तोंडें बंद करून दारू घेऊन हिंडावें असेंही सुचविलें. परंतु बाटल्या व भांडें कोठून आणूं असें उलटें त्याच्यावर रागावून दारूची थैली घेऊन मिरविण्याचा क्रम होता तसा चालविला. सुमारें पाऊण हिस्सा पावेतों मिरवणूक निभावली. शेवटीं मंगळवार पेठेंत फार दाटी झाली तेव्हां कडाबिणी उडविण्याचे गर्दींत कसी ठिणगी पडली याकडे कोणाचें लक्ष्य पोंचलें नाहीं. एकाएकी भक्क भक्क झालें त्या योगानें निमिषमात्रांत आतपावचे तमासगीर सुमारें २०।२२ भाजले. दारू थोडी राहिली होती ह्मणून महाप्रळय फारसा झाला नाहीं. तरी कपडे जळून भाजणारांचे अंगाचीं कातडीं लोंबूं लागलीं ! कांहीं शहाणे लोकांनीं तत्काळ तंगि खालीं करून लोकांस इस्पितळांत पाठविलें. समारंभाचा बेरंग झाला. भाजलेल्या माणसांपैकीं कांहीं अत्यावस्थ झाले आहेत तथापि दगावण्यासारखे कोणी नाहींत असें ह्मणतात. बंदुकवाल्यास त्यांचे शिंगड्यांत अगाऊ दारू वाटून देणें ही रीत प्राय: अपकारक नाहीं; पण तसें लोक एथें करीत नाहींत. दारूची पिशवी घेऊन दाटींत मिरवण्याचे त्यांस बरें वाटतें पेस्तर असें न होण्याविषयीं खबरदारी ठेवावी. "दारूचा कायदा क्षणमात्र उल्लंघन झाला किंवा हयगय झाली तर तत्काळ इन्साफावाचून देहांत शिक्षा होते असें मि. गणेश बाबाजी साठे यानीं आपले दारूचे पुस्तकांत एक वाक्य लिहिलें आहे. त्याची सूचनार्थ आह्मी एथें पुनरावृत्ती करतों बाराचे दारू शिवाय इतर दारू इतकी तलखन ते व पळून जाण्यास कांहीं तरी सवड मिळते; परंतु बाराची दारू एकदम आपले १७२८ पटीनें अग्नि उत्पन्न करतें असें प्रमाण मि. साटे यानीं सिद्ध केलें आहे. एक तोळा दारूवर १७२८ तोळें दारू मावण्या एवढें मटकें ठेवून आंतील दारू पेटविली असतां मडकें भरून अग्नि होतो ह्मणून मडकें उडून पडतें. ही गोष्ट बाराचे दारूविषयीं सर्वांनीं लक्षांत ठेवावी. ह्मणजे समारंभोंच रंगांत बदरंग कधींहि होणार नाहीं. सदरची बातमी लिहून तयार झाल्यांनतर आतांच इस्पितळांत कांहीं मनुष्यें मेल्याची खबर कळत आहे; तथापि तिच्या खरेखोटेपणाविषयीं निश्चयात्मक खुलासा पुढील अंकीं करूं. क० त०

आह्मांस लिहिण्यास दु:ख होते कीं, थोड्या दिवसांपूर्वी डा० अण्णा मोरेश्वर कुंटे यांणीं नेटिव वैद्यकाची शाळा मुंबईस घातली होती ती मोडली.

न्यू फ्री प्रेस पत्रांत युरोपखंडांतील कित्येक देशांतील विद्याप्रसाराची तुळणा केली असून ती मुंबई एज्युकेशनल रिकार्डाच्या फेब्रुवारीच्या अंकांत खालीप्रमाणें दिली आहे:—

जर्मनी, लोकवस्ती ४ कोटी २० लक्ष शाळा ६० हजार व ६० विद्यार्थी; ग्रेट ब्रिटन ऐर्लंड, लो. व. ३ कोटी ४० लक्ष, शाळा ५८ हजार, आणि विद्यार्थी ३० लक्ष; आस्त्रिया हंगारी, लोकवस्ती ३ कोटी ७० लक्ष; शा० ३० हजार, वि. ३० लक्ष; फ्रान्स, लोकवस्ती ३ कोटी ७० लक्ष; शा. ७१ हजार, वि. ४७ लक्ष; स्पेन, लोकवस्ती १ कोटी ७० लक्ष; शा. २० हजार, वि. १६ लक्ष; इटाली, लोकवस्ती २ कोटी ८० लक्ष; शा. ४७ हजार, विद्यार्थी १९ लक्ष; रशिया, लोकवस्ती ७ कोटी ४० लक्ष; शा. २२ हजार, आणि विद्यार्थी ११ लक्ष यावरून विद्याप्रसाराच्या बाबतींत इतर देशांपेक्षां रशियाचें पाऊल फार मागें आहे व यामुळेंच कदाचित ते लोक निहिलिस्टिक, सोशिअलिस्ट वगैरे अशा अज्ञान मूलक विचारांनीं व्याप्त असावेत.

आल्बेनिया एथें दंगा उत्पन्न झाला आहे. आतां हें तुर्कस्थानच्या पूर्ण नाशाचें चिन्ह दिसत आहे.

नवानगरच्या जाम साहेबांच्या दिवाणास निघून जाण्याचा हुकूम झाला होता, परंतु कोणा जबरदस्ताच्या मध्यस्तीनें त्यांस कांहीं दिवस संस्थानांत रहाण्याची परवानगी मिळून ते आपल्या अधिकाराच्या योग्य तेप्रमाणें तयारी करून मग निघून जातील असें समजतें.

आफगाणिस्थानच्या लढाईंत जे लोक जखमी व आजारी झाले आहेत. त्यांच्या साठीं बलरामपूर व रामपूर एथील राजांनीं एक-एक लाख रुपये सरकारास देण्याची खुषी प्रदर्शित केली असून ती सरकार मान्य करील आणि या फंडाच्या व्यवस्थेसाठीं कमेटी नेमली जाईल असें वाटतें.

काबुलच्या आसपास शांतता असून हवाही चांगली आहे असें तारीख ८ मेच्या काबुलच्या तारेवरून समजतें.

काबुलास पावसाची फार गरज होती तो तारीख १० मे रोजी सडकून पडला.

आर्मी कमिशनानें सुचविल्यावरून बाठ दारुबिणाऱ्या ह्मणून तीन नव्या पलटणींची सर हदीवर तावडतोब स्थापना व्हावयाची अशी सर्वत्र समजूत झाली होती. परंतु अशी कांहीं तजवीज साध्य होत नाहीं असें समजतें. ने. ओ.

पंडित दयानंद सरस्वति हल्लीं लखनौ एथें आहेत. तेथें त्यानीं तारीख ९ मे रोजीं आर्य समाजाची स्थापना केली.

अबदुल रहमानकडे पाठविलेले कमिशन कांहीं धोका न होता हिंदुकुशाच्या पलीकडे गेले. ता० ७ मे रोजीं रात्रीं जलालाबाद एथून कमिसरियट खात्याकडील सर्व गुरें लघमानखिंडींतील दंगेखोर लोकांनीं चोरून नेलीं. महमदजान हा कुशीच्या नैऋत्येस खारवार एथें असून त्यानें आपल्या गळ्यांत कुराण बांधून लोकांस धर्मयुद्ध प्रवृत्त करण्याचा पकार चालविला आहे.

अलाहाबाद, तारीख १२—अस्मोदीन याजकडून अशी बातमी कळते कीं, मालिक लोकांस पूर्वी अमिराकडून जितका पैसा मिळत होता तितका जर हल्लीं न मिळेलतर ते आह्मास प्रयेक ठिकाणीं अडथळा केल्यावांचून खचित रहाणार नाहींत. ते आपला सलाम ठेवण्याकरितां काबुलास जाण्यास मासूष आहेत. तथापि ते आपल्या मागण्या तिकडेच पाठवितील. व जर त्या मागण्या फलद्रूप न होतील तर ते निकराची लढाई करतील असें तारीख १० च्या सफेद संग एथील तारेवरून समजतें. हे मालिक आपलीं बायका मुलें डोंगरावर रवाना करीत आहेत. धान्य सामुग्रीचा वगैरे तोटा पडत चालला आहे. क० म्याकलिन यांची टोळी अलटीमोअर खिंडींतून जात असतां डोंगराच्या माथ्यावर वजीरि व बहूमत्ती जातींचे लोक जमलेले पाहून माघारी परतली. शत्रूंनीं पाठलाग केला नाहीं. पण आह्मांस त्या खिंडींतून जाऊं देऊं नये असा त्यांचा इरादा दिसतो. पु. वै.

मुंबई बंदरांत अपघात— गेल्या गुरुवारीं सकाळी ६॥ वाजतां एक होडी आगबोटीच्या पंखाच्या तडाक्यांत सांपडून तिच्या चिंधड्या उडाल्या व वरील तांडेल महमद सम्सुदीन याचा पाय गुडघ्याजवळ मोडला. दुसऱ्या एका खलाशाचा पाय मोडून फार इजा झाली. दोघांनीं अपघात होण्याच्या अगोदर सावध होऊन समुद्रांत उड्या टाकल्यां ह्मणून बचावले. सु: प.

---

हें पत्र अकोलें एथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत रा. रा. खंडेराव बाळाजी फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक १४ अकोला, सोमवार तारीख ३१ माहे मे सन १८८० इसवी. अंक २१

## वऱ्हाडसमाचाराची किंमत.

| | रु. |
|---|---|
| साचे अगाऊ | ६ |
| साल अखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ०४ |
| डाक हाशील. | |
| वर्षाचे अगाउ | १०८ |
| ,, अखेर | २ |

नवीन वर्गणीदार होऊं इच्छिणारे लोकांकडून अगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र सुरू केलें जाईल.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, १० ओळींचे आंत | १ |
| १० ओळीपुढें दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०३ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |

NOTICE TO CONTRIBUTORS.

*We invite the co-operation of all European and Native gentlemen in maintaining the status of this journal and to this end solicit contributions in the shape of News letters, stray notes &c. Contributors may rest fully assured that the confidence they place in us by sending communications will not be violated.*

## नोटिस

खालीं सही करणार याजकडून मजी मर्दे कृष्णाआप्पा वाणी हल्लीं वस्ती सासन तालुके दर्यापुर इला नोटिस देणार कृष्णाआप्पा वल्लद बाबुआप्पा वाणी वस्ती अडगाव तालुके अकोट सुमार सन १२८९ फसली कारणें नोटिस देतो असा जे तू मजला नोटिस दिली ते पावली यांतील मजकूर सर्व लक्षांत आला त्याचें उत्तर मी तुजला देतो तें येणेंप्रमाणें: —

तूं माझी लग्नाची बायको असून आठ दहा वर्षें झालीं तर तूं कोणतेही सालांत माझे घरीं पांच किंवा सहा महिने राहिली नाहींस अशी तूं आपले बापाची लाडकी असून नंतर तूं आपले वयात येऊन ऋतूप्राप्त तुझे बापाचे घरींच झाल्या. आह्मी आपले येथून शांतिकाकरितां पांच चार वेळ मूळ पाठवून तुजला घेऊन आले तुर्तातूर्तच तुझे मागें तुझा बाप कसबे अडगावचे बाजारास तंबाखु विकण्याचें मिशानें आला होता. मी गावांत नव्हतो. तुझा बाप माझे मागें त्याच दिवशीं डागिण्यासुद्धां व आणखी तुजजवळ ऐवज होना त्या समेत घेऊन गेला व शांतिकाचा नेम पुढें दोन चार दिवस राहिला होता तूं गेल्यामुळें तोही तसाच राहिला सामान मी करून ठेविला होता तो व्यर्थ गेला ह्या सर्व गोष्टींबद्दल पुढें तजवीज केली जाईल. तुझे बापाची अशी तुजवर प्रीति अतीनिकट व तुझी त्याजवर, अशी प्रीति कोणाची आढळत नाहीं. अशा प्रीतीपासून लोकांस काय फायदा होत असेल हें कळत नाहीं ह्या जगांत, अज्ञान मुलीची आणि मुलीस बापाची ममता सर्वत्रेंच असते ती अज्ञान असते तोंपर्यंत वयांत आल्या नंतर अतीनिकट प्रीति बापाची मुलीस आपले घरीं ठेवण्याविषयीं नसते व तिजल्याही बापाचे घरीं रहाण्याची गोढी नसते व तूं लिहितेस कीं तुझी पुरुषत्वांत नाहींतर तुझा व आमचा कधींही प्रसंग घडला नाही मी मनुष्यांत नाहीं हें तुजला कशावरून समजलें! तूं आतां माझे घरीं येऊन रहावे न आल्यास मी तुझेवर कोर्ट मारफत तजवीज करीन.

तुझा बाप तुजला ज्या दिवसापासून घेऊन गेला त्या दिवसापासुन अडगाव एथें आलीच नाहींस व तूं लिहिते कीं, तुझी फारकती देण्यास सिद्ध होता जगन्नाथ महाजन व दोन तीन इसमाचे फितुरामुळें तूं फारकत दिली नाहीं ह्या सर्व गोष्टी तुजला कशावरून माहित झाल्या असतील त्या असोत आह्मी समजतों कीं ह्या गोष्टी तुझा जो प्रियकर प्रीताचा स्नेही असेल त्यानें कळविल्या असतील. आतां तुजला या नोटिसीनें असें कळवितों कीं, नोटिस पावल्यापासून पंध्रा दिवसांचे आंत माझे घरीं सर्व डागिन्यांसहित यावें न आल्यास मी पुढें तुजवर कोर्ट मारफत तजवीज करीन. कळावे तारीख १९ माहे मे सन १८८० इसवी.

(सही) कृष्णा आप्पा वल्लद बाबु आप्पा वाणी वस्ती अडगाव दस्तुर खुद्द.

## पत्रव्यवहार

या सदरा खालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मत स मिळूनच असतील असें समजूं नये.

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांसः—

वि. वि. पत्रकर्ते महाराज अलीकडे आपले देशी वैद्यांविषयीं मुंबईकडे मोठी वाटाघाट सुरू झाली आहे. व याविषयीं वर्तमानपत्रांतुन चर्चा होत आहे, त्याप्रमाणें आपणही आपलें मत गेल्या दोन पत्रांच मागील अंकीं प्रसिद्ध केलें आहे. "इंग्लिश रीतीनें औषधोपचार करणारे युरोपियन व नेटिव डाक्टर लोकांनीं इकडील वैद्य व हकीम लोकांचे धंद्यास अडथळा करणारा असा कायदा करून तो चालू करावा ह्मणून सरकारास विनंती करणार आहेत." ही हकीकत ऐकून मला फार खेदाश्चर्य झालें. हा कायदा तुर्त जरी मुंबईबंदरापुरताच आहे तरी होतां होतां त्याची व्याप्ति सर्व प्रांतांत व देशांत होणारच. व तसें झालें ह्मणजे आमचे इकडील वैद्य व हकीम लोकांनीं स्वस्थ घरीं बसावें ! वाः ही केवढी बंधुप्रीति! 'आई ह्मणें मला मुलगा झाला व भाऊ ह्मणे मला काळ आला." अशी तऱ्हा व्हावयाची. आपलें सर्वांचें पोषण करणारी अशी जी ही देशमाता ही मोठ्या आनंदांत व उमेदींत आहे कीं माझीं तानीं तानीं बालकें मोठ्या चढाओढीनें अभ्यास करून युनिव्हर्सिटीच्या डिग्रया मिळवीत आहेत, सर्व कलेंत प्रवीण होत आहेत, वैद्यकक्रिया व शारीर शास्त्रांत निष्णांत होत आहेत व महत् प्रयासानें प्राप्त होणारी सनदी नोकरीही स्वपराक्रमानें प्राप्त करून घेत आहेत. तेव्हां माझ्या ह्या दुःसह स्थितीचा लवकरच जीर्णोद्धार होऊन माझी जी पूर्वीची कीर्ति सर्व जगांत गाजली आहे ती मला लवकरच प्राप्त होईल. व तेणेंकरून माझे शहाणें, वेडे, अनाथ, दुबळे, व विद्वान् अविद्वान्, यां सर्वांसच सारखें सौख्य प्राप्त होईल. व ही आशा देशमातेची खोटी नाहीं. तरी हल्लीं ही जी डाक्टर लोकांनीं कायद्याची शक्कल काढिली आहे तिच्यांत देशहिताचा, बंधु प्रीतीचा किंवा परमार्थिक बुद्धीचा लेश तरी आहे काय? यावर बहुतेक लोक " नाहीं " असेंच उत्तर देतील.

आमचे देशांत अनादिकालापासून चालत आलेली " वैद्यकविद्या ,,मलीन न होतां सज्ज आहे असें ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं. याविषयावर संस्कृतांत मोठाले ग्रंथ असून निघंट "रत्नाकर" इत्यादि मराठींतही मोठे ग्रंथ झालेले आहेत. वनस्पतीचा इकडे पुष्कळ भरणा आहे. या सर्वांची माहिती मिळवून धन्वंतरी सारखे राजवैद्यही आमचे देशांत अजून निवडून काढण्यास सांपडतात. या देशांत वनस्पती विपुल व ताजी मिळत असल्यामुळें बहुतेक कार्यभाग काढे, चूर्णें, चाटणें यांवरच आटपतो व ही चिकित्सा आमचे देशाचे दैन्य दशेस चांगली सहाय्य करिते. इतक्यावरच आमचे इकडील वैद्यसमुदाय निर्वाह करितो असें नाहीं; मोठ मोठाल्या मौल्यवान मात्रा, गुटिका, पाक व रसायनेंही पुष्कळ तयार करितात व त्यापासून पुष्कळांस गुण येतात तेव्हां ही वैद्यक विद्या आमचे लोकांत सज्ज आहे असें ह्मणण्यास काय हरकत आहे. शारीर शास्त्राचा अभ्यास आमचे इकडे डाक्टर लोकांपेक्षां कमी आहे ही गोष्ट सर्वत्र महशूर आहेच पण तेवढ्यावरून इकडील वैद्य व हकीम लोक केवळ टाकाऊ झाले आहेत असें कोणीही निष्पक्षपाती पुरुष कबूल करणार नाहीं. कैलासवासी डा. भाऊ दाजी व नारायण दाजी हे नेटिव असून इंग्लिश रीतीनें वैद्यक अभ्यास करूनच ते मोठ्या योग्यतेस चढलेले होते. विलायतेपर्यंतच नव्हे पण अमेरिकेपर्यंतही त्यांच्या विद्येचा व कीर्तीचा ध्वज फडकत होता व ते मुंबईसच रहात होते; पण त्यांस अशा प्रकारचा कायदा करण्याची जरूर पडली नाहीं. इतकेंच नाहीं तर ते इकडील साधारण वैद्यांपासूनही वेडीवाकडी हकीकत ऐकून घेऊन तिचा चांगला सदुपयोग करीत असत. त्यांस इकडील वनस्पतीविषयीं मोठा अभिमान असे व त्यांचे गुणावगुण ते जाणत असत; मग अलिकडील मुंबईचे डाक्टर मंडळीस सदर्हू कायद्यावाचून कोठें नडत असेल तें कळत नाहीं. बरें असो. सरकार सर्वांचें माय बाप आहे. प्रजा ही सर्व त्याचीं लेकरें आहेत. आईबापांची प्रीती सर्वांवर सारखी असते यावरून सरकार न्यायान्याय्य योग्यायोग्य पाहून पूर्ण विचारानें निकाल करील. फक्त एका पक्षाचेंच ह्मणणें कबूल करून दुसऱ्या पक्षाचें विनाकारण नुकसान करणार नाहीं असा भरवंसा ठेवून आज हा लेख पुरा करितो. कळावें, तारीख १८ मे सन १८८० इसवी.

आपला दास
रामात्मज,

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांस—

वि. वि. पत्रकर्ते महाराज, पुसद हा गाव वाशीम जिल्ह्यांत असून साधारण लोकवस्तीचा आहे एथें तहशिलकचेरी, सरकारीशाळा व पोस्टआफिस वगैरे आहेत. परंतु एथें लायब्ररी नव्हती ही एक मोठी उणीव वाटत असे. मुळची या प्रांताला विद्येची अभिरुची जरी कमी तरी इंग्रज सरकारच्या कारकीर्दीपासून विद्यादानाचा सतत प्रयत्न चालू असल्यानें अशा प्रकारची उणीव लोकांचें नजरेस सहज येऊन ती दूर करण्याविषयीं सर्व लोक मोठे उत्सुक असतात ही मोठी आनंदाची गोष्ट आहे. यास अनुसरून एथें एक लायब्ररी असावी असें कांहींकांस वाटत असे. व एथील कायमचे तहशिलदार खाजा बद्रोदीन यांचा ही मानस होता. चालू महिन्यांत ते एक महिन्याची रजा घेऊन बाहेरगावीं गेले असून त्यांचे जागीं रा. रा. कृष्णराव आपा साहेब वाशीम डे. कॅ. चे क्लार्क हे आले आहेत. यांणीं व रा. रा. दामोदर गणेश नायब तहशिलदार यांणीं तारीख १० माहे मजकूर रोजीं मनावर घेऊन सभा करविली सदर्हू लायब्ररीकरितां सभा एथील इंग्रजी मराठी शाळेंत भरली होती व गावांतील सर्व शेठ सावकारही आले होते; एथें लायब्ररी ह्मणजे पुस्तकालय स्थापन्याविषयीं सर्वानुमतें निश्चय होऊन वर्गणीची यादी सुरू झाली. पहिल्या बैठकींत ३०० तीनशें रुपयांचे आकडे पडले. पुढें प्रयत्न सुरू असून वर्तमानपत्रें व पुस्तकें मागविण्याची व्यवस्था होईल.

पत्रकर्ते महाराज, हें स्तुत्य कृत्य मनांत आणल्या सारखें रा. रा. कृष्णराव आपा साहेब अ. तहशिलदार व रा. रा. दामोदर गणेश नायब तहशिलदार यांचे प्रयत्नानें सिद्धीस गेलें हें त्यांस भूषणार्ह होऊन ग्रामस्थांवर मोठे उपकार झाले त्याचप्रमाणें एथील शेट ... र लोकांनीं ही आपल्या उदार हस्तानें सदर्हू लायब्ररी उभारण्याला सहाय्य केलें ह्मणून त्यांचीही तारीफ केल्यावाचून माझ्यानें रहावत नाहीं त्याप्रमाणें या सभेची स्थापना मोठ्या उमेदीनें झालेली आहे

त्याप्रमाणें तिचे आश्रय दायाकडून चिरकाल संतोषित व्हावें. व तिची सुधारणा करण्यात यांनीं सारेंच अशी अज्ञातिवर्गी त्यांस मी शिफारस करितो. यानंतर मजकूर आप ले माफी मागून हें पत्र पुरें करितो.

लायब्ररीचा एक
हितचिंतक.

---

रा. रा. गोविंद माधव खसखेडकर यांस-

वि० वि० आपण वऱ्हाड शिरोर बुकांतील शाळार्थींचीं बुकें तयार केलीं आहेत हीं उपयुक्त आहेत; यांचा खपही पुष्कळ होत चालला आहे परंतु व दुसरे पुस्तकांतील शाळार्थांचीं बुकें कोठेंच मिळत नाहींत तर तीं वऱ्हाडांतील सर्व बुकडेपोंत मिळतील अशी तजवीज करून वऱ्हाडसमाचार व प्रमोद सिंधूत जाहेरात द्यावी. ह्मणजे पुस्तक करण्याचा आपला जो उद्देश आहे तो सिद्धीस जाऊन सर्वांस घेण्यात सुलभ पडेल व अशाच पाहिज्या बुकाचाही शाळा अर्थ केला असतां होईल आपलीं हीं बुकें कोठें मिळतात हें नीट समजण्याकरितां वर्तमानपत्र द्वारा अथवा शाळापत्रकांतून कळवावें कळों लोभ असावा ही विनंती.

एक
हितेच्छु.

---

# वऱ्हाडसमाचार.

---

मिति वैशाख वद्य ८ शके १८०२

---

## काश्मीरचे महाराजावर अरिष्ट.

---

नुकताच जो काश्मीर देशांत दुष्काळ पडला होता तेव्हांपासून तेथील महाराजांचे संबधानें कुरकुर सुरू होऊन आजमितीस तरतिकडे तिकडे या प्रांताविषयीं चर्चा सुरू झाली आहे. दुष्काळाचे वेळीं काश्मीरचे महाराजांकडून त्यांचे प्रजेचें संगोपन यथायोग्य झालें नाहीं व प्रजेपैकीं बराच भाग अन्नावाचून यमसदनीं गेला अशाविषयीं त्यांचे पोलिटिकल एजंट साहेबांचा रिपोर्ट गेल्यावरून यांजविषयीं मागें कमिशन नेमिलें गेलें होतें हें आमचे वाचकांस आठवत असेलच. याशिवाय कोणी ह्मणतात परदेशीय राष्ट्राबरोबर राजकारणी कांहीं पत्रव्यवहार झाल्याचे कागदपत्र महाराजापाशीं सांपडले. कोणी ह्मणतात काश्मीरचे महाराजांनीं सन१८७९ इसवीचे फेब्रुवारी महिन्यांत ५०० लोक एका जहाजांत घालून वुलूर सरोवरांत मुद्दाम नेऊन बुडविले, कोणी ह्मणतात सुमार ४८ वर्षांपूर्वीं हा काश्मीर प्रांत ज्या वेळेस महाराजांस इंग्रज सरकारानें ७५ लक्ष रुपयांस विकत दिला आहे. ते ७५ लक्ष व व्याजा बद्दल १५ असे ९०लक्ष रुपये त्याचे त्यास परत देऊन सदरहू देश आपले ताब्यांत घ्यावा" अशीं निरनिराळीं पण "प्रांत खरा करा" अशा प्रकारचीं मतें इंग्रजी पत्रांतून प्रसिद्ध होत आहेत. व यावर एतद्देशीय पत्रांतूनही याविरुद्ध मतें प्रसिद्ध झालीं आहेत तीं अशीं:-

पंजाब प्रांतांत दुष्काळाचे वेळीं जसे बरेच लोक यमसदनीं गेले त्याचप्रमाणें मुंबई व मद्रास इलाख्यांतही दुष्काळाचे वेळीं इंग्रज सरकारच्या अमलाखालीं मेले ह्मणून याबद्दल जरी कोणास बडतर्फ केलें नाहीं तसेंच काश्मीरचे महाराजांकडूनही जरी बंदोबस्त बरोबर राखला गेला नाहीं ह्मणून तेवढ्याबद्दल त्यांस पदच्युत करणें बरोबर होणार नाहीं.

पत्रव्यवहार जो सापडला ह्मणतात तो इंग्रज सरकारच्या विरुद्ध नसता, काश्मीरचे महाराजांचें अंग इंग्रज सरकारच्या शत्रूकडे असतें तर या प्रांताचा निकाल होण्याला इतकी अवधी लागली नसती केव्हांच फडशा पडला असता.

तसेंच "महाराजांनीं ५०० लोक बुडविले" हा आरोप जर खरा असता तर तें जहाज बुडाल्यानें समजल्याबरोबर महाराज मोठे हळहळून मुद्दाम बुडविणारा दाखवून देणारास ५ हजार रुपये बक्षिस देण्याचें जाहीरनामे त्यांनीं प्रसिद्ध केले नसते.

आतां विकलेला देश व्याजासुद्धा पैसा देऊन परत घ्यावा हें किती योग्य आहे याविषयींही बरीच चर्चा झालेली आहे. एथपर्यंत इंग्रजी व मराठी वर्तमानपत्रकर्त्यांची भवति न भवति झाली याविषयीं खरा प्रकार काय आहे हें अजून खात्रीलायक कांहींच बाहेर आलेलें नाहीं ह्मणून याविषयीं आमच्यानें कांहीं विशेष लिहवत नाहीं. तरी याबाबदींत आह्मी आपले सार्वभौम दयाळु सरकारास इतकें सुचवितों कीं, कोणत्याही मांडलिक वा संस्थानिक राजांकडून किंचितही अपराध न व्हावा व यदाकदाचित झाला तरी तेवढ्यापुरतेंच त्यास चांगलें शिक्षण देऊन सुमार्गी लावावें तेणेंकरून तो एकटाच काय पण सर्व देशांतील राजे रजवाडेही कृतज्ञतापूर्वक उपकार मानित रहातील.

आमचे इंग्रजी पत्रकर्त्यांचे मताप्रमाणें ह्मटलें ह्मणजे कोणा राजा रजवाड्याचें अगर संस्थानिकाचें कांहीं गाऱ्हाणें कानीं आलें कीं, त्यास एकदम देहांत प्रायश्चित "पदच्युत करा" अशी शिफारस सुरू झालीच. एवढ्या तेवढ्या क्षुल्लक कारणावरून एकाद्या मोठ्या राजास वा संस्थानिकास पदच्युत करणें ह्मणजे केवळ देहांत प्रायश्चित्त सारखें नव्हे काय? इंग्रज सरकारची सरशी तो पूर्ण न्यायास अनुसरून असल्यामुळें इंग्रजी पत्रकर्त्यांच्या मताप्रमाणेंच कोणत्याही प्रकरणाचा निकाल होईल असें मुळींच कोणी समजू नये तशांतून हल्लीं लिबरलपक्षाची कारकीर्द सुरू झाली आहे तेव्हां या काश्मीर प्रकरणाचा निकाल पूर्ण विचारानें होइल व कोणाचेही हक्कास विनाकारण दखल होणार नाहीं अशी आह्मीं आशा बाळगतों.

---

The news from the seat of war portend approaching peace the latest being that the authorities have decided upon destroying all forts and defences constructed by our forces at Cabul, and evacuating the country as soon as Abdul Rahman has become settled on the throne. Abdul Rahman is the son of Abzul and grand son of Dost Mahhmed consequently a direct heir to the throne, the son of Shere Ali failing. The attitude of Abdul Rahman towards the british has been one of a feeling of strong animosity. In 1868 Yakoob Khan passed swords with Abdul Rahman when the latter was defeated and fled to take protection under the Russians. He has lived an exile from his country ever since His advent into Turkestan had thrown a gigantic shadow befor him of the extraordinary armies and the exagerated notions of his warlike capacities. The truth has now dawned, that feeling the power of the British, he has wisely allowed the legion? to disperse, and has under taken the office of adviser to his countrymen. He has now made advances towards the British in a friendly spirit whether he will prove himself more worthy than his predecessor, who possessed a like disposition time will reveal. Will it be politic to leave the country with out our accepting guarantees of peace [now that our arms have thrown it into a state of anarchy] and leave Abdul Rahman to work his own influence at Cabul and take the reins of Government from the hands of the people It would involve the country in another outburst of bloodshed The Kohistanis are in his favour but there are other powerfu tribes whose acquiescence he wil have to secure before assuming the sovereignty, and it will be better to be forewarned of the danger and Abdul Rahman be installed by the British and the terms of peace negotiated before the evacuation of the country is resorted to.

---

The Government of India has resolved to re-organise the P. W. Department and to this end appointed a committee comprising of the older members of the Department. The committee has completed its report and is now in circulation among the Junior members The number of appointments will be restricted to twelve per annum for the next ten years provided retirements after the age of 55 aggregate that number annually It is also proposed that no one in the Department shall draw more than Rs. 650 till he has arrived at the age of 35! (thou talismanic age) when he will receive an annual increment of Rs.25 It is moreover proposed that those Junior officers who now draw Rs. 650 shall wait there till they arrive at th coveted age of 35 when they will be entitled to the 25 Rs. annual increment. These proposals have naturally created a feeling of dissatisfaction in the minds of the Junior members. It would be more in consonance with equity were the older as well as the Junior members of the Department placed on an equal footing by the introduction of a gradusted scheme where regardless of age or interest, merit will be recognized and after allowing room for seniority where possible, merit be permitted to take precedence The constant organizations and re organizations of this Department during the past twelve years have established a sore point in many a poor Juniors breast while the older members have emerged out of them bearing laurels in their hands.

---

A concensus of Native opinion evidences a condemnation of Lord Lytton's administration

The "Native opinion" says that the outcome of Lord Lytton's four years Government is a fearful falling off in the respect in which high Indian officials have been hitherto held and a deep disgust at the tactics which such a dignified institution as the Government of India stooped to use.

The "Brahmo public opinion" says "To sum up. what has Lord Lytton done to ingratiate the people in his favour? Nothing worth mentioning. During the period of his rule, India has lost much, gained nothing. On the eve of his Lordship's departure from India, we do not like to call him to account for all his actions, but we hope his Lordship will ponder well, on his retirement, over his administration of India, and ask himself this question, — "What have I done for the mute millions whom providence sent me to rule?" and prepare himself to answer this question before the Great Tribunal before which he is sure to be, sooner or later summoned for reckoning."

---

Sir Richard Temple is resolved not to give himself any rest He has scarcely been defeated as a quondam conservative candidate than he is announced as being one of a commission sent out to enquire into the system of administration of the Indian finances. This piece of intelligence has created a lively sensation he will no doubt acquit himself creditably of the onerous charge he is expected to undertake where he will have many opportunities of exercising his talents.

---

The Martine Henri, is no doubt a treacherous friend. A few days ago some twelve men of Royal Artillery were marching in to the city of Candahar when the rifle of one of the men accidentally went off, the ball passing through one of his comrades arm, then through another comrades heart and lastly through another comrades brain. The two last are

reported to have died instantaneously.

The Officiating Resident of Hyderabad Mr. W. B. Jones has had a warm reception given him at the Ameer Kabeer. A party of about 60 sat down to a sumptuous repast which was followed by a pyrotechnic entertainment as well as by a display of muscular feats by athletes.

Major R. H. Hudleston lately Deputy Commissioner Akola District has retired from service from the 21st March 1880. This will give Colonel Bushby the 1st class Deputy Commissionership permanently while the other officers who have benefited likewise will be confirmed in their various grades. It will necessarily cause a vacancy in the 3rd class. We apprehend that Major Bullock will receive the 3rd class Deputy Commissionership.

Major D. W. Laughton has been promoted to the rank of Lieutenant Colonel from the 14th January 1880 and has met with the approval of Her Majesty the Queen Empress.

## वऱ्हाड.

हवामान— उष्णतेचें मान अजून कमी नाहीं शरीरांतून घर्मपूर रात्रंदिवस चालू असतात. केव्हां केव्हां अभ्रें येऊन उकाडा होतो, केव्हां मनस्वी वारा सुटून पावसाचीं चिन्हें दिसतात मेघराजाची गर्जना होते. व आसपास शिंपण्यागत थोडा पाऊस ही पडत असावा. तथापि एथें अजून ह्मणण्यासारखा पाऊस पडला नाहीं.

आपल्या महाराणी व्हिक्टोरिया सरकार यांच्या जन्म दिवसाचे उत्सवाकरितां गेले तारीख २४ रोजीं उमरावती व इलिचपुर एथें कचेऱ्यांत वगैरे सुटी दिली होती. परंतु हिंदुस्थान सरकारच्या ठरावाप्रमाणें अकोल्यास तारीख २९ रोजीं सुट्टी दिली होती ते दिवशीं सकाळीं पलटणीची कवाईत व बंदुकांची सरबत्ती झाली.

आमचे आफिशियेटिंग रेसिडेंट मि. जोन्स साहेब बहादूर यांस नवाब अमीर कबीर यांनीं मोठी मेजवानी केली-

एथील कायमचे व फर्स्टक्लास डिपुटी कमिशनर मेजर हडलस्टन यांणीं ता० २१ मार्च १८८० पासून नोकरी सोडल्यामुळें कर्नल बुषबी साहेब हे फर्स्टक्लास डि. क. होतील. अशीच वर्गावर्गी होऊन मेजर बुलक साहेब यांस कायमची थर्डक्लास डि. क. ची जागा मिळेल असें वाटतें.

मि. एदलजी बहिमनजी साहेब एथील असिस्टंट कमिशनर हे उन्हाळ्याचे सुट्टींत एक महिन्याची रजा घेऊन पुण्याकडे गेल्याचें आह्मी मागें कळविलेंच आहे ती रजा गेले २१ तारखेला पुरी झाली सबब पुन्हा एक महिन्याची रजा त्यांनीं घेतल्याचें कळतें

रा. रा. गोपाळराव महादेव भिडे यांस नाशिमास क्लार्क आफ् धि कोर्ट नेमल्याप्रमाणें तिकडे जावयाचे पण त्यांस औषधोपचाराकरितां पुण्यास जावयाचें होतें ह्मणून ता. १६ जूनपर्यंत रजा घेऊन हल्लीं पुण्यास गेले आहेत तिकडून आल्यावर नाशिमास रुजू होतील.

रा. रा. बळवंत राजाराम कावळे एथील डे. क. चे डिपुटी क्लार्क हे गेल्या सोमवारी १० दिवसाची रजा घेऊन लग्नाकरितां नाशिकास गेले.

आज मे महिना संपून उद्यांक जून महिना लागणार. उष्णकाळानिमित इकडील शाळाखात्याला जी एक महिन्याची सुट्टी असते ती हैस्कुलें लेरीजकरून खलास झाली यंदा में महिन्यांतही पुष्कळ लोंअरक्लास व मेडिलक्लास सुद्धां शाळा चालू होत्या तरी ज्यांनां विशेष कामामुळें सुट्टीची जरूर होती त्यांनीं लोअरक्लास सुद्धां शाळा बंद ठेविल्या होत्या. त्याही उद्यापासून सुरूं होतील. व हायस्कुलें १० जूनला सुरूं होतील.

गेले आठवड्यांत एथील रेलवे स्टेशनावर एक दोन हमालांनीं दहाएकशेर गूळ चोरल्याबद्दल मुकदमा. मे. किटूससाहेब अ. क. यांचे पुढें चालून त्या उभयतांस फटक्याची सजा झाली. यावर एक अवलिया असें ह्मणतो कीं ही जी न्यायाधिशांनीं ह्या हमालांस सजा दिली ती त्यागरीब हमालांचे स्थितीस अनुरूपच आहे. कारण जर दंडाची सजा दिली असती तर त्यांचीं भांडीं कुंडीं विकावीं लागलीं असतीं, कैदेची दिली असतां त्यांचीं मुलें बायका अन्नावाचून मेलीं असतीं ह्मणून त्यांचे मनास ओळख राखण्यासारखी फटक्याची शिक्षा योग्य झाली. याबद्दल न्यायाधिश साहेबांची तारिफ केल्यावाचून रहावत नाहीं. याचप्रमाणें रेलवे कडील हा अधिकारी तजवीज करतील अशी आशा आहे."

इक डील अ. क. मेजर डीडब्ल्यू लाटन हे मेजर होते ते ता० १४ जानेवारी १८८० पासून लेफ्टनेट कर्नल झाले

एथील खजिन्याचे तपासणी करितां वाशिमाहून मि. हेर साहेब गेले शनिवारीं एथें आले.

अडगावचे अ. कमिशनर रा. रा. केशवराव महिपत खारकर हे रजेवर गेले होते ते परत येऊन आपले कामावर रुजू होण्यास या आठवड्यांत गेले.

रा. रा. गोविंद भाऊराव एथील तालुक्याचे चीफ कान्स्टेबल यांची प्रकृती नेहमी नादुरुस्त असल्या कारणानें व त्यांचे हातून बरिष्ठांचे मनामाफक काम होत नसल्यामुळें नुकताच त्यांचा एक क्लास कमी केला ह्मणजे ६० रुपये पगार होता तो ५० केला. ही अमलबजावणी होऊन थोडेच दिवस झाले. इतक्यांत त्यांस पेनशन घेण्याविषयीं डाक्टरचें सर्टिफिकिट पाठविण्याविषयीं हुकूम झाला होता असें ह्मणतात. परंतु डाक्टरानीं पेनशनास लायकीचे सर्टिफिकिट न देतां ६ महिन्यांची सिकलीव्ह देण्याविषयीं मत दिलें आहे असें समजतें.

येथील पूर्वीचें जंगलदरोगे मि. सय्यद इब्राहीम हे बदली झाल्याप्रमाणें यवतमाळास गेले. येथील जंगलदारोग्याची जागा कमी करण्याचा विचार होता पण तूर्त तसें न करतां मि. देवराव देशमुख ह्यांस त्या जागीं नेमलें आहे.

उमरावती एथें येत्या जून महिन्या पासून रा० रा० आंताजी गोविंद वकील हे "न्यायसार" नांवाचें एक कायद्याचें मासिक पुस्तक काढणार आहेत. या बद्दलची जाहिरात प्र० सिं०त प्रसिद्ध झाली आहे त्यावरून सर्व माहिती कळेल. याची वर्गणी वर्षाची ४ रु० ठेविली आहे.

गेलें आठवड्यांत उमरावती एथील एक दोन व्यापाऱ्यानीं दिवाळीं काढल्याचें कळतें.

उमरावती एथील लायब्ररीचे सभेंत तारीख १६ मिनहूरोजीं रविवारीं रा. रा. कृष्णराव सखाराम पोलिस इन्स्पेक्टर यांनीं "लहानपणी मुलांचीं लग्नें न होऊं देण्याची अवश्यकता" या विषयावर व्याख्यान दिलें. सभासद मंडळी कमी असल्या मुळें विषयाचे संबंधानें फारसा वादविवाद झाला नाहीं. रा. रा. गणपतराव खापरडे हे या सभेचें अध्यक्ष होते. यांनीं विषयास अनुसरून थोडक्यांत चांगलें भाषण केलें. २३वे तारखेस रा. रा. आंताजी गोविंद वकील यांनीं "शेतकीचा किंवा नोकरीचा धंदा चांगला" या विषयावर निबंध वाचला. प्र सिं.

### मागाहून आलेली नोटिस.

रावजी वल्लद जानजी पाटील रहाणार मौजे डोंगरगांव तालुके बाळापुर यांस मालुम बी व शेख हवतु वल्लद शेखचांद इनामदार मौजे डोंगरगाव तालुके बाळापुर यांजकडून नोटिस देण्यांत येत कीं, आह्मी अकोटास रहात असल्यामुळें मौजे डोंगरगाव तालुके बाळापुर एथील आमचे इनामशेत नंबर १०९ चें आह्मी तुह्मास बरेच दिवसांनां लावून काटिलें आहे त्याचा सारा दरसाल १० रुपये तुह्मी आह्मास देत असता हल्ली आह्मी अकोटाहून डोंगरगावीं रहावयास आलों आहों. व सदरहू आमचे इनामाचे शेत आह्मी घराच वाहण्याचा निश्चय केला तर या वर्षी सदरहू शेताचा कितगार्गा व पेरण वगैरे काहीं तुह्मी करूं नये. इतक्या उपर तुह्मी हट्टानें पेरण वगैरे कराल तर आह्मी दिवाणी त फिर्याद करून पिकांचे नुकसानासुद्धां सदरहू शेत परत घेऊ. या नोटिशाचा व कोर्टाचा खर्च तुह्मावर बसेल कळावें. तारीख २९ माहे मे सन १८८० इसवी.

( सही ) मालुम बी व शेख हवतु वल्लद शेखचांद इनामदार

दस्तुर खुद

## वर्तमानसार

पुणें येथील प्रदर्शनास जून महिन्याचे आरंभीं बहुधा सुरवात होईल.

ब्रिटिश सरकारच्या विरुद्ध कट करण्याच्या आरोपावरून प्रसिद्ध मुस्ताफी यांस ता. १९ मे रोजीं पकडून तारीख २० रोजीं सकाळीं त्यांस हिंदुस्थानाकडेस पाठविलें. सदरहू मनुष्यावर कपटाच्या आचरणाबद्दल बरेच दिवस वहमा होताच, अखेरीस त्याच्या अपराधाबद्दल पुरावा सांपडला.

नवे गव्हरनर जनरल लॉर्ड रिपन हे तारीख २६ मे रोजीं अगर त्या सुमारास एडन येथें येऊन पोंचतील व जूनच्या पहिल्या तारखेस मुंबईस येतील.

रत्नागिरी — पर्जन्याची चिन्हें होऊं लागलीं. उन्हाळा फारच होत आहे. रोगराई ह्मणण्यासारखी नाहीं. धारणेचें मानही साधारण आहे.

पुरंदर किल्याची तावडतोब दुरुस्ती करून त्यावर लढाईचें सामान ठेवणार, व छावणीचीही दुरुस्ती होणार असें कळतें.

रामोशी लोकांस पल्टणींत नोकरीस ठेवण्याचा सरकारी ठराव झाला.

सोमयागास सुरुवात.— कोल्हापूर येथें गेल्या आठवड्यांत सदरहू बाग पदमाळे वेशीकडील श्री. विठोबाचे देवालयांत सुरू होऊन सर्व प्रायश्चित्तें वगैरे झालीं. यज्ञास आरंभ येत्या शुद्ध पौर्णिमेस होणार असें ऐकतो. यज्ञमंडपाची व्यवस्था सरकारांतून झाली आहे. आधानासिध्यर्थ कोण कोण ऋत्विज आहेत तें पुढें लिहूं. याप्रमाणें ज्योतिष्टोम नामक यज्ञ येथें सुमारें २०।२१ वर्षांच्या पाठीमागें झाले होते असें ह्मणतात

मद्रास मेल पत्रकर्ते ह्मणतात कीं "रंपा दंग्याची शांतता कायमची झाली नाहीं व तो दंगा पुन्हा सुरू झाला हें पाहून आह्मास खेद वाटतो" "काल रोजीं ( १३ व्या तारखेस ) उटाकमंड येथें आतां चांगली तजवीज काय करावी या गोष्टीचा विचार करण्याकारितां कौन्सिल भरलें होतें. कर्नल बक यांस बंडखोराच्या पाठलागाकरितां मालकंजी या तालुक्यांत तावडतोड फौज पाठविण्याविषयीं हुकूम झाला व जयपुरच्या राजास सदरहू सैन्यांस सामग्रीचा पुरवठा करण्याविषयीं विनंती केली आहे.

१६ मे रोजीं पुण्याच्या सर्व प्रकारच्या लोकांची जाहीरसभा टाउनहालमध्यें भरली होती त्यावेळेस लिबरलपक्षाचे पुढारी लोकांनीं राज्यसूत्रें आपल्या हातांत घेतल्याबद्दल आनंद प्रदर्शित करण्याकरितां व आतां त्यांनी रयतेच्या दुःखाचें निवारण करण्याकरितां पार्लमेंटकडेस अर्जी पाठविण्याचें ठरलें. या अर्जातील मुख्य गोष्टी पुढीलप्रमाणें आहेत. देशी भाषेतील वर्तमानपत्रांबद्दलचा व हत्यारांबद्दलचा कायदा रद्द करणें, आफगाणिस्थानच्या लढाईच्या संबंधानें खर्चाबद्दल रास्त ठराव करणें, व कायदे कौन्सिलमध्यें प्रजेचे तर्फेनें बोलण्याकरितां मुखत्यार नेमण्याचा हक्क देणें. या कलमांबद्दल सर्वांनीं तारीफ केली ती अर्जी सर डेविड वेडरबर्न व मि. लिइंग यांच्या हवालीं करण्याचें ठरून शिवाय पुण्याच्या मुनिसिपालिटीचे कमिशनर निवडण्याचा लोकांनां अधिकार देण्याविषयीं सरकारास अर्ज करण्याकरितां एक कमिटी नेमण्याचेंही ठरलें. इं. प्र.

# नेटिव संस्थानाविषयीं

पुणें एथील वक्तृत्वोत्तेजक सभेचे चालू सालच्या समारंभांत रा. ब. महादेव गोविंद रानडे यांणीं जें सुरस संभाषण केलें त्यांपैकीं श्री समर्थ रामदास स्वामी यांचे श्लोकाचे संबंधाचा भाग तारीख १७ मिनहूच्या ज्ञानप्रकाशांत छापिला. ह्याच संभाषणांतील नेटिव संस्थानचे संबंधाचा दुसरा भाग येणेंप्रमाणें:-

“दुसरा विषय नेटिव संस्थानांतील राज्यकारभाराच्या व्यवस्थेविषयीं आहे. याबद्दल मला कांहीं फारसें बोलण्याची जरूर नाहीं; कारण या विषयाची चर्चा कांहीं प्रसंगाच्या संबंधानें सुरू करण्याचा विचार मजकडूनच निघाला होता. यास्तव या विषयाबद्दल मी बोललों तर त्यामध्यें कांहीं नवीन येणार आहे असें नाहीं. आजचा विषय या ठिकाणीं नेमण्याचा उद्देश इतकाच होता कीं, या विषयाचा विचार चार लोकांत सुरू होऊन शहाण्या संस्थानिकांच्या किंवा मुत्सद्यांच्या हृदयामध्यें प्रेरणा होऊन कांहीं वर्षांनीं जरी एकादें सुधारलेलें राज्यपद्धतीचें रोप लागलें तरी पुष्कळ लाभ होणार आहे. या विषयाच्या संबंधानें एका पुस्तकांत निबंध अलीकडे आला आहे त्यावर आपल्या मंडळींपैकीं एका सर्वमान्य व अनुभवशीर गृहस्थानीं आजचे प्रसंगीं एथें बोलावें अशी योजना केली होती. परंतु कांहीं कारणामुळें त्यांचें येणें आज झालें नाहीं. तथापि या बाबतींत आपला अनुभव काय आहे याबद्दलचे विचार त्यांनीं मला कळविले आहेत. जेव्हां एकाच मनुष्याचे मर्जीवर राष्ट्राचें बरें वाईट करण्याचें काम अवलंबून असतें, तेव्हां अव्यवस्थितपणा थोडा बहुत होतो. तो अव्यवस्थितपणा कमी व्हावा हें सर्वांशीं इष्ट आहे. नेटिव संस्थानामध्यें अमक्या एक रीतीची राज्य व्यवस्था असूं नये किंवा जसे ब्रिटिश सरकारच्या राज्यांत कमी जास्त ठराव होतात तशाच रीतीचे ठराव नेटिव संस्थानांत सुरू करावे. हें ह्मणणें पुष्कळ अंशीं व्यर्थ आहे. ‘यथा राजा तथा प्रजा’ हें ह्मणणें खरें नाहीं. ‘यथा प्रजा तथा राजा’ हाच विचार खरा आहे. याचा अनुभव सर्वत्र आहे. जी प्रजा राजाचा जुलूम सोसून घेते त्या प्रजेवर जुलूम होतो यांत नवल तें काय? जितक्या अंशानें अव्यवस्थितपणाविषयीं प्रजा तक्रार सांगत नाहीं तितक्या अंशानें अव्यवस्थितपणा होणार असें समजावें. लोकस्थिति न सुधारतां केवळ राज्यपद्धति सुधारून उपयोग होणार नाहीं. ज्या मानानें लोकांमध्यें पात्रता असेल तितके अंशानीं राज्यव्यवस्था नीट होणार आहे. परंतु त्यांच्यामध्यें खरी पात्रता नसतां आपण राज्यामध्यें किती जरी वरवर व्यवस्था केली तरी ती सर्व व्यर्थ आहे. राज्यव्यवस्थेचा पाया लोकव्यवस्थेंत आहे. यास्तव लोक शहाणे व्हावेत, त्यांचा उद्योग वाढावा, त्यांच्यांत स्वतंत्रता यावी, अशा रीतीचा प्रयत्न झाला असतां त्या राज्यव्यवस्थेची पद्धत वाईट असली तरी त्यापासून वाईट परिणाम होत नाहीं. हा विचार स्वतंत्र लोकांच्या संबंधानें आहे. अशा रीतीची स्वतंत्रता आज आपल्या लोकांत राहिली नाहीं. ब्रिटिश अमलांत स्वतंत्रता पुष्कळ आहे. परंतु लोक ह्मणतील ती पूर्व दिशा ही स्वतंत्रता हल्लीं नाहीं. तशी स्वतंत्रता पुष्कळ दिवसांनीं प्राप्त होण्याकरितां परमेश्वरानें आपल्यास सुधारलेल्या राष्ट्रांतील गुरूचे शाळेंत घातलें आहे. त्या शाळेंत आपण विद्यार्थी आहोंत, तोंपर्यंत गुरूजवळ परिचर्या करून, मधुकरी मागून अधिकार प्राप्त करून घेतला पाहिजे. [cheers] असें जरी आहे तरी सर्व नाहीं पण आज दहा वीस संस्थानें आहेत त्यांत कांहीं अंशानें ही स्वतंत्रता तेथील लोकांस शक्य आहे. अशा संस्थानांत चांगली व्यवस्था करण्याची कांहीं तजवीज काढिली तर चालणार आहे व तशी व्यवस्था करण्याला ते संस्थानिक, ह्मणजे राजा व प्रजा मुकत्यार आहेत. जरी पूर्वींपेक्षां त्या संस्थानिकांच्या हक्काकडे इंग्रज सरकाराकडून कांहीं दुर्लक्ष केलें जातें. व त्यांच्या पूर्वींच्या व आतांच्या हक्कांत अंतर दिसतें. तरी तेथें कांहीं तजवीज होण्यासारखी आहे. व कांहीं अशी व्यवस्था करूं ह्मणतील तर तशी करण्याला ते मुकत्यार आहेत. ह्मणून त्यांच्या संबंधानें या विषयाची चर्चा सुरू करणें उपयोगाचें आहे. कोणी ह्मणेल कीं इंग्रज सरकारच्या राज्यांतील व्यवस्था आहे त्याप्रमाणें नेटिव संस्थानांत करावी ह्मणजे झालें. इकडे जशी मुलकी, फौजदारी, दिवाणी हीं तीन खातीं, त्याचप्रमाणें तिहा खातें. व दुसरीं दहा वीस खातीं आहेत. तशीं खातीं उत्पन्न करून व्यवस्था करावी ह्मणजे झालें. परंतु असें ह्मणें बरोबर नाहीं. खातीं कमी किंवा जास्ती ठेवणें हा या संबंधानें मुख्य विचार नाहीं. मुख्य रोगाचें मूळ फार खोल आहे. खातीं कमी जास्ती ठेवणें हीं वरकांती उपाय आहे. जर करितां सुधारणा करण्याचें नेटिव संस्थानिकांचे मनांत आलें, आणि त्यांनीं त्या हेतुनें कांहीं तजवीज केली, तर ती तशीच कायम कोणत्या उपायानीं होईल हा विचार मुख्य झाला पाहिजे. आधीं गर्भश्रीमंत राजाला क्वचित चांगली बुद्धि होते. बरें जवळच्या माणसांनीं सांगितलें कीं अमकी व्यवस्था चांगली आहे तर ती चालू करावी. व राजानें चालू केली व पुढें राजाची मर्जी जर फिरली, तर ती व्यवस्था तशीच कायम कशी राहील याचा उपाय शोधला पाहिजे. या बाबदींत काय करावें, कोणती व्यवस्था करावी, आणि त्या व्यवस्थेला कायमपणा येतो कसा! या संबंधानें पार्लमेंट करावें, कौन्सल करावें, प्रजेचे मुक्त्यार नेमून घेऊन त्यांच्या विचारें काम पाहावें, इत्यादि गोष्टी सुचविण्यांत आल्या, परंतु हे सर्व उपाय सशक्त, पोक्त, व समर्थ लोकांस गुणकारी होईल. आपली बाल्य दशा आहे, क्षयासारखा रोग ज्यास झाला आहे त्यास निरोगी माणसाप्रमाणें व्यायाम घ्यावा ह्मणून सांगितलें असतां उपयोग नाहीं. लोकांनीं जी गोष्ट करण्यासारखी आहे ती मात्र करण्याविषयीं उपदेश करावा. संस्थानांत राज्य व्यवस्था बरोबर नसल्यामुळें किती गोंधळ चालत असतो हें सर्वांस माहित आहेच; परंतु त्या संस्थानांत एकादा चांगल्या विचारी राजाच्या किंवा कारभाऱ्याच्या मनांत अमुक एक प्रकारची व्यवस्था किंवा गोष्ट करण्याचें आलें तर ती त्याच्या पाठीमागें किंवा त्याच्याच मर्जीचा कल फिरल्यावर अमलांत ठेवावी कशी हा मूळ विचार आहे. तसेंच अल्पवयी राजाच्या संस्थानांत चांगला हुशार दिवाण असतो व तो आपल्या बुद्धीप्रमाणें व्यवस्था करितो, भिन्न भिन्न खातीं सुरू करितो, न्यायाची पद्धत स्थापितो, दहा वीस लक्ष रुपये खजिन्यांत शिलक ठेवितो, परंतु ज्या वेळेस त्याच राजाचे हातांत सर्व अधिकार देण्यांत येतो तें वेळेस त्याच्यावर जें बंधन ठेवण्यांत आलें असतें ते तो तोडूं शकतो, त्याला दुर्व्यसनी हलकट किंवा अज्ञानी लोक मिळतात व पूर्वे स्थिति प्राप्त होते. त्यास असें न व्हावें, ह्मणजे एकादी चांगली व्यवस्था झाली असतां तो राजा अगर कारभारी मोडूं शकणार नाहीं, याचा बंदोबस्त कसा करावा? याविषयीं बडोद्याचे दिवाण सर. टी. माधवराव यांनीं पांच सहा वर्षांपूर्वीं असें सुचविलें होतें कीं नेटिव संस्थानामध्यें पोलिटिकल एजंट असतात ते बहुशा हुशार, कर्तव्यास जागणारे, व स्वतंत्र असतात संस्थानामध्यें इंग्रज सरकारच्या तर्फेनें जे पोलिटिकल रेसिडेंट किंवा अधिकारी असतात ते साधारणपणें वाईट नसतात हा अनुभव आहे. निदान राजे लोक व रेसिडेंट किंवा इंग्रज सरकारचे तर्फेनें आलेले अमलदार, यांची तुलना लावली तर उभयतांमध्यें पुष्कळ अंतर असतें. विद्येच्या संबंधानें, हुशारीच्या संबंधानें व दुसऱ्या पुष्कळ गोष्टींच्या संबंधानें हें अंतर असतें, त्याचा लाभ नसतो, त्यास लोभही नसतो, त्याचा निःपक्षपातपणाही पुष्कळ असतो. यास्तव प्रजेमध्यें स्वतःच्या हक्कांचें रक्षण करण्याची बुद्धी व सामर्थ्य येईपर्यंत ह्या एजंटाचे सल्ला व शहाणपणाचा उपयोग करून घ्यावा. दिवाणाचा अधिकार केवळ राजाचे इच्छेवर न ठेवितां राजानें निवड करून त्यास बहादरी एजंटाची असावी, अशी व्यवस्था ज्या ठिकाणीं होईल त्या ठिकाणीं अव्यवस्थेचें मूळ बीज मोडल्याप्रमाणें होईल. असा सदरील गृहस्थांचा विचार आहे. व हा अनुभवसिद्ध आहे. बडोद्यास अशी व्यवस्था पुष्कळ वर्षे चालू होती. दिवाण गोविंदराव रोडे हे जरी जुने मताचे होते, तरी यांनीं उत्तम प्रकारें कारभार चालविला हें आपणास माहित आहेच. त्याला काढून भाऊ शिंदे यांस दिवाण नेमिलें. त्या दिवसापासून बडोद्यास भागचा पाय लागला. त्या पूर्वीं दिवाण नेमणें तो एजंटांचे विचारें व पसंतीनें नेमावा असें होतें. खंडेराव महाराजांच्या कारकीर्दीतच दिवाणास वाटेल त्या वेळेस काढण्याची प्रथम सुरवात होऊन वाईट व्यवस्थेचें बीज उत्पन्न होऊन शेवटी त्याची कशी अखेर झाली हें आपणास माहित आहेच यास्तव तुर्त राज्यव्यवस्थेच्या संबंधानें विचार करतांना आणखी कांहीं दुसरें बंधन नको, तर एवढेंच पाहिजे कीं दिवाण चांगला असण्याविषयीं लोकांच्या मनांत वासना उत्पन्न होऊन तो नेमण्याचा अधिकार मिळविण्याविषयीं त्यांच्यांत पात्रता येईपर्यंत मोठ्या राज्याचा दिवाण आचारी नसावा, पाणक्या नसावा, किंवा अशा रीतीचा अज्ञान नसावा, (cheers) तर चांगला सुशिक्षित, हुशार, व राज्याचा नीट रीतीनें बंदोबस्त ठेवील असा असावा. असें ह्मणण्याचा अधिकार एजंटाकडे असावा. असा दिवाण राज्याच्या व एजंटाच्या विचारानें नेमल्यावर ठरलेल्या मुदतीपर्यंत त्याजकडे कांहीं गुन्हा लागू झाल्याशिवाय त्यास काढूं नये. मुदत होण्यापूर्वींही लोकांचा विचार एक झाला कीं, अमुक दिवाण हा बरोबर नाहीं. त्यापासून प्रजेस विनाकारण फार त्रास होतो तर त्याला एजंटाच्या व राजाच्या विचारानें चौकशी करून नंतर दूर करावा. आणि तसाच दुसरा कोणी मनुष्य त्याचे जागेवर ठेवावा. दिवाण एकदां नेमल्यानंतर नुसतें पोलिटिकल अधिकाऱ्यांनीं सांगितलें कीं, ह्याला काढावें तर तो निघूं नये. ह्मणजे तो राजाला व लोकांला अप्रिय नसेल, आणि केवळ पोलिटिकल एजंटाला किंवा त्याचे शिरस्तेदारास, त्याचे चोपदारास, किंवा त्याच्या दायीस अप्रिय झाला ह्मणून त्यास काढून टाकण्याविषयीं यत्न केला तरी तो सिद्धीस जाऊं नये. मुख्य प्रजेचें गाऱ्हाणें नसल्यास त्यास काढतां येऊं नये अशी तजवीज व्हावी. दिवाणाच्या अधिकाराच्या व नेमणुकीच्या बाबदींत राजाच्या मर्जीवरच बंधन असलें पाहिजे असें नाहीं. संस्थानिकांपेक्षां कांहीं कांहीं प्रसंगीं एजंटाचे इच्छेवरही दाब पाहिजे. पोलिटिकल अधिकारीही प्रसंगीं पुष्कळ ढवळाढवळ करितात. हल्लींचे सर सालरजंग यांच्या वाडिलांची गोष्ट अशीच आहे. ते कारभारांत नसावेत अशी त्या वेळच्या पोलिटिकल अधिकाऱ्याला इच्छा होऊन त्यांनीं चंदूलालाला पुढें केलें. पुढें चंदूलालाची कारकीर्द कशी झाली हें सर्वांस ठाऊक आहेच. यास्तव सांगणें मिळून एवढेंच कीं, बाकीच्या सर्व किरकोळ सुधारणेचा विचार तूर्त एकीकडे ठेवून प्रथम हा दिवाणाचा बंदोबस्त झाला पाहिजे. जोपर्यंत लोकांना समज आला नाहीं, आपल्या हक्काचें ज्ञान प्राप्त झालें नाहीं आपल्याला सुख किंवा दुःख होतें त्याचा उपाय आपल्या स्वाधीन आहे असें वाटूं लागलें नाहीं, तोंपर्यंत राजा मनुष्य आहे, त्याजकडे बंदोबस्ताचा अधिकार सोंपविलेला आहे तो ईश्वरी अंश नाहीं किंवा मायबाप नाहीं असें लोकांस वाटत नाहीं तोंपर्यंत या किरकोळ गोष्टींची वाटाघाट करणें व्यर्थ आहे. असा बंदोबस्त झाला तर मग दहा वर्षे लागोत वीस वर्षे लागोत कांहीं काळानें तरी संस्थानांत सुधारणा होईल आणि अशा पायावर जीं कामें होतील तीं बहुत दिवस टिकतील. संस्थानांतील व्यवस्था सर्वथैव इंग्रजी अमलांतील खात्यासारखी नसावी. नाहीं तर तिकडे पब्लिकवर्क्स डिपार्टमेंट काढलें ह्मणजे इकडे एक काढावें, त्यावर पांच सहाशे रुपयांचा इंजिनियर ठेवावा, त्याच्या हाताखालीं पांच सहा नेटिव ओव्हरसियर असावेत. तसाच एक डाक्तर असावा. तिकडे इनामखातें असलें तर इकडे एक इनाम कमिशनचें खातें ठेवावें, मग त्याची गरज असो नसो त्याचा विचार नाहीं. ( cheers ) हें सर्वथैव अश्लाघ्य आहे मुख्य राजा व दिवाण यांची व्यवस्था सुयंत्र झाली ह्मणजे यास या किरकोळ गोष्टींचें किती अनुकरण करावें व किती करूं नये हें सहजी समजेल. राजा वाईट, छंदी, व्यसनी असावयाचाच हा पक्ष घेऊन चाललें पाहिजे. राजा कसाही असला तरी त्याचे हातून चांगली व्यवस्था राज्यांत ठेवली पाहिजे. लोकांचें अनहित जितकें कमी होईल तितकी तजवीज ठेवली पाहिजे; यास्तव या कामीं चांगल्या मनुष्याची योजना केली पाहिजे व एकदा तशी योजना झाल्यावर ती टिकली पाहिजे हा मुख्य बंदोबस्त आहे.”

ज्ञा. प्र.

हें पत्र अकोलें एथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत रा० रा० खंडेराव बाळाजी फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.